97-5

ISSN 0973 - 8452

मनुष्याणाम् वृत्तिरर्थः ।

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे त्रैमासिक

# अर्थसंवाद

भारतीय सौर चैत्र-आषाढ १९३१
एप्रिल-जून २००९/ खंड ३३ अंक १





- विकासनितीचा प्रणेता : शाहू छत्रपती
- कोल्हापूर जिल्ह्यातील गगनबावडा तालुक्यातील नैसर्गिक साधनसंपत्ती व भू-जैव विविधता आणि प्रादेशिक विकास - एक अभ्यास
- महाराष्ट्राच्या कृषी क्षेत्राचा विकास
- स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजनेची प्रगती आणि प्रभाव
- वाळवा तालुक्यातील दारिद्र्य रेषेखालील महिला स्वयंसहाय्यता बचत गटांची बलस्थाने व दुर्बलस्थाने
- हिंगोली जिल्ह्यातील आदिवासी समाजाच्या दारिद्र्याचे विश्लेषण
- दक्षिण कोकणातील आंबा प्रक्रिया उद्योगाचे अर्थशास्त्र आणि समस्या
- नांदणी भाजीपाला व फळफळावळ उत्पादक सहकारी संघ मर्या., नांदणी
- सत्य : भाववाढी संदर्भातील

1/52
6129

लोककल्याणमूलस्य अर्थशास्त्रस्य सिध्दये ।
शोधचर्चाविवादार्थ संवादोऽयं प्रवर्तितः ।।
मराठी अर्थशास्त्र परिषदेचे त्रैमासिक

# अर्थसंवाद

एप्रिल-जून 2009/खंड 33, अंक 1

मनुष्याणाम् वृत्तिर्थ:।

प्रमुख संपादक
जगन्नाथ शामराव पाटील

सहायक संपादक
संतोषकुमार बबनराव यादव

सल्लागार मंडळ
(2009-12)
लालासाहेब घाटगे
मोहन चौधरी
शिवाजी अंभोरे
संतोष कदम

संपादकीय पत्रव्यवहार
जगन्नाथ शामराव पाटील
शांती प्लाझा, बी- 9,
880/881, शनिवार पेठ.
सातारा. 415 002
मो.9423261796
फोन:(02162)233152

## । अनुक्रमणिका ।

* विकासनितीचा प्रणेता : शाहू छत्रपती
माधव गायकवाड

* कोल्हापूर जिल्ह्यातील गगनबावडा तालुक्यातील नैसर्गिक साधनसंपत्ती व भू-जैव विविधता आणि प्रादेशिक विकास - एक अभ्यास
धर्मा रानबा धेडे

* महाराष्ट्राच्या कृषी क्षेत्राचा विकास
दिलीप पाटील

* स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजनेची प्रगती आणि प्रभाव
भा. शं. खुरूद

* वाळवा तालुक्यातील दारिद्र्य रेषेखालील महिला स्वयंसहाय्यता बचत गटांची बलस्थाने व दुर्बलस्थाने
सौ. पौर्णिमा दीपक चव्हाण (उडुपी)

* हिंगोली जिल्ह्यातील आदिवासी समाजाच्या दारिद्र्याचे विश्लेषण
चंद्रकांत कोकाटे, रामकृष्ण सोळुंके

* दक्षिण कोकणातील आंबा प्रक्रिया उद्योगाचे अर्थशास्त्र आणि समस्या
बबन खामकर

* नांदणी भाजीपाला व फळफळावळ उत्पादक सहकारी संघ मर्या., नांदणी
मन्मथ भगवानराव मोराळे

* सत्य : भाववाढी संदर्भातील
राजकुमार आण्णासो वाइंगडे

* ग्रंथपरीक्षण
विष्णू सराफ, सु. गो. भानुशाली

* भा. रा. ढेकणे यांचे निधन
अनिल दाणी

* नलिनी पंडित - श्रध्दांजली
व्यं. सु. पाटणकर

मराठी अर्थशास्त्र परिषद

कार्यकारी मंडळ(2009-10)

अध्यक्ष

विनायक श्रीधर देशपांडे (नागपूर)

कार्याध्यक्ष

दिलीप खंडेराव पाटील (सांगली)

कार्यवाह–खजिनदार

अनिल बाबुराव सूर्यवंशी (बार्शी)

प्रमुख संपादक अर्थसंवाद

जगन्नाथ शामराव पाटील (सातारा)

सदस्य

1) हिरालाल चव्हाण(जळगाव)
2) प्रशांत काटोले (अमरावती)
3) अविनाश निकम (शहादा)
4) रामकृष्ण टाले (नागपूर)
5) विकास सुकाळे (नांदेड)
6) ज्ञानोबा मोरे (उस्मानाबाद)
7) तानाजी गिते (पुणे)
8) बाळासो पाटील (सांगली)
9) बबनराव खामकर (सिंधुदुर्ग)
10) मुक्ता जहागिरदार (अमरावती)
11) बाळासाहेब माने (सांगली)
12) महंमदरफीक मुलाणी (बारामती)

**अर्थसंवादसाठी अनुदानाबद्दल आभार :**

1) भारतीय सामाजिक विज्ञान अनुसंधान परिषद, दिल्ली
2) महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

(टीप : म.रा.सा.सं.मंडळाने अनुदान दिले असले तरी या नियतकालिकातील लेखकांच्या विचारांशी मंडळ आणि राज्य शासन सहमत असेलच असे नाही.)

कार्यालयीन पत्रव्यवहार

(आजीव सदस्य नोंदणी, जाहिरात पाठविणे)

अनिल बाबुराव सूर्यवंशी
कार्यवाह – खजिनदार – मराठी अर्थशास्त्र परिषद,
"गोदाई" शिवशक्ती मैदानाजवळ, शिवाजीनगर,
बार्शी 413 411. जि.सोलापूर
दूरध्वनी (02184) 224294 मो.9011339906

परिषदेचे प्रमुख कार्यालय :

मराठी अर्थशास्त्र परिषद, द्वारा / सेंटर फॉर दी स्टडी ऑफ सोशल चेंज, एम.एन.रॉय ह्यूमन डेव्हलपमेंट कँपस प्लॉट क्र.6 एफ. ब्लॉक, कार्डिनल ग्रेशियस स्कूल जवळ, सहकारी वसाहत इमारत क्र. 323 समोर, बांद्रे (पूर्व) मुंबई 400051

**वर्गणी :**

**अ) परिषदेचे सदस्य :**

| | |
|---|---|
| आजीव सदस्य (एकरकमी) | : रू. 1500 |
| साधारण सदस्य | : रू.300 (वार्षिक) |
| **आ) संस्था सदस्य** | |
| शैक्षणिक संस्था | : रू.250 (वार्षिक) |
| व्यावसायिक संस्था | : रू.250 (वार्षिक) |
| **इ) अर्थसंवाद वर्गणीदार** | |
| ग्रंथालये | : रू.250 (वार्षिक) |
| **ई) वर्षगणना** | 1 एप्रिल ते 31 मार्च |

*** संस्थांना आजीव सभासद होता येत नाही.**

*** कृपया आजीव सदस्य वर्गणी डिमांड ड्राफ्टनेच मराठी अर्थशास्त्र परिषद या नावाने कार्यवाहांकडे पाठवावी.**

*** अर्थसंवादची वर्गणी डिमांड ड्राफ्टनेच मराठी अर्थशास्त्र परिषद या नावाने प्रमुख संपादकांकडे पाठवावी.**

# विकासनितीचा प्रणेता : शाहू छत्रपती

**माधव गायकवाड**
प्रपाठक, अर्थशास्त्र विभाग
सरस्वती भुवन कला व वाणिज्य महाविद्यालय,
औरंगाबाद.

जागतिक स्तरावर आर्थिक विकास या अर्थशास्त्रीय संकल्पनेस अनन्य साधारण महत्त्व प्राप्त झाले आहे. विकासाच्या अनेक विचारवंतांनी वेगवेगळ्या व्याख्या दिलेल्या आहेत. काही विचारवंतांच्या मते भौतिक वस्तूंची संख्यात्मक वाढ म्हणजे विकास होय, तर काही विचारवंतांच्या मते, गुणात्मक वाढ म्हणजे विकास होय. या शिवाय काही तज्ज्ञ म्हणतात, ''गुणात्मक वाढीतून संख्यात्मक वाढ होते. त्यामुळे गुणात्मक व संख्यात्मक वाढीला एकत्रितरित्या विकास म्हणावे. म्हणजेच एखाद्या राष्ट्राने आपल्या गुणात्मक व संख्यात्मक वाढीसाठी म्हणजेच आर्थिक समृध्दीत सकारात्मक बदल घडवून आणण्यासाठी केलेले सर्व प्रकारचे प्रयत्न म्हणजे आर्थिक विकासासाठी केलेले प्रयत्न होय.'' पण आर्थिक विकासाच्या या प्रक्रियेत राष्ट्रातील सर्वात दुर्बल, सामाजिक, शैक्षणिक व राजकीयदृष्ट्या मागासलेल्या माणसाचे स्थान काय? त्याला विकासाचा किती वाटा उपभोगता येतो? यावरून विकासाची स्थिती निश्चित करावी असे मानणारा नवीन विचार प्रवाह आज अस्तित्वात आलेला आहे. या विचार प्रवाहाची सुरूवात म.फुल्यांनी जरी केली असली तरी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी त्याला अर्थशास्त्रीय परिभाषेत बसविले. ते म्हणतात ''ज्या विकास प्रक्रियेत सामाजिक व आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या वर्गाची अन्न, वस्त्र, निवाऱ्याची गरज भागवून सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या त्यांचे स्थान आहे तसेच कायम ठेवले तर ती खऱ्या अर्थाने विकास प्रक्रिया नव्हे.'' विकास प्रक्रियेत राष्ट्रातील प्रत्येक व्यक्तीला मिळणाऱ्या संधीचा समानतेने लाभ घेण्याचा अधिकार, शिक्षण घेण्याचा अधिकार, निरोगी जीवन जगण्याच्या सुविधा उपभोगण्याचा अधिकार, जमीन मालकीचा ढाचा, स्त्री-पुरूष समानता,

राजकीय अधिकार उपलब्ध व्हायला हवेत. थोडक्यात, आर्थिक विकासात राष्ट्रातील प्रत्येक व्यक्तींच्या जीवनस्तराचा अंतर्भाव अनिवार्य ठरतो. डॉ. अमर्त्यकुमार सेन यांनी आपल्या 'इंडिया-इकॉनॉमिक डेव्हलपमेंट ॲण्ड सोशल ऑपॉर्च्यूनिटी' या ग्रंथात म्हटलेले आहे "A broad perspective in which social as well as economic opportunities have central roles. We consider therefore not only the facilities offered important as they are by well functioning markets and beneficial exchanges, but also the fundamental role of human capabilities and their dependence on basic education, health services, ownership patterns, social stratification, gender relations and the opportunity of social co-operation as well as political protest and opposition, variations in social opportunities not only lead to diverse achievements in the quality of life but also influence economic performance and in particular the extent to which the facilities offered by functioning markets can be used by the citizen." शिक्षण सुविधांची उपलब्धता, आरोग्य सेवेची उपलब्धता, भौतिक संपत्तीच्या मालकीचा ढाचा, स्त्री-पुरूष सबंध, सामाजिक रचना, समाजातील राजकीय विरोधाची शक्ती इ. घटक राष्ट्राच्या आर्थिक विकासात महत्वाचे ठरतात. ही बाब सेन यांनी पुढे आणली. 1995 साली अमर्त्यकुमार सेन यांनी मांडलेल्या व्याख्येपेक्षाही महाराष्ट्र मानव विकास अहवाल 2002 मधील विकासाची व्याख्या अधिक परिपूर्ण वाटते.

महाराष्ट्र मानव विकास अहवाल 2002 मध्ये म्हटलेले आहे, 'आर्थिक विकासात लोकांना मिळणाऱ्या संधीचा परिघ मोठा करण्याची प्रक्रिया, दीर्घ आणि निरोगी जीवन जगण्याच्या शिक्षण मिळविण्याच्या आणि चांगले राहाणीमान उपभोगण्याच्या संधी; त्याच बरोबर राजकीय स्वातंत्र्य, मानवी हक्काचे संरक्षण आणि स्वत्वाची जपवणूक, स्त्री-पुरूष समानता, आर्थिक समानता आणि सांस्कृतिक समानता अंतर्भूत असतात.' आर्थिक विकासाच्या उपरोक्त व्याख्यांचा एकत्रित विचार केल्यास असे म्हणता येते की, राष्ट्रातील आर्थिक विकासाची प्रक्रिया ही केवळ नैसर्गिक व भौतिक घटकांच्या उपलब्धतेवर अवलंबून नसून राष्ट्रात अस्तित्वात असलेल्या सामाजिक रचना, स्त्री-पुरूष भेदभाव, शिक्षणाचा प्रसार, राजकीय समानता इ. सामाजिक व मानसिक घटकांवर देखील अवलंबून आहे व लोकांची मानसिकता बदलण्याची जबाबदारी राष्ट्रात अस्तित्वात असलेल्या सरकारची असते. विकासाची दृष्टी असणारा राजा किंवा सरकार भौतिक घटकांच्या उपलब्धतेबरोबरच राष्ट्रात सामाजिक समता, स्त्री-पुरूष समानता, शिक्षण प्रसार, व्यावसायिक स्वातंत्र्य, राजकीय समानता प्रस्थापित करून आर्थिक विकासाची व्याप्ती वाढविते. ही प्रक्रिया कधी सक्तीने, कधी कायदे करून, तर कधी कृती व प्रबोधन करून केली जाते. या पार्श्वभूमीवर समाज सुधारक राजा शाहू छत्रपतींनी आपल्या राज्यात विकासाची ही प्रक्रिया कशी राबविली? सामाजिक दृष्ट्या मागासलेल्या जातीवर्गाच्या उन्नतीसाठी कोणती धोरणे आखली? शिक्षण प्रसारासाठी कोणते प्रयत्न केले? स्त्री उध्दारासाठी कोणती कृती केली? या बाबींचा म्हणजेच छत्रपती शाहूंच्या आर्थिक विकासविषयक दृष्टिकोणाचा आढावा सदरील लेखात घेतलेला आहे.

जाणता राजा म्हणून इतिहासाला परिचित असलेल्या छत्रपती शाहूंचा जन्म इ.स. 1874 मध्ये झाला, तर वयाच्या केवळ विसाव्या वर्षी (इ.स.1874) त्यांचा राज्याभिषेक होऊन कोल्हापूर संस्थांनाच्या राजगादीवर ते विराजमान झाले तेव्हा राज्याची स्थिती सामाजिक व आर्थिक दृष्ट्या अत्यंत विषमताधिष्ठित होती. शिक्षणाच्या सुविधा उपलब्ध नव्हत्या, समाजात जातीव्यवस्थेचे कमालीचे वर्चस्व होते, दरबाराच्या सेवेत व राजकीय पदावर कनिष्ठ जातीय लोकांना संधी मिळालेली नव्हती, स्त्रियांना मानाचे स्थान नव्हते अशा स्थितीत असलेल्या राज्याचा अभ्यूदय करण्याची मनिषा छत्रपती शाहूराजांनी व्यक्त केली. राज्यभिषेकाच्या भाषणातच ते म्हणाले होते, ''आमची प्रजा सदा सर्वदा सुखी व संतुष्ट असावी, दिवसेंदिवस तिचे कल्याण वृध्दिंगत व्हावे आणि आमच्या राज्याचा सर्व बाजूंनी अभ्यूदय व्हावा अशी आमची उत्कट इच्छा आहे.'' यावरून त्यांचा आर्थिक विकास विषयक दृष्टीकोन लक्षात येतो.

### विकासाचे आर्थिक घटक –

राज्याच्या आर्थिक विकासासाठी शेती आणि औद्योगिक क्षेत्राचा विकास अनिवार्य आहे ही बाब छत्रपती शाहूंनी पूर्णपणे हेरलेली होती. त्यामुळे त्यांनी प्रथमतः कृषी क्षेत्राच्या सुधारणेचा आरंभ केला. म. फुल्यांनी सांगितलेली शेतकऱ्यांच्या मागासपणाची कारणे विचारात घेऊन शेती व शेतकऱ्यांच्या हिताची धोरणे आखली त्यात शेतकऱ्यांना साक्षर बनविणे, सहकाराच्या माध्यमाने शेतकऱ्यांना भांडवल पुरविणे, नवीन पीक पध्दतीला प्रोत्साहन देणे, सकस बियाणे पुरविणे, कृषी मालाचे पक्क्या मालात रूपांतर करणे, जलसिंचन सुविधा वाढविणे (उदा. भोगावती, राधानगरी योजना) कृषी मालाची विपणन व्यवस्था उपलब्ध करून देणे इ. चा समावेश होतो. कृषी विकासाबरोबरच कृषीवर आधारीत उद्योगांच्या निर्मितीलाही त्यांनी प्राधान्य दिले. ज्यामुळे कृषी मालाला मागणी वाढेल, राज्यात रोजगार निर्मिती होईल, व्यापार वाढेल व राष्ट्रीय उत्पन्नात भर पडेल. राजाराम स्कूल, शोरूम व बोर्डींग हाऊसचे उद्घाटन (इ.स.1920) करताना ते म्हणाले होते की, ''औद्योगिक विकासाशिवाय देशाला तरणोपाय नाही. देशाच्या दृष्टीकोनातून औद्योगिक विकास दुहेरी महत्वाचा आहे. एक म्हणजे, औद्योगिक विकासामुळे आपल्याला आपली साधन संपत्ती, राष्ट्रीय उत्पन्न व व्यापार वाढविता येतो, दुसरा जास्त महत्वाचा घटक म्हणजे औद्योगिक विकासामुळे शहरी व ग्रामीण भागात लोकांना रोजगार मिळवून दिला जातो, लोकांना ते आहेत तेथेच रोजगार निर्माण करून दिल्यास पुढची आर्थिक प्रगती करून घेण्यास उद्योगधंद्याची वाढ फार महत्वाची आहे.'' म्हणूनच त्यांनी राज्यात स्थानिक साधनांचा वापर करणारी शाहू छत्रपती मिलची स्थापना केली. तेल निर्मिती उद्योग, लाकडी वस्तू बनविण्याचा उद्योग, कापड चादरी, मातीची भांडी, साखर, गुळ इ. बनविण्याचे उद्योग स्थापन केले व स्थानिक साधनांचा पर्याप्त वापर करतांनाच राज्यातील लोकांना रोजगार उपलब्ध करून दिला, व्यापार वाढविला, इतर संस्थानांना सदरील उत्पादनाची निर्यातही केली.

### आर्थिक विकासाचे सामाजिक घटक

आर्थिक विकासाच्या सामाजिक घटकांचा आंतरराष्ट्रीय स्तरावर इ.स.1890 पासून नामोल्लेख सुरू झाला. पण इ.स. 1920 पासून पिगूने या

विचाराला बळकटी देऊन आर्थिक विकासात सामाजिक घटकांचाही आंतर्भाव करावा असा आग्रह धरला. इ.स.1974 मध्ये गुण्णर मिर्डाल नावाच्या अर्थशास्त्रज्ञाने पिगुचा हा विचार विकसित केला व पुढे इ.स. 1998 मध्ये अमर्त्यकुमार सेन यांनी आर्थिक विकासाची संकल्पना सामाजिक घटकांच्या आंतर्भावाशिवाय पूर्ण होऊच शकत नाही हे पटवून दिले. पण छत्रपती शाहू महाराजांनी सत्तेची सूत्रे होती घेतानाच ही बाब ओळखलेली होती. त्यामुळे सुरूवातीपासूनच त्यांनी शिक्षण प्रसार, स्त्री उध्दार, दलित्तोध्दार, सामाजिक सहकार इ. बाबींच्या प्रस्थापनेसाठी प्रयत्न सुरू केले व त्यात त्यांना भरीव यशही आले.

राज्याच्या सत्तेची सूत्रे हाती घेतल्यानंतर छत्रपती शाहू महाराजांनी आपल्या राज्याच्या समाजार्थिक बाबींचे अवलोकन केले तेव्हा त्यांना आढळून आले की, राज्याची एकूण लोकसंख्या नऊ कोटी एवढी होती. त्यातील तीन टक्के एवढी लोकसंख्या ब्राम्हणांची तर सत्यान्नव टक्के लोकसंख्या ब्राह्मणेत्तरांची होती. एकूण ब्राम्हणेत्तरात जवळपास एक कोटी एवढी लोकसंख्या अस्पृश्य मानल्या जाणाऱ्या जातींची होती. मात्र संस्थानाच्या (दरबाराच्या) सेवेत असणाऱ्या एकूण अधिकारी व कर्मचारी वर्गात जवळपास पंच्याऐंशी टक्के एवढे प्रमाण ब्राम्हण जातीचे तर केवळ पंधरा टक्के एवढे प्रमाण ब्राम्हणेत्तरांचे होते. त्यातही अस्पृश्य जातीतील एकही अधिकारी किंवा कर्मचारी सेवेत नव्हता. जन्मावरून जात व जातीवरून व्यवसाय व शिक्षण घेण्याचा अधिकार निश्चित होत असल्याने अस्पृश्य जातीतील लोकांच्या वाट्याला अधिक कष्टाची, अप्रतिष्ठेची व कमी मोबदला देणारी कामे आली तर वरिष्ठ जातीय लोकांकडे प्रतिष्ठेची, कमी कष्टाची व अधिक मोबदला देणारी कामे राहिली. त्यामुळे राज्यात सामाजिक विषमतेतून आर्थिक विषमता निर्माण झालेली आहे या बाबींचा छत्रपती शाहूंना उलगडा झाला. कनिष्ठ जातीय लोकांच्या अध:पतनास त्यांचा कनिष्ठ सामाजिक दर्जा, त्यांच्यातील शिक्षणाचा अभाव व राजकीय शक्तीचा कमकुवतपणा जबाबदार आहे; तर धर्म, रूढी, परंपराच्या आधाराने पुरूषसत्ताक समाजव्यवस्थेने स्त्रियांना समाजात दुय्यम स्थान दिल्याने त्यांच्यात शिक्षण व स्वातंत्र्याचा अभाव आहे हे ओळखून छत्रपती शाहूंनी त्यांच्या अभ्यूदयासाठी वेगवेगळे कायदे केले. त्यांना व्यावसायिक पदव्या दिल्या, राजकीय पदे दिली, थोडक्यात पिगूनी आर्थिक विकासासाठी आवश्यक असणारे घटक इ.स. 1920 मध्ये सांगितले, पण छत्रपती शाहू महाराजांनी विकासासाठी आवश्यक असणाऱ्या पिगूनी सांगितलेल्या घटकांची अंमलबजावणी इ.स. 1894 पासूनच आरंभिलेली होती.

## संधीच्या परिघाची व्याप्ती

प्रत्येक व्यक्ती जन्मत: स्वतंत्र असते व तिचे हित तिला कळत असते.त्यामुळे ती आपले हित जोपासण्यसाठी कार्यरत असते, पण जन्मत: मिळालेल्या स्वातंत्र्याचा संकोच झाल्यास व्यक्ती आणि पर्यायाने राष्ट्राच्या विकासात अडथळा निर्माण होतो. भारतीय समाज व्यवस्थेतील जातीव्यवस्था व अस्पृश्यता इ. मुळे अनेक लोकांच्या व्यक्ती स्वातंत्र्याचा संकोच झालेला होता. ही बाब ओळखून छत्रपती शाहूंनी अस्पृश्यता व जातीयता नष्ट करण्यासाठी कायदाच केला व अज्ञापत्र काढले, 'सर्व सार्वजनिक इमारती, धर्मशाळा, रेस्ट हाऊसेस, सरकारी अन्नछत्रे वगैरे ठिकाणी वनदीचे पाणवढे,

सार्वजनिक विहिरी येथे कोणताही विटाळ मानता कामा नये तसे न झाल्यास गाव कामावरील पाटील, तलाठी यांना जोखीमदार धरले जाईल.' एवढेच नाही तर आपल्या खाजगी सेवेत महारा-मांगासारख्या अत्यंत कनिष्ठ मानल्या जाणाऱ्या जातींच्या लोकांना सामावून घेतले. शाळेत शिक्षण घेणाऱ्या कोमल मनाला अस्पृश्यतेचा स्पर्श होऊ नये म्हणून शाळेत अस्पृश्यता मानणाऱ्या शाळा, शिक्षक व संस्था चालकांसाठी वेगळा फतवा काढला.

जाती व्यवस्थेचे व्यवच्छेदक लक्षण म्हणजे जातीवरून व्यवसाय ठरणारी प्रथा छत्रपती शाहूंनी मोडीत काढून प्रत्येकाला त्याच्या योग्यतेप्रमाणे व्यवसाय करण्याचे स्वातंत्र्य बहाल केले. अनेक कनिष्ठ जातीय लोकांना वकीलीच्या सनदा दिल्या. कोल्हापूर नगर परिषदेची निवडणूक घोषित करून प्रत्येक जातींच्या लोकसंख्येच्या प्रमाणात राखीव मतदार संघ निर्माण करून निवडणुका घेतल्या व एकूण 47 मतदार संघातून निवडून आणलेल्या लोकप्रतिनिधी मार्फत दत्तोबा पोवार नामक चांभार जातीच्या व्यक्तीला नगर परिषदेचे अध्यक्ष बनवून राजकीय क्षेत्रात अस्पृश्य समाजाचा समावेश करून घेतला. एवढेच नव्हे तर गंगाराम कांबळे सारख्या अस्पृश्य व्यक्तीला हॉटेल व्यवसाय सुरू करून देऊन स्वत: त्या हॉटेलात चहा घेऊ लागले. कनिष्ठ जातीय लोक व महिलांना शैक्षणिक सुविधा पुरवून त्यांना शिक्षण घेण्यास प्रोत्साहित केले. थोडक्यात जातीयता, शिक्षणाचा अभाव, राजकीय शक्तीहीनता दूर करून दुर्बलांना त्यांच्या स्वत्वाची जाणीव करून देऊन सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक व राजकीय दृष्ट्या त्यांना मिळणाऱ्या संधीचा परिघ छत्रपती शाहू महाराजांनी वाढविला.

**शिक्षणातून विकासाकडे –**

वर्तमान स्थितीत सामाजिक व आर्थिक विकासाचे साधन म्हणून शिक्षणाकडे पाहिले जात आहे. अनेक सामाजिक,आर्थिक व राजकीय रोगावर शिक्षण प्रसार हाच एकमेव उपाय आहे असे छत्रपती राजर्षी शाहू देखील मानत होते. ते म्हणतात, ''शिक्षण हाच आमचा तरणोपाय आहे असे माझे ठाम मत आहे. शिक्षणाशिवाय कोणत्याही देशाची उन्नती झाली नाही असे इतिहास सांगतो, म्हणून सक्तीच्या व मोफत शिक्षणाची हिंदूस्थानला अत्यंत आवश्यकता आहे.'' म्हणून त्यांनी राज्यात प्रथमत: प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत केले. एवढेच नव्हे तर शिक्षणाची सक्ती मोडणाऱ्या पालकांना दंड आकारला. त्यांनी 25 जुलै 1910 रोजी केलेल्या मोफत शिक्षणाच्या कायद्याला भरपूर प्रतिसाद मिळाला. कारण इ.स. 1894 मध्ये संस्थानात केवळ 224 शाळा होत्या. इ.स. 1922 पर्यंत त्या 559 एवढ्या झाल्या, याच काळात अस्पृश्य जातींच्या विद्यार्थ्यांची संख्या 234 वरून 2162 पर्यंत वाढली. ब्राह्मणेत्तर जातींच्या विद्यार्थ्यांचे प्रमाण 7.6% वरून 37.7% पर्यंत पोहचले. यावरून असे म्हणता येते की, छत्रपती शाहूंनी केवळ मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा कायदाच केला नाही तर मागेल त्याला शिक्षण व इतर शैक्षणिक सुविधा मिळतील एवढ्या प्रमाणात पायाभूत सुविधाही उपलब्ध करून दिल्या. आर्थिक दृष्ट्या कमकुवत परिवारातील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्त्या दिल्या. व्हिक्टोरिया मराठा बोर्डींग (इ.स. 1901),दिगंबर जैन बोर्डिंग हाऊस (इ.स. 1905), मुस्लिम बोर्डींग (इ.स.1906), वीरशैव लिंगायत बोर्डिंग (इ.स.1907), मिस क्लार्क होस्टेल

(इ.स. 1908), नामदेव बोर्डिंग (इ.स.1911), कायस्थ प्रभु बोर्डिंग (इ.स.1991), पांचाळ ब्राह्मण बोर्डिंग (इ.स.1912), सारस्वत बोर्डिंग इ.स.(1912), इंडियन ख्रिश्चन होस्टेल (इ.स.1915), आर्य समाज गुरूकुल (इ.स.1918), वैश्य बोर्डिंग (इ.स.1918), ढोर-चांभार बोर्डिंग (इ.स.1919), सोमवंशी आर्यक्षेत्रीय बोर्डिंग (इ.स.1920), सुतार बोर्डिंग (इ.स.1921), नाभिक बोर्डिंग (इ.स.1921), श्री. देवांग बोर्डिंग (इ.स.1921), इ. स्थापन केले. त्याचबरोबर अध्यापक विद्यालय, टेक्निकल शाळा, मुलींच्या शाळा, मागासवर्गीयांसाठीच्या शाळाही स्थापन केल्या. पुरेशा प्रमाणात शिक्षकांची नियुक्ती करतानाच त्यांना प्रशिक्षण व वेळेवर वेतन मिळेल याची व्यवस्था केली. एक समिती नेमून सकस दर्जाचा शालेय अभ्यासक्रम तयार करून घेतला. थोडक्यात शाळा, शिक्षक, अभ्यासक्रम, वसतिगृहे, प्रशिक्षण इ. बाबींचा बारकाईने अभ्यास करून त्या परिपूर्ण कशा होतील यासाठी छत्रपती शाहू महाराजांनी प्रयत्न केले.

शालेय शिक्षण व उच्च शिक्षण यामध्ये छत्रपती शाहू राजांनी फरक केला व शालेय शिक्षण सर्वांना मोफत व सक्तीचे केले तर उच्चशिक्षण घेण्याची इच्छा असणाऱ्यांना ते मिळालेच पाहिजे असा आग्रह धरला. पण उच्च शिक्षण देणाऱ्या शैक्षणिक संस्था या स्वयंपूर्ण असाव्यात.त्यांचे उत्पन्न त्यांनी स्वत: मिळवावे असे ते मानतात. कारण उच्च शिक्षणावर होणारा खर्च अधिक असतो व तो पूर्ण करणे सरकारला शक्य नसते. पण उच्च शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या आर्थिक दृष्ट्या कमकुवत वर्गाला ते मिळालेच पाहिजे व त्यासाठी सरकारने प्रयत्न करणे आवश्यक असते, या मताचे छत्रपती शाहू होते. २१ मार्च १९१८ रोजी काढलेल्या जाहीरनाम्यात ते म्हणतात ''आपल्या प्रजेला प्राथमिक शिक्षण देणे हे प्रगत सरकारचे मुख्य कर्तव्य आहे. महाविद्यालयीन शिक्षण ज्याने-त्याने आपल्या पैशावर करावे'' असे जरी असले तरी राजाराम महाविद्यालयातील खऱ्या गरजू विद्यार्थ्यांना त्यांनी फी माफी देण्याबरोबरच शिष्यवृत्त्याही दिल्या. शंकर बालाजी ढवले या विद्यार्थ्यास विलायतेस जाण्यासाठी आर्थिक मदत दिली. उच्च शिक्षण देणाऱ्या काही शैक्षणिक संस्थांना आर्थिक मदत देखील दिली. उच्च शिक्षण घेणाऱ्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर, पी.सी.पाटील, राव, सी. आर. ताबडे अशा काही विद्यार्थ्यांना भरीव आर्थिक मदत केली. म्हणजे केवळ आर्थिक विवंचनेमुळे उच्च शिक्षण घेऊ इच्छिणारा विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहणार नाही याची पुरेपूर काळजी त्यांनी घेतली. कारण उच्च शिक्षण हेच विकास प्रक्रियेचे प्रवेशद्वार आहे याची त्यांना जाणीव होती. म्हणूनच त्यांनी राजाराम महाविद्यालयाला मुंबई विद्यापीठाकडून कायम मान्यता मिळविण्यासाठी शर्तीचे प्रयत्न केले व संस्थानात उच्च शिक्षणाची सुविधा उपलब्ध करून दिली.

**विकासासाठी स्त्री उध्दार -**

वर्तमान स्थितीत समाजात स्त्रियांचे स्थान काय? यावरून राष्ट्र विकासाचा स्तर निश्चित केला जातो. कारण कोणत्याही राष्ट्रातील एकूण लोकसंख्येच्या जवळपास 50% लोकसंख्या ही महिला वर्गाची असते, पण जगभरातही 50% एवढ्या असणाऱ्या स्त्रियांकडे पाहण्याचा दृष्टिकोन हीन स्वरूपाचा होता. म्हणूनच विकास प्रक्रियेत समाजातील स्त्रियांचे स्थान विचारात घेतले जात

आहे. आर्थिक दृष्ट्या मागासलेल्या राष्ट्रात स्त्रियांचा दर्जा अत्यंत कनिष्ठ स्वरूपाचा असतो, तिला काहीही अधिकार नसतात. फुले व शाहू पूर्व काळात भारतही याला अपवाद नव्हता. भारतात हिंदूधर्माधिष्ठित व पुरूषप्रधान समाजरचनेने स्त्रियांना सातत्याने दुर्लक्षित केले. सामाजिक, आर्थिक, राजकीय , शैक्षणिक व सांस्कृतिक क्षेत्रात तिला सातत्याने दुय्यम स्थान देण्यात आले. स्त्रियांना शिक्षण घेण्यावर बंदी, बालपणातच त्यांचा विवाह लावून देणे, तिला देवदासी बनविणे, सण उत्सवाच्या निमित्ताने तिला बेअब्रु करणे, शिव्या देणे, एवढेच नव्हे तर कुटुंबात देखील तिच्यावर अन्याय-अत्याचार करणे इ.मुळे तिचे सामाजिक स्थान आपोआपच नगण्य स्वरूपाचे बनले होते. पण ब्राम्हणी संस्कृतीच्या वरवंट्याखाली भरडल्या जाणाऱ्या आणि किडयामुंग्या सारखे आयुष्य जगणाऱ्या स्त्रियांना स्वातंत्र्य, समता आणि प्रतिष्ठा मिळवून देण्यासाठी शाहू महाराजांनी प्रस्थापित समाजरचने विरूध्द बंड केले. समाजाच्या जडण-घडणीत, राष्ट्र विकासात राष्ट्रातील प्रत्येक व्यक्तीच्या सहभागाची आवश्यकता असते; पण 50% एवढ्या संख्येने असणाऱ्या स्त्रियांना मात्र दुर्लक्षित करण्यात आल्याचे छत्रपती शाहूंनी ओळखले व त्यांच्या उध्दारासाठी वेगवेगळे कायदे केले.

12 जुलै 1919 रोजी छत्रपती शाहू महाराजांनी स्त्रियांच्या विवाहासबंधीचा कायदा गॅझेटियरमध्ये प्रसिध्द केला. या कायद्यानुसार अठरा वर्षाचे वय पूर्ण केलेल्या कोणत्याही मुलीस स्वतःच्या निर्णयानुसार विवाह करण्याची परवानगी देण्यात आली. त्याच बरोबर ज्या काळात 8-10 वर्षाच्या वयातच मुलींचे लग्न लावून दिले जात असत त्या काळात छत्रपती शाहूंनी मुलींच्या लग्नाचे किमान वय 14 वर्षापर्यंत वाढविले व या कायद्याचे उल्लंघन करणाऱ्या पालकास शिक्षेची तरतूद केली. इ.स. 1917 मध्ये त्यांनी विधवांच्या पुनर्विवाहास मान्यता देणारा कायदा केला. आंतरजातीय विवाह वैध ठरविणारा कायदाही त्यांनी अस्तित्वात आणला. 11 जुलै 1919 रोजी काडीमोड कायदा करून तो सर्वजातीधर्माला लागू करून स्त्रियांना स्वातंत्र्य बहाल केले. देवदासीला होणाऱ्या अपत्याला ते ज्यांच्यापासून झालेले असेल त्यांच्या मालमत्तेत बरोबरीचा वाटा देण्याचा कायदा करून देवदासी, मुरळी, जोगतीन इ. महिलांना पत्नीचा दर्जा देण्याचा प्रयत्न केला.

पूर्वी (आजही) शिमग्याच्या सणाच्या दिवशी महिलांना अश्लील, बीभत्स, अर्वाच्च शिव्या देण्याची प्रथा होती. महाराजांनी ही अनिष्ट प्रथा बंद करण्यासाठी 19 मार्च 1921 रोजी जाहीरनामा प्रसिध्द केला आणि हुकुमाविरूध्द वर्तन करणाऱ्यास शिक्षा करण्याचे फर्मान काढले. 18 वर्षे वय पूर्ण करणाऱ्या पुरूषास वयात आला असे समजले जात असे. (स्त्रियांसाठी हे वय 8-10 वर्षे एवढे मानले जात असते.) 3 सप्टें.1906 रोजी छत्रपती शाहूंनी जाहीर केले की, वयात येण्यासाठी पुरूषासाठी जे वय मानले जाते तेच वय स्त्री वर्गासाठी देखील मानले जाईल. या घोषणेची नोंद करवीर गॅझेटियरमध्ये करून संस्थानात स्त्री-पुरूष समानतेच्या तत्वाचा पाया घातला. हिंदू कुटुंब पध्दतीचा पूर्ण अभ्यास असणाऱ्या छत्रपती शाहूंनी कुटुंबात स्त्रीला मिळणारी वागणूक, तिचा कुटुंबातच होणारा छळ आणि तिला कुटुंबातील व्यक्तीकडूनच दिला जाणारा शारीरिक व मानसिक त्रास विचारात घेऊन कौटुंबिक क्रूरपणाच्या वर्तनास प्रतिबंध करणारा कायदा केला व या कायद्यातही दोषी

व्यक्तीला सहा महिन्याचा कारावास व दोनशे रूपयापर्यंतचा दंड आकारण्याची तरतूद केली.(भारत सरकारने असा कायदा इ.स. 2006 मध्ये केला आहे.)

स्त्रियांना पुरूषांच्या बरोबरीचा दर्जा मिळवून देण्यासाठी छत्रपती शाहूंनी एका बाजूने जात, रूढी, धर्म, परंपरा, प्रथा इ. च्या माध्यमाने स्त्रियांचे होणारे शोषण व अवमान थांबविण्यासाठी अत्यंत कठोर स्वरूपाचे कायदे केले, तर दुसऱ्या बाजूने स्त्री वर्गात स्वत्वाची जाणीव निर्माण करून देऊन त्यांच्यात स्वयंपूर्णता, आत्मनिर्भरता, स्वातंत्र्य, समता इ.वाढविण्यासाठी त्यांना शिक्षण देण्याबरोबरच त्यांचे प्रबोधन केले. स्त्रियांनी शिक्षण घ्यावे यासाठी फी माफ करून त्यांना शिष्यवृत्या दिल्या, स्त्रियांना शिक्षण घेण्यासाठी प्रोत्साहन मिळाले म्हणून राज्याच्या शिक्षणाधिकारी पदी मिसलिटल, रखमाबाई केळकर, इ. महिला नेमल्या. कृष्णाबाई केळकर या विद्यार्थीनीला मेडीकल कॉलेजमध्ये शिक्षणासाठी पाठविले. स्त्रियांसाठी स्वतंत्र शाळा काढल्या प्रौढ स्त्रियांच्या शिक्षणाबाबतही छत्रपती शाहू दक्ष होते. इ.स. 1919 मध्ये त्यांनी फर्मान काढले की, शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या सर्व स्त्रियांसाठी राहण्या जेवणाची सर्व व्यवस्था ही दरबाराकडून केली जाईल. एवढ्यावरच ते थांबले नाहीत, तर काही स्त्रियांना उच्च शिक्षणासाठी परदेशात देखील पाठविले. थोडक्यात स्त्रियांना समाजात पुरूषांच्या बरोबरीचे स्थान निर्माण करून देण्यासाठी सर्व प्रकारचे प्रयत्न त्यांनी केले.

## विकासासाठी आरक्षण

डॉ. अमर्त्यकुमार सेन यांनी विकासासंदर्भात म्हटले आहे की, दारिद्रयाच्या रेषेखालील तळाकडील लोकांना विकास प्रक्रियेचा किती लाभ मिळाला यावरून आर्थिक विकासाचे मोजमाप करावे. कारण जन्मत: मिळालेल्या अधिकाराचा वापर करण्याची देखील कुवत त्यांच्यात नसते. छत्रपती शाहू महाराजांनी आरक्षणनीतीचा वापर करून अत्यंत हलाखीचे जीवन जगणाऱ्या सामाजिक, आर्थिक व राजकीयदृष्टचा पंगु असलेल्या अस्पृश्य समाजाला आरक्षणाचा कृत्रिम आधार देऊन त्यांना आपले अधिकार व स्वातंत्र्य उपभोगण्यास आवश्यक वातावरण निर्मिती केली. दुर्बल घटकांच्या स्वउन्नतीसाठी काही विशेष संधी (सवलती) उपलब्ध करून देणे म्हणजेच आरक्षण होय. 26 जुलै 1902 रोजी छत्रपती शाहूंनी दबलेल्या व समाजातील अत्यंत तळाच्या लोकांना विकासाचा लाभ मिळावा यासाठी आरक्षण विषयक अध्यादेश काढला व समाजातील गरीब लोकांना राष्ट्रीय संपत्तीचा समान वाटा मिळेल यासाठी प्रयत्न केले. कारण संपत्तीचे समान वाटप म्हणजेच आर्थिक विकास होय.

आर्थिक विकास म्हणजे काय? याचे छत्रपती शाहू महाराजांना पूर्ण ज्ञान होते म्हणून त्यांनी राज्याची सूत्रे हाती घेताच विकासाच्या आर्थिक घटकात सुधारणा तर केलीच, त्याचबरोबर विकासाच्या सामाजिक घटकांकडेही दुर्लक्ष केले नाही. समाजातील जातीयता संपुष्टात आणण्यासाठी त्यांनी कसोशीने प्रयत्न केले. स्त्री उध्दाराचे अनेक कायदे केले, शिक्षण प्रसार केला व दुर्बलांना बल देण्यासाठी आरक्षणनीतीचा अवलंब केला. समाजात राजकीय, आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक समता प्रस्थापित होईल यासाठी अनेक धोरणे आखली. अर्थात छत्रपती शाहूंनी आर्थिक विकासासाठीच्या काही बाबी सक्तीने, काही शिक्षणाने तर काही

प्रबोधनाने साध्य केल्या. महाराष्ट्र मानव विकास अहवाल 2002 मध्ये किंवा अमर्त्य सेन यांनी विकासासाठी आवश्यक असणाऱ्या ज्या बाबींचा उल्लेख केलेला आहे त्या घटकांच्या प्रस्थापनेसाठी छत्रपती शाहू महाराजांनी इ.स. 1894 पासून प्रयत्न करून विकासनीतीचा पाया घातलेला आहे. म्हणून छत्रपती शाहूंना विकास नितीचा प्रणेता म्हणणे अगदी सार्थ वाटते.

## संदर्भ यादी


1. Ghuge V. B. (1994) : Rajarshi Shahu Model Ruler, Kirti Prakashan, Aurangabad.
2. Jean Dreze, Amartya sen (1995): India Economic Development and Social Opportunity, Oxford Universily Press. New Delhi.
3. जाधव रमेश, (1992) : राजर्षी शाहू छत्रपती : वाद आणि वास्तव, शैलेंद्र प्रकाशन, मुंबई.
4. जाधव रमेश (1997): लोकराजा शाहू छत्रपती, शैलेंद्र प्रकाशन, मुंबई.
5. कांबळे उत्तम (2003): राजर्षी शाहू महाराज आणि महिला मुक्ती, सुगावा प्रकाशन, पुणे.
6. महाराष्ट्र शासन (2003): मानव विकास अहवाल 2002, नियोजन मंडळ महाराष्ट्र सरकार, मुंबई.
7. पवार जयसिंग (संपा) (2007): राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, कोल्हापूर.
8. पानतावणे गंगाधर (संपा) (2007): अस्मितादर्श वार्षिक विशेषांक वर्ष ३५, अंक – 3,श्रावस्ती, औरंगाबाद.
9. साळुखें पी.बी. (संपा.) (1976): राजर्षी शाहू गौरव ग्रंथ, शिक्षण विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

# कोल्हापूर जिल्ह्यातील गगनबावडा तालुक्यातील नैसर्गिक साधनसंपत्ती व भू-जैव विविधता आणि प्रादेशिक विकास - एक अभ्यास

**धर्मा रानबा धेडे**
अर्थशास्त्र विभाग
यशवंतराव चव्हाण वारणा महाविद्यालय,
वारणानगर, जि.कोल्हापूर. - 416 113

**प्रस्तावना:-**

कोल्हापूर जिल्ह्याचे भौगोलिक क्षेत्रफळ 7,692 चौ.कि.मी. असून जिल्ह्याचा बहुतांश भाग दख्खन पठाराने व्यापलेला आहे. विशेषतः पन्हाळा, उत्तर दूधगंगा व चिकोडी या जिल्ह्यातील प्रमुख डोंगर रांगा आहेत. वास्ताविक या डोंगर रांगा म्हणजेच सह्याद्रीच्याच शाखा, उपशाखा आहेत. कोल्हापूर जिल्ह्याचा पश्चिम भाग उंच व डोंगराळ आहे. त्यामुळे तेथे थंड हवामान आहे. परंतु पश्चिमेकडून पूर्वेकडे जावे तसतसे उष्ण व कोरडे हवामान होत गेले आहे.

पश्चिम घाट विभागामध्ये एकूण 300 तालुक्यांचा समावेश होतो. समुद्र सपाटीपासून पश्चिम घाटाची सरासरी उंची 1200 मीटर आहे. त्यामध्येच गगनबावडा तालुक्याचा समावेश होतो. गगनबावडा तालुक्याचे भौगोलिक क्षेत्रफळ 279.30 चौ.कि.मी. आहे. या तालुक्याच्या एकूण भौगोलिक क्षेत्रफळापैकी 58.12 टक्के भाग डोंगराळ आहे.गगनबावडा तालुक्यामध्ये उंच उंच डोंगर रांगा आहेत. इतर तालुक्यापेक्षा पावसाचे प्रमाण सर्वात जास्त याच तालुक्यामध्ये आहे. मात्र इतर तालुक्यापेक्षा गगनबावडा तालुक्याचा विकास कमी झालेला आहे. ही वास्तवता दर्शविण्यासाठी हा विषय निवडण्यात आला आहे.

**जमीनीचा वापर :-**

नैसर्गिक साधन संपत्तीमधील जमीन हा सर्वात महत्वाचा घटक आहे. या घटकांवरच इतर साधन संपत्तीचे प्रमाण अवलंबून असते व त्यावर विकास अवलंबून असतो. गगनबावडा तालुक्यातील एकूण भौगोलिक क्षेत्रफळ व जमीनीचा वापर पुढील तक्त्यामध्ये दर्शविला आहे.

**तक्ता क्र. १**

जमीनीचा वापर (हेक्टर) (२००६-२००७)

| एकूण भौगोलिक क्षेत्रफळ | जंगलव्याप्त क्षेत्र | शेतीला उपलब्ध नसलेले क्षेत्र | | पडिक जमीनी व्यतिरिक्त लागवड न झालेली एकूण जमीन |
|---|---|---|---|---|
| | | बिगरशेती वापरा खालील जमीन | पडित/लागवडी लायक नसलेली | |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| 28228 | 10626 | 260 | 1022 | 2617 |

| पडित जमीन | | निव्वळ क्षेत्र | एकापेक्षा अधिक (दुसोटा क्षेत्र) | लागवडी खालील एकूण क्षेत्र | लागवडी लायक क्षेत्र |
|---|---|---|---|---|---|
| चालू पड | इतर पड | | | | |
| 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 |
| 236 | 488 | 12979 | 18566 | 31545 | 16320 |

आधार- कृषी आयुक्तालय, पुणे (2006-2007)

उपलब्ध जमिनीपैकी लागवडी खालील एकूण क्षेत्र 31545 हेक्टर आहे. परंतु पडित जमीनीचे एकूण क्षेत्र 724 हेक्टर आहे.पडित जमीनी व्यतिरिक्त लागवड न झालेली एकूण जमीन 2617 हेक्टर आहे. याशिवाय लागवडी लायक क्षेत्र 16320 हेक्टर आहे.

**निष्कर्ष :**

एकूण जमीनीपैकी लागवडी खालील क्षेत्राचे शेकडा प्रमाण 21% आहे.

**सिंचन सुविधा :**

पाणी म्हणजे जीवन होय. सजीवांना जीवन जगण्यासाठी, शेतीसाठी, उद्योगासाठी पाण्याची आवश्यकता असते. पाणी उपलब्ध करून देण्यासाठी सिंचन सुविधा आवश्यक असतात. तेंव्हा गगनबावडा तालुक्यातील सिंचन सुविधांचा तपशील पुढील तक्त्यात दर्शविण्यात आलेला आहे.

**तक्ता क्र.2**

**सिंचन सुविधा (संदर्भ वर्ष 2006-07)**

| अ.नं. | सिंचनाचा प्रकार | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | विहीरींची एकूण संख्या (00-01) | | कूपनलिकांची एकूण संख्या | हातपंपाची एकूण संख्या | विद्युत पंपाची एकूण संख्या |
| 1 | एकूण | 629 | 20 | 516 | 04 |
| 2 | चालू | 609 | 20 | 516 | 04 |
| 3 | बंद | 20 | 00 | 00 | 00 |

थोडक्यात गगनबावडा तालुक्यामध्ये चालू विहीरींची संख्या 609, कुपनलिकांची संख्या 20, हातपंपाची संख्या 516 व विद्युत पंपाची संख्या 04 आहे.

**निष्कर्ष:**

सिंचन सुविधा गगनबावडा तालुक्यात अपुऱ्या आहेत.

**विविध साधनाखालील ओलिताचे क्षेत्र :-**

गगनबावडा तालुक्यातील विविध साधनांखालील ओलिताचे क्षेत्र हेक्टरमध्ये पुढील तक्त्यात दिले आहे.

**तक्ता क्र.3**

विविध साधनाखालीलओलिताचे क्षेत्र (हेक्टर) 2007-08

| ओलिता खालील क्षेत्र | | ओलिता खालील निव्वळ क्षेत्र | ओलिता खालील स्थूल क्षेत्र | एकूण लागवडी खालील स्थूल क्षेत्र | ओलिता खालील क्षेत्राची लागवडी खालील स्थूल क्षेत्राशी% |
|---|---|---|---|---|---|
| पृष्ठभागीय | विहीरी | | | | |
| 3706 | 4561 | 8267 | 8426 | 31545 | 26.71 |

आधार - कृषी आयुक्तालय, पुणे

गगनबावडा तालुक्यातील एकूण लागवडी खालील स्थूल क्षेत्राशी (31545)ओलिताखालील स्थूल क्षेत्राचे (8426 हे.) शेकडा प्रमाण 26.71% आहे.

**निष्कर्ष:**

शेती व्यवसायाला पाणी पुरवठा करणाऱ्या सुविधा अपुऱ्या आहेत. एकूण लागवडीखालील क्षेत्रापैकी केवळ 26.71% क्षेत्रच ओलिताखाली आहे.

**गोळा केलेला जमीन महसूल :**

गगनबावडा तालुक्यामध्ये शेती व्यवसाय तुरळक किंवा अल्प प्रमाणात केला जातो. संपूर्ण गगनबावडा तालुक्यात गोळा केलेला जमीन महसूल पुढील तक्त्यामध्ये दाखविलेला आहे.

**तक्ता क्र.4**

**गोळा केलेला जमीन महसूल (हजार रू.त) (हेक्टर) (2006-07)**

| जमीन महसूलाची एकूण चालू मागणी | जमीन महसूलाची थकबाकी | एकूण मागणी | सूट | नीलंबित वसूलीची रक्कम | 3+4+5 | प्रत्यक्ष वसूली | खातेदारांची संख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 9 | 0 | 9 | 0 | 0 | 9 | 9 | 10016 |

आधार-जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, कोल्हापूर जिल्हा

आधार-जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापूर, जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन कोल्हापूर जिल्हा.

जमीन महसूलाच्या तक्त्यावरून असे स्पष्ट होते की, गगनबावडा तालुक्यामध्ये महसूल भरणाऱ्या खातेदारांची संख्या 10016 आहे. या खातेदारांकडून 9 हजार रूपये जमीन महसुल प्रत्यक्षात वसुल झालेला आहे. जमीन महसुलाची एकूण चालू मागणी 9000 रूपये होती व प्रत्यक्ष वसूली 9000 रूपये झाली आहे.

**निष्कर्ष:**

गगनबावडा तालुक्याला जमीन महसूल अतिशय नगण्य मिळतो. अर्थातच शेती व्यवसाय अतिशय मागासलेला आहे.

**लोकसंख्येचा तपशील :**

लोकसंख्या हा घटक विकासातील केंद्रबिंदू आहे. त्यामुळे एकूण लोकसंख्या, स्त्री-पुरूष प्रमाण, कुटुंबाची संख्या, लोकसंख्येची घनता इत्यादी बाबींचा अभ्यास करणे महत्वाचे ठरते. गगनबावडा तालुक्यातील लोकसंख्येविषयीचा वरील सर्व बाबींचा तपशील पुढील तक्त्यात दिलेला आहे.

**तक्ता क्र.5.1**

**लोकसंख्येचा तपशील (2001)**

| ग्रामीण/नागरी | लोकसंख्या | | | कुटुंबांची संख्या (000) | लोकसंख्येची घनता | स्त्री-पुरूष प्रमाण |
|---|---|---|---|---|---|---|
| | एकूण | पुरूष | स्त्रिया | | | |
| एकूण | 32525 | 16521 | 16004 | 6 | 116 | 969 |
| ग्रामीण | 32525 | 16521 | 16004 | 6 | 116 | 969 |
| नागरी | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |

आधार - भारतीय जनगणना 2001.

गगनबावडा तालुक्यातील लोकसंख्येच्या अभ्यासावरून असा निष्कर्ष निघतो की,या तालुक्यातील एकूण 32525 इतकी लोकसंख्या पूर्णपणे ग्रामीण भागामध्ये आहे. नागरी लोकवस्तीचे प्रमाण शून्य(0)आहे.तसेच लोकसंख्येची घनता 116 आहे. त्यावरून लोकसंख्या अतिशय विरळ आहे हे स्पष्ट होते.मात्र स्त्री-पुरूष प्रमाण बऱ्यापैकी असल्याचे दिसते.

**निष्कर्ष:**

गगनबावडा तालुक्यामध्ये शहरीकरणाचा अभाव दिसतो. लोकसंख्येची घनता दर चौ.कि.मी. मध्ये 116 आहे. तसेच लोकसंख्येचा अभ्यास करताना साक्षरता, लोकसंख्येची अनु.जाती,अनु-जमाती इत्यादीचा अभ्यास करणे महत्वाचे असते. कारण त्यावरून मानवाच्या बौध्दिक विकासाची कल्पना येते. तसेच एकूण लोकसंख्या किती गावांमध्ये, शहरांमध्ये विभागलेली आहे याचा अभ्यास महत्वाचा असतो. म्हणून गगनबावडा तालुक्यातील लोकसंख्येचा अभ्यास करताना वरील बाबी विचारात घेतल्या असून त्या संबंधीचा तपशील पुढील पत्रकात दिलेला आहे.

**तक्ता क्र.5.2**

**लोकसंख्येचा तपशील (2001)**

| गावांची संख्या | शहरांची संख्या | लोकसंख्या | | | मागासवर्गीय लोकसंख्या (%) | | प्रक्षेपित लोकसंख्या (मार्च 2005) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | एकूण | पुरूष | स्त्रिया | अनु.जाती | अनु.जमाती | |
| एकूण 39 | -- | 60.74 | 75.29 | 46.01 | 13.90 | 0.35 | 34642 |
| ग्रामीण 39 | -- | 60.74 | 75.29 | 46.01 | 13.90 | 0.35 | 34642 |
| नागरी | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |

**आधार - भारतीय जनगणना** 2001

गगनबावडा तालुक्यातील गावांची एकूण संख्या 39 असून शहरांची संख्या शून्य आहे. म्हणजेच नागरीकरण झालेले नाही. तसेच एकूण साक्षरतेचे प्रमाण सरासरी 61% च्या जवळपास असले तरी त्यामध्ये स्त्रियांचे प्रमाण (46.01%) पुरूषांच्या मानाने (75.29%) कमी आहे. या तालुक्यामध्ये अनु. जाती व जमाती या मागासवर्गीय लोकसंख्येचे प्रमाण एकूण लोकसंख्येच्या अनुक्रमे 13.90% व 0.35% आहे. म्हणजेच अनुसूचित जमातीचे प्रमाण नाममात्र आहे. मार्च 2005 मध्ये या तालुक्याची लोकसंख्या 34642 होती.

**निष्कर्ष:**

साक्षरतेचे सरासरी प्रमाण 60.74% असले तरी स्त्री साक्षरतेचे प्रमाण 46% च्या जवळपास आहे.

**दारिद्र्य रेषेखालील ग्रामीण कुटुंबे :**

गगनबावडा तालुका डोंगराळ असल्यामुळे या तालुक्यात शेतीचा व उद्योगांचा विकास झालेला नाही. त्यामुळे लोकांना रोजगार मिळत नाही. परिणामी उत्पन्न कमी म्हणून दारिद्र्यात लोकांना आपले जीवन जगावे लागते. दारिद्र्याचा तपशील पुढील तक्त्यात दर्शविलेला आहे.

**तक्ता क्र.6**

**दारिद्र्य रेषेखालील ग्रामीण कुटुंबे**

| गावातील कुटुंबांची एकूण संख्या | दारिद्र्य रेषेखालील कुटुंबे (मार्च 2007) | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | अनु.जाती | अनु.जमाती | इतर | एकूण | शेकडा |
| 6225 | 1200 | --- | 1289 | 1689 | 27.13 |

आधार :- प्रकल्प अधिकारी,जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा.

**निष्कर्ष:**

एकूण 6225 कुटुंबांपैकी 1689 कुटुंबे दारिद्र्य रेषेखाली आहेत. अर्थातच दारिद्र्याचे शेकडा प्रमाण 27.13 कुटुंबे असे आहे.

**सार्वजनिक वैद्यकीय सेवा :**

मानवी आरोग्य सुधारण्यासाठी वैद्यकीय सेवा महत्वाच्या असतात. वैद्यकीय सेवामुळे मानवाचे आयुर्मान उंचावण्यास मदत होत आहे. त्यामुळे सार्वजनिक वैद्यकीय सेवांचा पुरवठा शासनामार्फत केला जात आहे. तेंव्हा गगनबावडा तालुक्यात या सार्वजनिक वैद्यकीय सेवा किती प्रमाणात उपलब्ध आहेत ते पुढील तक्त्यात दर्शविले आहे.

**तक्ता क्र.7**

**सार्वजनिक वैद्यकीय सुविधा** (2006-07)

| रूग्णालये | दवाखाने | वसतिगृहे | प्रा.आ.केंद्रे | उपकेंद्रे | डॉक्टर वैद्य | परिचारिका |
|---|---|---|---|---|---|---|
| 01 | 00 | 00 | 02 | 09 | 08 | 20 |

आधार :

1) जिल्हा शल्य चिकित्सक, सामान्य रूग्णालय कोल्हापूर
2) जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद कोल्हापूर
3) आरोग्य अधिकारी,महानगरपालिका/ नगरपरिषद/कटक मंडळ

गगनबावडा तालुक्यातील सार्वजनिक, वैद्यकीय सुविधांचा तपशील वरील तक्त्यात दिला आहे. त्यावरून असा निष्कर्ष निघतो की, दवाखाने, वसतिगृहे यांचे प्रमाण शुन्य आहे. पूर्ण तालुक्यामध्ये 08 डॉक्टर आहेत. म्हणजेच 4070 लोकसंख्येमागे एक डॉक्टर व 1630 लोकसंख्येमागे एक परिचारिका असे प्रमाण आहे. तसेच संपूर्ण तालुक्यामध्ये 1 रूग्णालय, 2 प्रा.आ.केंद्रे, 06 उपकेंद्र आहे. याचा निष्कर्ष असा निघतो की, या तालुक्यामध्ये सार्वजनिक वैद्यकीय सुविधा अत्यल्प आहेत.

**निष्कर्ष :-**

4070 लोकांसाठी 1 डॉक्टर असे प्रमाण आहे; तर 1630 लोकांसाठी 1 परिचारिका आहे. दवाखाने व वसतिगृहे अस्तित्वातच नाहीत.

**पोस्ट आणि दूरध्वनी सेवा :**

सध्याच्या काळात पोस्ट व दूरध्वनी सेवा अत्यावश्यक बनल्या आहेत. या सेवामुळे जगाशी आपण संपर्क करू शकतो. त्यामुळे शहरी भागाबरोबरच ग्रामीण भागामध्ये देखील या सेवा आज अत्यावश्यक बनल्या आहेत. त्यासाठी गगनबावडा तालुक्यामध्ये पोस्ट आणि दूरध्वनी सेवांची स्थिती काय आहे ते पुढील तक्त्यामध्ये दर्शविले आहे.

**तक्ता क्र.8**

**पोस्ट आणि दूरध्वनी सेवा** (31 **मार्च** 2007)

| पोस्टांची संख्या | तारघरांची संख्या | पत्रपेट्यांची संख्या | पोस्टमनांची संख्या | पोस्ट सुविधा गाव संख्या | वैयक्तिक दूरध्वनी (ग्रा.+श.) | सार्व.दूरध्वनी केंद्राची संख्या (PCO) |
|---|---|---|---|---|---|---|
| 12 | 01 | 32 | 07 | 12 | 1058 | 172 |

आधार :

1) अधिक्षक, पोस्ट व तारघर, कोल्हापूर विभाग,
2) महाव्यवस्थापक, कोल्हापूर दूरसंचार कोल्हापूर

गगनबावडा तालुक्यात एकूण 39 गावे आहेत. त्यापैकी केवळ 12 गावामध्ये पोस्ट सुविधा आहेत. याचाच अर्थ 27 गावे यापासून वंचित आहेत. तसेच पूर्ण तालुक्यामध्ये एकच (1) तारघर आहे. तसेच पोस्टांची संख्या जरी 12 असली तरी

पोस्टमनांची संख्या केवळ 7 आहे. शिवाय वैयक्तिक दूरध्वनी व सार्वजनिक दूरध्वनी केंद्राची संख्या (पी.सी.ओ) अनुक्रमे 1058 व 172 आहे. थोडक्यात पोस्ट आणि दूरध्वनी सेवांचे प्रमाण अत्यल्प आहे.

**निष्कर्ष :-**

5 ते 6 गावांसाठी एक पोस्टमन आहे; तर 3 ते 4 गावांसाठी 1 पोस्ट कार्यालय आहे. याशिवाय संपूर्ण तालुक्यासाठी 1 तारघर आहे.

**समस्या :-**

गगनबावडा तालुका अति पावसाचा व अति डोंगरांचा असल्यामुळे तालुक्याला अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. या समस्या थोडक्यात पुढीलप्रमाणे सांगता येतील.

**1)जमीनीची धूप :**

डोंगर उतारावरून पाऊस, वारा, नद्यांच्या प्रवाहांमुळे मातीची धूप होत आहे. त्यामुळे जमीनीची सुपिकता व उत्पादन क्षमता कमी होत आहे. तसेच जंगलतोड केल्यामुळे जमीन उघडी पडते व धूप घडून येते.

**२)पायाभूत सुविधांचा अभाव:**

सामाजिक व आर्थिक विकास होण्यासाठी पायाभूत सुविधांचा विकास होणे महत्वाचे असते. उदा. पाणी पुरवठा, वीज पुरवठा, रस्ते, वाहतूक, दळणवळण, शिक्षण, आरोग्य इत्यादी. परंतु या पायाभूत सुविधांचा या तालुक्यात अभाव दिसतो.

**3)उद्योगधंदे :-**

सर्वांगीण प्रादेशिक विकास होण्यासाठी त्या प्रदेशात विविध प्रकारचे उद्योगधंदे विकसित होणे आवश्यक असते. परंतु गगनबावडा तालुका अति पावसाचा व अति डोंगर रांगाचा असल्यामुळे येथे पायाभूत सुविधांचा विकास न झाल्यामुळे उद्योगधंदे विकसित झाले नाहीत.

**4)जलसिंचन सुविधांचा अभाव :-**

गगनबावडा हा तालुका अति पावसाचा आहे. त्यामुळे पावसाच्या हंगामात प्रचंड पाऊस पडतो व पावसाचे पाणी वाहून जाते. परंतु उन्हाळ्यामध्ये पिण्यासाठी लोकांना पाणी मिळत नाही असे चित्र आहे. कायमस्वरूपी जलसिंचन सुविधा उपलब्ध केलेल्या नाहीत.

**5)खडकाळ आणि डोंगराळ भूप्रदेश :-**

गगनबावडा तालुका हा डोंगर रांगाचा असून खडकाळ आहे. त्यामुळे तेथील शेतीचे आकारमान लहान आहे. त्यावर आधुनिक पध्दतीने शेती करता येत नाही. कसेबसे पावसाच्या हंगामात एक पीक घेतले जाते. त्यामुळे शेतीची उत्पादकता कमी असल्याने उत्पादन कमी होते.

**6) लोकांचे स्थलांतर:-**

शेतीचा व उद्योगांचा विकास या तालुक्यात न झाल्यामुळे वर्षभर तरूणांना रोजगार मिळत नाही. तालुक्यातील तरूण वर्ग रोजगारानिमित्त मुंबईकडे स्थलांतरीत झालेला आहे. त्यामुळे या तालुक्यात लहान मुले, स्त्रिया, वयोवृध्द व्यक्तींचे प्रमाण अधिक दिसून येते.

**7)निरक्षरता :-**

गगनबावडा तालुक्यात साक्षरतेचे सरासरी प्रमाण 60.74% असले तरी त्यामध्ये स्त्रियांच्या साक्षरतेचे प्रमाण 46.01% आहे. एकंदरित साक्षरतेच्या प्रमाणाचा विचार केल्यास या तालुक्यात अजूनही 50% हून अधिक महिला निरक्षर आहेत.

**सारांश :-**

प्रस्तुत शोध निबंधामध्ये कोल्हापूर जिल्ह्यातील गगनबावडा तालुक्यातील जमीनीचा

वापर, सिंचन सुविधा, ओलिताचे क्षेत्र, गोळा केलेला जमीन महसूल, पोस्ट आणि दूरध्वनी सेवा, सार्वजनिक वैद्यकीय सुविधा, लोकसंख्येचा तपशील, दारिद्रय रेषेखालील ग्रामीण कुटुंबे, डोंगराळ भागातील समस्या इत्यादी बाबींचा अभ्यास करण्यात आलेला आहे.

**संदर्भ :-**


1) जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, कोल्हापूर जिल्हा (अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन) 2005-2006,2006-07,2007-08
2) महाराष्ट्र राज्य सांख्यिकी गोषवारा
3) महाराष्ट्रातील जिल्ह्ये – के. सागर 2006
4) संतोष दास्ताने : महाराष्ट्र 2007
5) दाते/सौ. दाते – सुगम भू- विज्ञान
6) डॉ. प्रकाश सावंत–भारताचा भूगोल


**टीप :-**

हा लेख मांडणी व विश्लेषण पध्दतीच्या दृष्टीने प्राथमिक आहे. तथापि, पश्चिम घाटाच्या आजू बाजूला डोंगराळ प्रदेशात आधुनिक अर्थाने सेवा सुविधांच्या दृष्टीने आर्थिक विकासाचा अभाव किती आहे याचे गंभीर वास्तव या लेखातून व्यक्त होते. अशाच मागास तालुक्यांचा इतर डोंगराळ प्रदेशातील प्राथमिक तथ्यावर आधारित अभ्यास होणे गरजेचे आहे. अशा विषयावर लेखकांनी जरूर लक्ष द्यावे अशा लेखांचा प्रकाशनासाठी अधिक प्राधान्याने विचार केला जाईल.

–जगन्नाथ पाटील

संपादक

# महाराष्ट्राच्या कृषी क्षेत्राचा विकास

**दिलीप पाटील**
कार्याध्यक्ष, मराठी अर्थशास्त्र परिषद

**प्रस्तावना:**

शेतीचा विकास हा आर्थिक विकासातील गाभा आहे. आजपर्यंत आर्थिक विकासामध्ये शेतीची भूमिका अत्यंत महत्वाची राहिलेली आहे. जसे की राष्ट्राला अन्नधान्यांचा पुरवठा करुन, निर्यात वाढवून आणि कृषी क्षेत्राकडून उद्योग क्षेत्राकडे मनुष्यबळाचा पुरवठा करुन भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये विविध क्षेत्रांचा राष्ट्रीय समृध्दीमध्ये उत्पादन वाढविण्यात समावेश होतो. परंतु कृषी क्षेत्र हे एकमेव महत्वाचे क्षेत्र राहिलेले आहे. सध्या कृषी क्षेत्र देशाच्या 2/3 लोकांना उदरनिर्वाहाचे साधन म्हणून आधार देत आहे. ते 56.7% लोकांना रोजगार पुरविते. एकूण निर्यात उत्पन्नापैकी 14.7% उत्पन्न हे कृषीक्षेत्र निर्यातीपासून मिळते.

लोकसंख्येच्या बाबतीत महाराष्ट्र हे देशातील दुसऱ्या क्रमांकाचे तर भौगोलिक क्षेत्राच्या बाबतीत तिसऱ्या क्रमांकाचे राज्य आहे. दरडोई राज्य घरेलू उत्पादनामध्ये तिसऱ्या क्रमांकावर आहे. तसेच महाराष्ट्र हे औद्योगिक प्रगत राज्य म्हणूनही ओळखले जाते. शेती आणि संलग्नित व्यवसायाचे अजूनसुध्दा महाराष्ट्रात प्राबल्य आहे. एकूण लोकसंख्येच्या बहुतेक लोकांचे शेती हेच उत्पन्नाचे मुख्य साधन राहिलेले आहे. सन 2001 च्या जनगणनेनुसार, 55.41% लोकसंख्या शेतीवरती अवलंबून आहे. तरीसुध्दा शेतीचा राज्य उत्पन्नातील हिस्सा सातत्याने घटत आहे. निव्वळ राज्य उत्पन्नातील कृषी व संलग्नित व्यवसायाचा हिस्सा 1961-62 मध्ये 36% एवढा होता तर 2001-02 मध्ये 16% व 2005-06 मध्ये 12% एवढा होता.थोडक्यात, कृषी क्षेत्राचा हिस्सा सातत्याने घटत आलेला आहे.

राष्ट्रीय सरासरीच्या तुलनेने शेती क्षेत्राचा निव्वळ राज्य उत्पनातील हिस्सा कमी आहे. म्हणूनच महाराष्ट्राच्या कृषी विकासाचा अभ्यास, चिंतन करणे महत्वाचे वाटते आणि या आधारावरतीच भविष्यात महाराष्ट्राच्या कृषी विकासाची वाढ कशी असेल ते सूचित करता येईल.

## संशोधन पध्दती:

शेती क्षेत्राचे महत्व लक्षात घेता कृषी वृध्दीतील विविध घटकांच्या योगदानाची राज्य आणि विभागीय पातळीवर सांख्यिकी तपासणी करुन कृषी विकासासाठी राबविण्यात येणाऱ्या योजनांचे मूल्यमापन करणे सोयीचे ठरते; जेणेकरुन समाधानकारक पातळीवरती कृषी वृध्दी नेणे सोईस्कर ठरेल. शेती क्षेत्रावरती परिणाम करणारे अनेक घटक आहेत पण त्यापैकी पिकाखालील क्षेत्र, उत्पादन, उत्पन्न आणि आदानांचा वापर इ. घटक महत्वपूर्ण ठरतात म्हणून सदर लेखात त्यांना विशेष महत्व देण्यात आले आहे.

सदर अभ्यासासाठी दुय्यम स्त्रोताचा पूर्णपणे वापर करण्यात आला आहे. पिकाखालील क्षेत्र, उत्पादन, उत्पादकता आणि आदानांचा वापर यांच्या समय सारणी माहितीचा वापर करण्यात आलेला आहे. समय सारणी माहिती ही कृषी विषयक सांख्यिकी माहिती अहवाल (Epitome II), 1980-81 ते 2004-05 महाराष्ट्राची आर्थिक पाहणी, सांख्यिकी गोषवारा आणि इतर संदर्भ पुस्तके यातून माहिती घेण्यात आली आहे. कृषी वृध्दी आणि कृषी वृध्दीमध्ये योगदान देणाऱ्या विविध घटकांचे वर्गीकरण (सन 1980-81 ते 2004-05) करण्याचा प्रयत्न सदर लेखामध्ये करण्यात आला आहे. या अभ्यासाची उद्दिष्टे ठरविण्यात आलेली आहेत ती पुढीलप्रमाणे:

1) महाराष्ट्र राज्यातील मुख्य पिकाखालील क्षेत्र, उत्पादन आणि उत्पादकता यातील वृध्दी मोजणे.
2) कृषी क्षेत्रातील मुख्य आदाने वापरातील वृध्दी मोजणे.
3) कृषी क्षेत्राचे राज्य उत्पादनातील योगदानाचा अभ्यास करणे.
4) महाराष्ट्र राज्याच्या कृषी विकासासाठी योग्य उपाय सुचविणे.

## महाराष्ट्रातील शेतीची सद्य:स्थिती:

या भागामध्ये महाराष्ट्रातील कृषीची सद्यपरिस्थिती दर्शवण्याचा प्रयत्न केला आहे. महाराष्ट्राच्या जमीनीचे वर्गीकरण पाहिल्यास असे आढळून येते की, राज्याचे भौगोलिक क्षेत्र 3.8 लाख चौ.कि.मी. असून त्यापैकी निव्वळ कृषी खालील जमीन सुमारे 1.77 लाख चौ.कि.मी म्हणजे 57.50% एवढी जमीन पिकाखाली येते. हेच प्रमाण राष्ट्रीय पातळीवर 43.4% एवढे आहे. एकूण सिंचनाखालील क्षेत्राचे स्थूल पिकाखालील क्षेत्राशी प्रमाण 39.7% एवढे राष्ट्रीय पातळीवरती ; तर हेच प्रमाण 17.30%: एवढे राज्यपातळीवरती दिसून येते. महाराष्ट्र राज्यात 82.7% एवढे शेतीखालील क्षेत्र प्रत्यक्षात पावसावरती अवलंबून आहे. जवळपास एक तृतीयांश एवढे क्षेत्र पर्जन्य छायेखालील क्षेत्र आहे.

राज्याचा आर्थिक विकास हा तीन क्षेत्रावरती अवलंबून असतो. त्यापैकी प्राथमिक क्षेत्राचा वाटा महत्वपूर्ण असतो. महाराष्ट्रातील प्राथमिक क्षेत्राचा वृध्दीदर 3.6% एवढा 2001-02 मध्ये होता. तो 6% एवढा 2003-04 मध्ये तर 6.5% एवढा वृध्दीदर सन 2005-06 मध्ये होता. सध्या स्थूल राज्य उत्पादना (SDP) मध्ये प्राथमिक क्षेत्राचा वाटा 13.5% एवढा आहे आणि विशेषत: त्यामध्ये कृषी क्षेत्राचा वाटा 12% एवढा आहे. वरील आकड्यावरुन असे दिसते की, स्थूल राज्य उत्पादनातील कृषी क्षेत्राचा वाटा सातत्याने घटत चाललेला आहे. कारण शेती विकासाचा दर हा इतर क्षेत्रविकास दरापेक्षा नेहमी कमी राहिलेला आहे.

गेल्या चार दशकामध्ये महाराष्ट्रात उत्पादकता वृध्दी कार्यक्रम राबविण्यात आला. परिणामी, कृषी उत्पादन मोठया प्रमाणात वाढले, पिकाखालील क्षेत्र वाढले आहे. रासायनिक खतांचा

10 पटीने प्रति हेक्टर वापर झाला, परंतु सध्या ते इतर प्रगत राज्यांपेक्षा कमी प्रमाणात आहे. जलसिंचनाच्या बाबतीत महाराष्ट्रामध्ये 17.3% एवढी जमीन ओलिताखाली आहे आणि हे प्रमाण पंजाब (95.3%), हरियाना (75%), तामिळनाडू (48%) आणि राष्ट्रीय सरासरी (39.3%) पेक्षा खूप कमी आहे. सदर लेखामध्ये वर नमूद केल्याप्रमाणे सद्यपरिस्थितीचा आढावा घेऊन कृषी विकासामध्ये योगदान देणाऱ्या पीक रचना, उत्पादकता आणि उत्पादन तसेच कृषी आदानांचा वापर या घटकांचा अभ्यास केला आहे.

**आर्थिक सुधारणा पूर्वी आणि नंतरच्या कालखंडातील शेतीचा विकासः**

सदर विभागामध्ये आर्थिक सुधारणा पूर्वी आणि नंतरच्या कालखंडातील कृषी क्षेत्राच्या कामगिरीचा समावेश केला आहे. सदरचा कालखंड हा एकूण चार उप कालखंडामध्ये विभागला गेला आहे तो पुढीलप्रमाणे (I) 1980-81 ते 1989-90 (II) 1991-2000(III)2001-2005आणि(IV)1981- 2005.

पिकाखालील क्षेत्र, उत्पादन आणि उत्पन्न यामधील प्रगती उप कालखंडात आणि एकूण कालखंडात कशी होती याचा आढावा घेण्यासाठी आणि त्या आधारावरती शेती विकासाची व्यूहरचना ठरविण्यासाठी एकूण कालखंडाचे तीन उप कालखंडात विभागणी करण्यात आली. प्रत्येक उपकालखंडातील आणि एकूण कालखंडातील पिकाखालील क्षेत्र, उत्पादन आणि उत्पन्न यातील वार्षिक चक्रीय वृध्दीदर मोजण्यात आला आहे. या संदर्भात जे निष्कर्ष आढळून आले ते पुढीलप्रमाणे दर्शविलेले आहेत.

कोष्टक नं : 1 विविध पिकाखालील क्षेत्र, उत्पादन आणि उत्पन्न (1981-2005) वृध्दीदर%

| एकूण कालावधी 1980-81 ते 2004-05 | | | | |
|---|---|---|---|---|
| **अ.क्र.** | **पिके** | **क्षेत्र** | **उत्पादकता** | **उत्पादन** |
| 1 | तांदूळ | 0.02 | 0.44 | 0.48 |
| 2 | गहू | -1.27 | 4.08 | 2.34 |
| 3 | ज्वारी | 1.25 | 0.99 | -0.85 |
| 4 | बाजरी | -0.49 | 3.39 | 3.02 |
| 5 | इतर तृणधान्य | 0.96 | 2.61 | -8.68 |
| 6 | एकूण तृणधान्य | -1.01 | 1.38 | 0.37 |
| 7 | तूर | 2.01 | 0.76 | 2.80 |
| 8 | हरभरा | 2.84 | 2.42 | 5.34 |
| 9 | इतर डाळी | -0.06 | 2.33 | 2.32 |
| 10 | एकूण डाळी | 3.29 | 1.64 | 3.12 |
| 11 | एकूण अन्नधान्य | -0.52 | 1.25 | 0.89 |
| 12 | ऊस | 2.57 | 9.16 | 14.66 |
| 13 | कापूस | 0.67 | 3.32 | 4.04 |
| 14 | भुईमूग | -3.00 | -1.80 | 1.38 |
| 15 | करडई | -3.64 | -0.55 | -3.08 |
| 16 | सूर्यफूल | 1.4 | 5.86 | 2.48 |
| 17 | सोयाबीन | 19.80* | 6.173* | 17.96* |
| 18 | एकूण तेलबिया | 5.52 | 4.19 | 6.08 |

(स्त्रोत: कृषी विषयक सांख्यिकी माहिती अहवाल, 1981 ते 2005)

ते या कालखंडातील विविध पिकानुसार क्षेत्र, उत्पादन आणि उत्पादकतेतील चक्रीय वृध्दीदर वरील कोष्टकात दाखविलेला आहे. पिकांचे उत्पादन, पिकाखालील क्षेत्र आणि त्याची उत्पादकता यावरती अवलंबून असते. सदरच्या एकूण कालखंडातील विविध पिकांचा अभ्यास केल्यास ऊस, सोयाबीन, हरभरा, तेलबिया, कापूस पिकाचे उत्पादन चांगल्या पध्दतीने वाढल्याचे आढळून येते. एकूण कालखंडामध्ये अन्नधान्य पिकांपेक्षा बिगर अन्नधान्य पिकांचे उत्पादन वाढल्याचे दिसते,कारण एकूण वर्षामध्ये शेतीकडे पाहण्याचा दृष्टिकोण भले तो थोडयाथोडया प्रमाणात का असेना बदलत गेल्याने तसेच विविध पिकांच्या उत्पादकता वाढीचे कार्यक्रम, उच्च बी-बियाणांचा वापर, जलसिंचनाचा वापर इत्यादि विविध कारणांनी त्या त्या पिकाखालील क्षेत्र उत्पादन आणि उत्पादकता वाढल्याचे दिसते.

पिकाखालील क्षेत्राच्या बाबतीत तेलबिया, ऊस, सोयाबीन, हरभरा, कापूस, सूर्यफूल या पिकाखालील क्षेत्र वाढल्याचे दिसून आले.

ते या काळात तेलबिया सोयाबीन ,ऊस ,एकूण डाळी हरभरा आणि तूर नी पिकाखालील क्षेत्र वाढल्याचे दिसते. विशेष महत्वाचे म्हणजे अन्नधान्यापेक्षा बिगर अन्नधान्याखालील नगदी पिके क्षेत्र वाढल्याचे दिसते. कारण अन्नधान्य पिकांपेक्षा नगदी पिकांपासून मिळणारा आर्थिक फायदा जास्त आणि नगदी पीक घेणे प्रतिष्ठेचे समजले जाते. यामुळे पिकाखालील क्षेत्रातील बदल जाणवतो.

याच दरम्यान उत्पादकतेच्या बाबतीत ऊसाची उत्पादकता सर्वाधिक वाढल्याचे दिसून आले. त्यानंतर सोयाबीन, तेलबिया, बाजरी, गहू आणि डाळींची उत्पादकताही वाढल्याचे दिसते. महाराष्ट्रात विशेषतः पश्चिम महाराष्ट्रात ऊस पिकाखालील क्षेत्र जास्त राहिल्याने त्यासंबंधी विविध उत्पादकता वाढीचे कार्यक्रमांमुळेच उत्पादकता वाढल्याचे आढळते.

अगोदर उल्लेख केल्याप्रमाणे संपूर्ण अभ्यासाचा कालखंड हा तीन विभागात विभागला गेला आहे. कारण उप कालखंडामधील उत्पादन वृध्दीमध्ये योगदान देणाऱ्या विविध घटकांतील बदल तपासणे शक्य होते. यामधील पहिला उप कालखंड म्हणजे ते यातील क्षेत्र उत्पादन आणि उत्पादकता वृध्दीदर मोजला गेला आहे. तो खालील कोष्टाकावरुन दिसून येईल.

कोष्टक नं : 2 विविध पिकाखालील क्षेत्र, उत्पादन आणि उत्पन्न (1980-81 ते 1989-90) वृध्दीदर%

| कालावधी I 1980-81 ते 1989-90 | | | | |
|---|---|---|---|---|
| अ.क्र. | पिके | क्षेत्र | उत्पादकता | उत्पादन |
| 1 | तांदूळ | -0.06 | -0.65 | -0.56 |
| 2 | गहू | -4.25 | 2.48 | -3.25 |
| 3 | ज्वारी | -0.31 | 2.00 | 1.54 |
| 4 | बाजरी | 1.85 | 1.96 | 4.47 |
| 5 | इतर तृणधान्य | -1.22 | 1.13. | 1.21 |
| 6 | एकूण तृणधान्य | -0.29 | 1.24 | 1.06 |
| 7 | तूर | 3.20 | 2.55 | 6.36 |
| 8 | हरभरा | 4.48 | 4.27 | 9.14 |
| 9 | इतर डाळी | 0.98 | 5.92 | 6.98 |
| 10 | एकूण डाळी | 15.83 | 4.73 | 7.19 |
| 11 | एकूण अन्नधान्य | 0.24 | 1.41 | 1.76 |
| 12 | ऊस | 1.10 | 36.15 | 24.73 |
| 13 | कापूस | -0.11 | 3.17 | 3.06 |
| 14 | भुईमूग | 0.12 | 1.50 | 19.34 |
| 15 | करडई | 2.11 | -2.92 | 1.75 |
| 16 | सूर्यफूल | 5.87 | 2.64 | 14.27 |
| 17 | सोयाबीन | N.A. | 56.77* | N.A. |
| 18 | एकूण तेलबिया | 3.47 | 3.69 | 17.00 |

(स्त्रोत: कृषी विषयक सांख्यिकी माहिती अहवाल, 1981 ते 2005)

1980-81 ते 1989-90 हा कालखंड म्हणजे देशातील आर्थिक सुधारणा कार्यक्रमाच्या अगोदरचे आणि हरितक्रांतीनंतरचे दुसरे दशक म्हणून संबोधले जाते. या काळात महाराष्ट्राला कृषी विकास आणि त्यासाठी योगदान देणाऱ्या घटकांतील बदल नंतरच्या कालखंडापेक्षा कसा वेगळा आहे हे समजणे सोपे जाईल. या उप कालखंडात ऊसाचे उत्पादन मोठया प्रमाणात वाढले ते जवळपास 24.73% एवढे राहिले. त्यानंतर भुईमूग, तेलबिया, सोयाबीन, हरभरा, कापूस, बाजरी यांचे उतरत्या वृध्दी दराने उत्पादन वाढले. या कालखंडात एकूण अन्नधान्याचे उत्पादन फक्त 1.76% वार्षिक चक्रीय वृध्दीदराने वाढले. तर नगदी पिके विशेषतः तेलबिया 17%, ऊस 24.73%, भुईमुग 19.34% वार्षिक चक्रीय वृध्दीदराने वाढले. पिकाखालील क्षेत्र वाढीच्या बाबतीत डाळीचे क्षेत्र मोठया प्रमाणात वाढले. त्यांचे प्रमाण 15.83% एवढे वार्षिक चक्रीय वृध्दीदर होता. त्यानंतर सूर्यफूल 15.87%, हरभरा 4.48%, तूर 3.20% इतके वार्षिक चक्रीय वृध्दीदर वाढले. एकूण डाळीचे क्षेत्र मोठया प्रमाणात जरी वाढले असले तरी त्यांची उत्पादकता कमी असल्याने उत्पादनात विशेष अशी वाढ झाली नाही; उलट ऊसासारख्या पिकाचा विचार करता कमी प्रमाणात उत्पादकता वाढूनही उत्पादनात विशेष भर पडली. अन्नधान्य पिकांच्या बाबतीत मात्र या काळात पिकाखालील क्षेत्र कमी राहिले आणि त्यांची उत्पादकता कमी असल्याने उत्पादनात सुध्दा विशेष वाढ दिसून येत नाही. याच्या नेमके उलटे चित्र मात्र नगदी पिकांच्याकडे दिसते.

कोष्टक नं : 3 विविध पिकाखालील क्षेत्र, उत्पादन आणि उत्पादकता (1990-91 ते 1999-2000) वृध्दीदर%

| कालावधी II 1990-91 ते 1999-2000 | | | | |
|---|---|---|---|---|
| अ.क्र. | पिके | क्षेत्र | उत्पादकता | उत्पादन |
| 1 | तांदूळ | -0-84 | 2.10 | 1.05 |
| 2 | गहू | 3.31 | 1.86 | 5.25 |
| 3 | ज्वारी | -2.24 | -0.19 | -1.64 |
| 4 | बाजरी | -1.24 | 2.74 | 2.77 |
| 5 | इतर तृणधान्य | 3.22 | 1.79 | 5.24 |
| 6 | एकूण तृणधान्य | -0.99 | 1.44 | 0.42 |
| 7 | तूर | 0.21 | 5.85 | 6.09 |
| 8 | हरभरा | 5.88 | 1.26 | 7.22 |
| 9 | इतर डाळी | -0.99 | 2.84 | 2.10 |
| 10 | एकूण डाळी | 0.88 | -8.03 | 4.64 |
| 11 | एकूण अन्नधान्य | -0.53 | 1.56 | 1.08 |
| 12 | ऊस | 3.41 | 0.92 | 4.32 |
| 13 | कापूस | 2.70 | 3.84 | 6.68 |
| 14 | भुईमूग | -4.77 | 3.65 | 0.87 |
| 15 | करडई | -4.47 | -0.85 | -5.29 |
| 16 | सूर्यफूल | -1.05 | 18.84 | -2.58 |
| 17 | सोयाबीन | 20.70 | 5.20 | 26.97 |
| 18 | एकूण तेलबिया | 0.55 | 5.16 | 5.75 |

(स्त्रोत: कृषी विषयक सांख्यिकी माहिती अहवाल, 1981 ते 2005)

दुसऱ्या उप कालखंडाचा विचार करता हा कालखंड सर्वच घटकांसाठी महत्वाचा राहिला आहे. कारण राज्यातच नव्हे तर संपूर्ण देशातील आर्थिक बदलांचे वातावरण आणि त्यांची अमंलबजावणीचा कालखंड राहिलेला होता. या उप कालखंडात सर्वच पिकांचे उत्पादन अगोदरच्या उप कालखंडाशी तुलना करता कमी दराने वाढल्याचे दिसून येते.तसेच उत्पादकता आणि पिकाखालील क्षेत्रही कमी दराने वाढल्याचे आढळते.या दरम्यान पिकांच्या उत्पादनामध्ये नगदी पिके विशेषतः तेलबिया, सोयाबीन, हरभरा, कापूस, ऊस आणि गहू यांचे उत्पादन समाधानकारक वार्षिक वृध्दीदराने वाढल्याचे दिसते. पण उत्पादकतेमध्ये तेलबिया, सूर्यफूल आणि तूर वगळता इतर कोणत्याही पिकांच्या उत्पादनात विशेष वृध्दी जाणवली नाही. नगदी पिकामध्ये ऊसाचे गतकालखंडात 24.73%नी उत्पादन वाढले होते. पण उत्पादनातील वाढ या दशकात मोठया प्रमाणात खाली आली. पिकाखालील क्षेत्रासंदर्भात या उप कालखंडात हरभरा, ऊस, गहू, सोयाबीन इ पिके वगळता इतर पिकाखालील क्षेत्र घटल्याचे दिसते.

तिसरा उप कालखंड 2001 ते 2005 हा एकूण पाच वर्षाचा राहिला आहे. या तिस-या कालखंडात मात्र सर्वच घटकामध्ये घट झाल्याचे अगोदरच्या कालखंडाशी तुलना करता दिसून येते. पुढील कोष्टकावरुन अधिक स्पष्ट होईल या कालखंडाच्या दरम्यान सोयाबीन,सुर्यफूल,हरभरा आणि तेलबिया,ज्वारी पिकाखालील क्षेत्र वाढले

मात्र इतर पिकामध्ये घट झाल्याचे आढळते उत्पादकतेच्या बाबतीत सोयाबीन, गहू, तेलबिया, इतर तृणधान्ये इ पिकांच्याच उत्पादकतामध्ये वाढ झाली आहे. परिणामी सोयाबीन, तेलबियाणे, कापूस, हरभरा आणि भात इ. पिकांचेच उत्पादन वाढले.

कोष्टक नं : 4 विविध पिकाखालील क्षेत्र, उत्पादन आणि उत्पादकता (2000-01 ते 2004-5) वृध्दीदर%

| कालावधी III 2000-01 ते 2004-05 | | | | |
|---|---|---|---|---|
| अ.क्र. | पिके | क्षेत्र | उत्पादकता | उत्पादन |
| 1 | तांदूळ | 0.07 | 2.81 | 2.84 |
| 2 | गहू | -0.17 | 24.02 | -1.84 |
| 3 | ज्वारी | 2.36 | -0.86 | -4.82 |
| 4 | बाजरी | -3.74 | 5.33 | 1.48 |
| 5 | इतर तृणधान्य | 0.15 | 13.24 | -75.72 |
| 6 | एकूण तृणधान्य | -2.21 | 2.02 | -0.22 |
| 7 | तूर | -0.13 | -0.99 | -1.12 |
| 8 | हरभरा | 4.71 | 0.42 | 5.14 |
| 9 | इतर डाळी | -3.77 | 3.51 | -0.36 |
| 10 | एकूण डाळी | -0.84 | 1.65 | 0.78 |
| 11 | एकूण अन्नधान्य | -2.00 | 1.84 | -5.09 |
| 12 | ऊस | -13.58 | -5.45 | -18.31 |
| 13 | कापूस | -2.73 | 14.88 | 11.77 |
| 14 | भुईमूग | -4.43 | -10.02 | -1.63 |
| 15 | करडई | -4.70 | -0.11 | -4.82 |
| 16 | सूर्यफूल | 3.81 | 0.28 | -3.58 |
| 17 | सोयाबीन | 17.17 | 7.27 | 13.60 |
| 18 | एकूण तेलबिया | 7.05 | 5.95 | 8.04 |

(स्त्रोत: कृषी विषयक सांख्यिकी माहिती अहवाल, 1981 ते 2005)

2001 ते 2005 या कालखंडातील महाराष्ट्राच्या कृषी विकासाकडे बारीक लक्ष दिल्यास असे आढळते की,सोयाबीन वगळता विशिष्ट पिकांचे क्षेत्र वाढल्यास त्यांची उत्पादकता कमी असते. जर उत्पादकता जास्त असेल तर क्षेत्र घटलेले आहे. परिणामी कृषी उत्पादनातील वाढ समाधानकारक नाही. त्यामध्ये अस्थिरता दिसून येते.

पिकाखालील क्षेत्र, उत्पादन आणि उत्पादकतेचा जर विचार केला तर ऊस आणि सोयाबीन वगळता एकूण 25 वर्षाचा अभ्यास कालखंडात उत्पादन, उत्पादकता आणि क्षेत्र यातील अस्थिरता मोठ्या प्रमाणात जाणवते. पिकाखालील क्षेत्र अन्नधान्य पिकांऐवजी नगदी पिके घेत आहे तर दुसऱ्या बाजूस घटत्या कृषी विकासाकडे शासनाचे दुर्लक्ष होत चालले आहे. अर्थव्यवस्थेमध्ये फक्त सेवाक्षेत्रावरती दिला जाणारा भर आणि कृषी क्षेत्राकडे होत चाललेले दुर्लक्ष ही धोक्याची घंटा बनू पहात आहे.

**महाराष्ट्रातील कृषी क्षेत्रामध्ये आदानांचा वापरः**

कृषी विकासामध्ये आदानांचा वापर ही एक महत्वाची बाब आहे. कारण आदानाच्या वापराने पिकांची उत्पादकता आणि उत्पादन वाढते.

परिणामी कृषी विकासास चालना मिळते. या विभागात आपण अनेक आदाने घटकांचा अभ्यास करुन त्यांचा कृषी विकासातील योगदानाविषयी चर्चा करु शकतो. यामध्ये रासायनिक खतांचा वापर, जलसिंचन, उच्च बी-बियांणाखालील क्षेत्र, यंत्रे व अवजारांचा वापर पण सदर विभागात सांख्यिकीय माहिती अभावी दोनच आदानातील योगदानाचा विचार केला आहे, ते म्हणजे रासायनिक खतांचा वापर आणि जलसिंचन होय. रासायनिक खतामध्ये नत्र, स्फूरद आणि पालाश यांचा समावेश होतो. यांच्या आकडेवारी उपलब्धतेमुळे त्यातील बदल अभ्यासणे सुलभ होते. रासायनिक खताच्या वापरातील चक्रीय वृध्दीदर मोजून खालील कोष्टकात दर्शविलेला आहे.

कोष्टक नं : 5 महाराष्ट्रातील खतांच्या वापरातील चक्रीय वृध्दीदर %

| कालावधी | N | P | K |
|---|---|---|---|
| कालावधी I | 10.38 | 4.91 | -2.01 |
| कालावधी II | 13.79 | 5.68 | 1.59 |
| कालावधी III | 9.48 | 1.99 | -1.16 |
| एकूण कालावधी | 5.82 | 7.13 | 4.64 |

(स्त्रोत: कृषी विषयक सांख्यिकी माहिती अहवाल 1981 ते 2005)

महाराष्ट्राच्या गेल्या 25 वर्षाचा विचार करता शेतीमध्ये खत वापराचे प्रमाण वाढलेले आहे. यामध्ये नत्र 5.82% वार्षिक वृध्दीदराने वापर केल्याचे आढळते. तर स्फूरद 7.13% आणि पालाश 4.64% वार्षिक वृध्दीदराने यांचा वापर वाढल्याचे दिसते. उप कालखंड II मध्ये पहिल्या आणि तिसऱ्या उप कालखंडापेक्षा नत्र, स्फूरद आणि पालाश यांचा चांगल्या प्रमाणात वापर झाल्याचे दिसते. महाराष्ट्रात जवळपास 17.3% ओलिताखाली असणारी जमीन किंवा जिथे चांगल्या प्रकारचा मान्सून आहे अशा ठिकाणच्या पिकांसाठी वापरली जाणारी खतांची ही आकडेवारी सांगते.पण राज्यात अजून इतरही मोठया प्रमाणात कोरडवाहू जमीन आहे. तसेच गरीब शेतकरी अजूनही अशा खतांचा योग्य प्रमाणात वापर करत नाही.जर शेत जमीनीसाठी योग्य प्रमाणात खतांचा पुरवठा उपलब्ध झाल्यास पिकांची उत्पादकता आणि परिणामी कृषी उत्पादन वाढू शकते.

जलसिंचनाच्या बाबतीत विचार केल्यास ते शेती विकासामधील अति महत्वाचे आदान आहे. महाराष्ट्रातील जलसिंचनाचे प्रमाण इतर प्रगत राज्यांपेक्षा भरपूर कमी आहे.हे अगोदर उल्लेख केलेलेच आहे. पण एकूण सिंचना खालील क्षेत्र आणि स्थूल पिकाखालील क्षेत्राचे वाढीचे प्रमाण पाहिल्यास अजूनही वेगळी परिस्थिती लक्षात येते. पुढील कोष्टकावरुन ते अधिक समजण्यास मदत होईल.

कोष्टक नं : 6 महाराष्ट्रातील जलसिंचनातील चक्रीय वृध्दीदर (1981 ते 2001) (%)

| कालावधी | स्थूल ओलिताखालील क्षेत्र | स्थूल पिकाखालील क्षेत्र |
|---|---|---|
| कालावधी I | 4.42 | 0.82 |
| कालावधी II | 2.19 | 0.10 |
| एकूण कालावधी | 2.91 | 0.54 |

(स्त्रोत: कृषी विषयक सांख्यिकी माहिती अहवाल 1981 ते 2005)

एकूण कालखंडामध्ये स्थूल पिकाखालील क्षेत्र फक्त 0.54% वार्षिक वृध्दीदराने वाढले तर स्थूल ओलिताखालील क्षेत्र 2.91% वार्षिक वृध्दीदराने वाढले.याचा स्पष्ट अर्थ असा होतो की, पिकाखालील क्षेत्र हे ओलिताखालील क्षेत्रापेक्षा कमी प्रमाणात वाढत आहे. काही कालावधीनंतर ते असेच कमी कमी होऊ शकते.कारण शेत जमीनीचा बिगर शेतीसाठी वापर मोठया प्रमाणात वाढत चाललेला आहे. त्यावरती वेळीच नियंत्रण असायला पाहिजे. जलसिंचित क्षेत्राचे प्रमाण हे असमाधानकारक आहे. कारण पहिल्या उप कालखंडात 4.42% दराने वाढलेले होते. नंतरच्या कालावधीमध्ये मात्र निम्या पटीने घटले आहे. हेच प्रमाण अजूनही मोठया प्रमाणात वाढायला हवे. त्यासाठी जलसिंचनाचे विविध स्त्रोतांची निर्मिती करायला पाहिजे.

## सारांशः

महाराष्ट्र हे देशातील प्रगत राज्यांपैकी एक राज्य आहे.राज्यामध्ये अजूनही शेतीचेच प्राबल्य जास्त आहे. राज्याच्या स्थूल उत्पादनामध्ये प्राथमिक क्षेत्राचा 13.5% वाटा असला तरी त्यामध्ये शेती क्षेत्राचे जवळपास 12% एवढा हिस्सा आहे. महाराष्ट्रामध्ये शेती क्षेत्राचा स्थूल राज्य उत्पादनातील हिस्सा घटत आलेला आहे. कारण कृषी क्षेत्राचा वृध्दीदर हा नेहमीच इतर राज्यांपेक्षा कमी राहिलेला आहे. एकूण भौगोलिक क्षेत्रापैकी 57.5% जमीन लागवडीखाली असताना जलसिंचनाचे प्रमाण मात्र 17.3% एवढे कमी आहे. ही मोठी चिंताजनक बाब आहे. उत्पादकतेचा विचार करता महाराष्ट्रातील सर्वच पिकांची उत्पादकता कमी आहे. तसेच खत वापराचे प्रमाणही योग्य प्रमाणात नाही.

यासाठी राज्यामध्ये जलसिंचनाच्या स्त्रोतांची अपूर्ण असणारी कामे पूर्ण करुन जलसिंचनाचे क्षेत्र वाढवायला हवे.उत्पादक वृध्दीवर भर दयायला हवा. त्यासाठी कृषी आदानांचा पुरवठा आणि वापर व्हायला पाहिजे. तरच कृषी उत्पादनातील अस्थिरता कमी होण्यास मदत होईल. परिणामी कृषी विकासही होईल. या सर्व गोष्टींचा विचार करता महाराष्ट्रामध्ये नवीन कृषी सुधारणा कार्यक्रमाची योजना आणि अमंलबजावणी व्हावी. कारण कृषी समृध्दी देशाच्या किंवा राज्याच्या विकासामध्ये महत्वाचे योगदान देत असते.

## संदर्भ सूची :

1. Memoria C. B. (1999) : Agricultural Problems in India, Himalaya Publishing - House, New Delhi.

2. Sadhu and Singh (1999): Fundamentals of Agricultural Economics, Himalaya Pub. House, Bombay.
3. Desai R. G. (1998) : Agricultural Economics, Himalaya Pub. House, Bombay.
4. Economic and Political Weekly (1998), December : 19-25.
5. Govt. of Maharashtra : Agricultural Statistical Information, Part-II (1980-81 to 2004-2005 Reports)
6. Govt. of Maharashtra (2006-2007): Economic Survey of Maharashtra.
7. Alagh, Y. K. (2004): Globalisation and Agricultural Crisis in India, Deep & Deep Publication Pvt. Ltd., New Delhi.
8. Shrivastav, O. S. (1996): Agricultural Economics, Rawat Publication, New Delhi.

# स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजनेची प्रगती आणि प्रभाव

**भा.शं.खुरूद**
प्रपाठक व अर्थशास्त्र विभाग प्रमुख,
कला,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय,
राहुरी, जि.अहमदनगर
भ्रमणध्वनी - 9970981592

## 1. प्रस्तावना

स्वातंत्र्योत्तर काळात भारताच्या लोकसंख्येत प्रचंड वेगाने वाढ झाली असून सध्या भारताची लोकसंख्या 111 कोटींच्या जवळपास आहे. लोकसंख्येच्या बाबतीत भारताचा जगात दुसरा क्रमांक लागतो. महाकाय लोकसंख्येमुळे भारतासमोर दारिद्रय, आर्थिक विषमता आणि बेरोजगारी या सारख्या महासमस्या निर्माण झालेल्या आहेत. विशेषत: बेरोजगारीच्या समस्येने सध्या उग्र रूप धारण केले असून देशासमोरील तो अत्यंत गंभीर विषय बनला आहे. बेरोजगारीचे आकारमान आणि वाढीचा दर बराच जास्त आहे.2004-05 मधील आकडेवारीनुसार भारताच्या एकूण लोकसंख्येत श्रमशक्तीची संख्या 419 मिलियन असून कार्यरत श्रमशक्ती 384 मिलियन इतकी आहे. बेरोजगारांची संख्या 34.7 मिलियन तर बेरोजगारीचा दर 8.3 टक्के आहे. भारतातील बेरोजगारीचे स्थूलमानाने शहरी बेरोजगारी (Urban Unemployment) आणि ग्रामीण बेरोजगारी (Rural Unemployment) अशा दोन गटात वर्गीकरण करण्यात येते. ग्रामीण बेरोजगारी दूर करण्यासाठी सरकारने अनेक योजना (Schemes) व कार्यक्रम (Programmes) सुरू केलेले आहेत. स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजना (Swarnajayanti Gram Swarojgar Yojana- SGSY) ही त्यापैकी एक महत्वाची योजना आहे. ही योजना भारतात 1 एप्रिल 1999 रोजी सुरू करण्यात आली. ग्रामीण भागातील बेरोजगार गरीबांना पूर्णत: स्वयंपूर्ण बनविणे, त्यांचे इतरांवरील अवलंबित्व कमी करणे, ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणावर लघुत्तम उद्योगांची स्थापना करून तेथील गरीबांना स्थिर व कायम स्वरूपी उत्पन्न

मिळवून देणे आणि लाभार्थी कुटुंबांना 3 वर्षांच्या आत दारिद्र्यरेषेच्या वर आणणे ही या योजनेची प्रमुख उद्दिष्टे आहेत. प्रस्तुत लेखात स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजनेची प्रगती समाधानकारक आहे काय? योजनेची निर्धारित उद्दिष्टे आणि लक्ष्ये किती प्रमाणात साध्य झालीत ? योजनेमुळे ग्रामीण भागात रोजगार निर्मितीला खरोखर चालना मिळाली का ? योजनेची अंमलबजावणी करतांना शासन यंत्रणा आणि संबंधित घटकांना कोणत्या समस्यांचा सामना करावा लागतो ? याचे विवेचन करण्यात आले आहे. विवेचनासाठी महाराष्ट्र राज्यात क्षेत्रफळाच्या दृष्टीने सर्वात मोठ्या असलेल्या अहमदनगर जिल्ह्यातील राहुरी तालुक्याची निवड केली आहे. राहुरी तालुक्याचे क्षेत्रफळ 1035.11 चौ.कि.मी. आहे. 2001 च्या जनगणनेनुसार राहुरी तालुक्याची लोकसंख्या 294748 एवढी आहे. एकूण लोकसंख्येत महिलांचे प्रमाण 48.34 टक्के, साक्षरता प्रमाण 75.59 टक्के दारिद्र्य रेषेखालील लोकांचे प्रमाण 34 टक्के, अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातीचे प्रमाण 22.85 टक्के तर ग्रामीण लोकसंख्येचे प्रमाण 78.02 टक्के इतके आहे. 1999-2000 ते 2006-07 हा प्रस्तुत अभ्यासाचा कालखंड आहे.

## 2. उद्दिष्टे आणि अभ्यासपध्दती

अभ्यासाची प्रमुख उद्दिष्टे पुढीलप्रमाणे आहेत.

1. राहुरी तालुक्यात स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजनेची अंमलबजावणी तिच्या उद्दिष्टांप्रमाणे होत आहे किंवा नाही ते पहाणे.
2. स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजनेंतर्गत सुरू करण्यात आलेले स्वयंरोजगारी व्यवसाय, त्यातील स्वरोजगारी, स्वरोजगारींना देण्यात आलेले वित्त सहाय्य आणि बँक कर्जे इत्यादी निर्देशकांच्या साह्याने योजनेचे मूल्यमापन करणे.
3. स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजनेमुळे राहुरी तालुक्याच्या ग्रामीण भागात रोजगार निर्मिती आणि दारिद्र्य निर्मूलनाला चालना मिळाली का याचा मागोवा घेणे.
4. शासकीय यंत्रणा, बँका आणि स्वरोजगारींनी व्यक्त केलेल्या मतांच्या आधारे स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजनेच्या समस्या व दोष स्पष्ट करणे.
5. स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजनेची प्रभावी अंमलबजावणी व्हावी व योजना जास्तीत जास्त लाभार्थीभिमुख व्हावी यासाठी काही उपाययोजना सुचविणे.

अभ्यासासाठी प्राथमिक व द्वितीय माहितीचा वापर करण्यात आला आहे. प्राथमिक माहिती सर्वेक्षणाद्वारे संकलित करण्यात आली आहे. सर्वेक्षणासाठी राहुरी तालुक्यातील पूर्व, पश्चिम, दक्षिण आणि उत्तर अशा सर्व भागातील गावांना योग्य प्रतिनिधित्व मिळेल याची काळजी घेण्यात आली आहे. तालुक्यातील एकूण 96 गावांपैकी 30 गावांची. यादृच्छिक नमुना पध्दतीने (Random Sampling) निवड करून निवडलेल्या गावातून एकूण 215 स्वरोजगारी यादृच्छिक नमुना पध्दतीने सर्वेक्षणासाठी निवडले आहेत. स्वरोजगारींची निवड करतांना ज्या स्वरोजगारींना योजनेचे सहाय्य मिळून दोनपेक्षा जास्त वर्षे झालेली आहेत असेच स्वरोजगारी निवडले. द्वितीय माहिती विविध संदर्भ ग्रंथ, शासकीय अहवाल आणि पंचायत समितीच्या वार्षिक अहवालातून संकलित करण्यात आली आहे. संकलित माहितीचे वर्गीकरण, सारणीकरण आणि विश्लेषण करण्यासाठी विविध सांख्यिकी व गणितीय साधनांचा वापर करण्यात आला आहे.

### 3. स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजनेचे स्वरूप

स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजना (SGSY) भारतात 1 एप्रिल 1999 पासून सुरू करण्यात आलेली आहे. या योजनेत पूर्वीच्या एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम (IRDP), स्वयं रोजगारासाठी ग्रामीण युवक प्रशिक्षण कार्यक्रम (TRYSEM), ग्रामीण क्षेत्र महिला व बालविकास कार्यक्रम (DWCRA), दशलक्ष विहिर योजना (MWS), गंगा कल्याण योजना (GKY) आणि पारंपारिक कारागिरांना हत्यार संच वाटप योजना (SITRA) यांचे विलिनीकरण करण्यात आले आहे. ग्रामीण भागातील दारिद्र्य रेषेखालील कुटुंबे या योजनेचे लक्ष्य गट आहे. योजनेत दारिद्र्य निर्मूलन करतांना अनुसूचित जाती व अनुसूचित जमातींना या योजनेचा 50 टक्के लाभ देण्यात येतो. योजनेच्या एकूण स्वरोजगारीमध्ये महिला स्वरोजगारींचे प्रमाण 40 टक्के आणि अपंग स्वरोजगारींचे प्रमाण 3 टक्के राहील याची दक्षता घेण्यात येते. योजनेच्या स्वरोजगारींचे वैयक्तिक स्वरोजगारी आणि स्वयं सहाय्यता गटातील स्वरोजगारी असे दोन प्रकार पडतात. योजनेंतर्गत स्थापन करण्यात येणाऱ्या स्वयंसहाय्यता गटात 10 ते 20 सभासद असतात. ह्या योजनेसाठी 75 टक्के निधी केंद्र सरकार तर 25 टक्के निधी राज्य सरकार उपलब्ध करून देते. योजनेत स्वरोजगारींना जे वित्त सहाय्य उपलब्ध करून दिले जाते त्यात शासनाचे अनुदान (Subsidy) आणि बँक कर्जाचा (Bank Loan) समावेश होतो. योजनेच्या स्वरोजगारींना तांत्रिक प्रशिक्षण व विपणनविषयक सहाय्यदेखील उपलब्ध करून दिले जाते.

स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजनेची अंमलबजावणी 'जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेकडून' केली जाते.जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा जिल्ह्यातील सर्व पंचायत समित्या, बँका आणि बिगर शासकीय संघटनांच्यामार्फत ही अंमलबजावणी करते. योजनेचे सनियंत्रण देशपातळीवर उभारण्यात आलेल्या सनियंत्रण यंत्रणेकडून केले जाते. सनियंत्रण यंत्रणेत केंद्रस्तरीय स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजना समन्वय समिती, राज्य स्तरावर राज्यस्तरीय समन्वय समिती, जिल्हा स्तरावर जिल्हास्तरीय स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजना समिती आणि तालुका स्तरावर तालुकास्तरीय स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजना समिती स्थापन करण्यात आलेल्या आहेत.

### 4. स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजनेची प्रगती (Progress)

स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजनेच्या प्रगतीचे मूल्यांकन करण्यासाठी योजनेची भौतिक प्रगती (Physical Progress) आणि वित्तीय प्रगती (Financial Progress) विचारात घेण्यात येते. भौतिक प्रगतीसाठी योजनेंतर्गत सहाय्य करण्यात आलेल्या स्वरोजगारींची संख्या तर वित्तीय प्रगतीसाठी स्वरोजगारींना संवितरित करण्यात आलेले अनुदान (Subsidy) आणि बँक कर्जाचा (Bank Loans) तपशील विचारात घेतला जातो. त्याबाबतची सविस्तर माहिती पुढीलप्रमाणे आहे.

#### अ. भौतिक प्रगती (Physical Progress)

स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजनेच्या भौतिक प्रगतीचा विचार केला तर 1999-2000 ते 2006-07 या काळात राहुरी तालुक्यात 760 स्वयं सहाय्यता गट स्थापन करण्याचे लक्ष्य निर्धारित करण्यात आल्याचे दिसते (तक्ता क्र .1). प्रत्यक्षात त्यापैकी फक्त 218 (28.68टक्के) गट शासनाला

स्थापन करता आले. वैयक्तिक स्वरोजगारी आणि स्वयं सहाय्यता गटातील स्वरोजगारींबाबतचे लक्ष्य देखील शासनाला पूर्णतः साध्य करता आले नाही. विवेचनाच्या आठ वर्षांच्या काळात तालुक्यात एकूण 8438 स्वरोजगारींना अर्थसहाय्य देण्याचे लक्ष्य निर्धारित असतांना त्यापैकी केवळ 3240 म्हणजे 38.39 टक्के स्वरोजगारींनाच सहाय्य देता आले. महिला स्वरोजगारी, अपंग स्वरोजगारी, अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातीतील स्वरोजगारी बाबत साध्याचे प्रमाण देखील काहीसे कमी म्हणजे अनुक्रमे 35.24 टक्के, 27.67 टक्के, 30.32 टक्के आणि 35.68 टक्के इतके आहे. याचा अर्थ भौतिक प्रगतीच्या संदर्भात निर्धारित लक्ष्ये (Targets) शासनाला म्हणजे पंचायत समितीला अपेक्षित प्रमाणात साध्य करता आलेली नाहीत.

**तक्ता क्र.१**

स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजनेची राहुरी तालुक्यातील भौतिक प्रगती

(१९९९-२००० ते २००६-२००७)

| अ.क्र. | तपशील | 1999-2000 ते 2006-2007 या काळातील लक्ष्य | 1999-2000 ते 2006-2007 या काळातील साध्य | सध्याचे शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|---|
| 1. | स्वयं सहाय्यता गटांची स्थापना (संख्या) | 760 | 218 | 28.68 |
| 2. | एकूण स्वरोजगारी (संख्या) | 8438 | 3240 | 38.39 |
| | अ.वैयक्तीक स्वरोजगारी (संख्या) | 2122 | 860 | 40.52 |
| | ब.स्वयंसहाय्यता गट स्वरोजगारी (संख्या) | 6316 | 2380 | 37.68 |
| 3. | महिला स्वरोजगारी (संख्या) | 3433 | 1210 | 35.24 |
| 4. | एकूण स्वरोजगारींमध्ये महिला स्वरोजगारींचे शेकडा प्रमाण(%) | 40.68 | 37.35 | - |
| 5. | अपंग स्वरोजगारी (संख्या) | 255 | 68 | 26.67 |
| 6. | एकूण स्वरोजगारींमध्ये अपंग स्वरोजगारींचे शेकडा प्रमाण(%) | 3.02 | 2.09 | - |
| 7. | अनुसूचित जातीतील स्वरोजगारी /संख्या) | 1339 | 406 | 30.32 |
| 8. | एकूण स्वरोजगारींमध्ये अनुसूचित जातीतील स्वरोजगारींचे शेकडा प्रमाण (%) | 15.86 | 12.53 | - |
| 9. | अनुसूचित जातीतील स्वरोजगारी (संख्या) | 793 | 283 | 35.68 |
| 10 | एकूण स्वरोजगारींमध्ये अनुसूचित जमातीतील स्वरोजगारींचे शेकडा प्रमाण (%) | 9.39 | 8.73 | - |

स्रोत : पंचायत समिती कार्यालय, राहुरी

**ब. वित्तीय प्रगती (Financial Progress)**

योजनेच्या वित्तीय प्रगतीचा तपशील तक्ता क्र.2 मध्ये दिला आहे. त्यावरून 1999-2000 ते 2006-2007 दरम्यान राहुरी पंचायत समितीने स्वरोजगारींसाठी 414 लाख रूपये अनुदान वाटपाचे लक्ष्य निर्धारित करून प्रत्यक्षात 297.70 लाख रूपयांचे अनुदान वाटप केले. म्हणजे निर्धारित लक्ष्याच्या 71.90 टक्केच अनुदान वाटप करण्यात पंचायत समितीला यश मिळाले. संदर्भ काळात स्वरोजगारींसाठी 962 लाख रूपयांचे बँक कर्ज वितरणाचे उद्दिष्ट असतांना प्रत्यक्षात फक्त 524.35 लाख रूपयांचेच (54.50 टक्के) बँक कर्ज स्वरोजगारींना देण्यात आले. थोडक्यात, विवेचनाच्या आठ वर्षाच्या काळात एकूण 1376 लाख रूपयांचे अर्थसहाय्य (अनुदान + कर्ज) वाटपाचे उद्दिष्ट असतांना प्रत्यक्षात त्यापैकी 822.05 लाख रूपयांचे अर्थसहाय्य स्वरोजगारींना देण्यात आले. म्हणजे वित्तीय कामगिरीचे हे यश 59.74 टक्के इतकेच आहे.

**तक्ता क्र.२**

स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजनेची राहुरी तालुक्यातील वित्तीय प्रगती

| अ.क्र. | तपशील | 1999-2000 ते 2006-2007 या काळातील लक्ष्य | 1999-2000 ते 2006-2007 या काळातील साध्य | सध्याचे शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|---|
| 1. | स्वरोजगारींना एकूण अनुदान (लाख रूपये) | 414 | 297.70 | 71.90 |
| | अ. वैयक्तिक स्वरोजगारी (लाख रूपये) | 145 | 72.87 | 50.26 |
| | ब. स्वयं सहाय्यता गट स्वरोजगारी (लाख रूपये) | 269 | 224.83 | 83.58 |
| | स्वरोजगारींना एकूण कर्ज (लाख रूपये) | 962 | 524.35 | 54.58 |
| | अ. वैयक्तिक स्वरोजगारी (लाख रूपये) | 474 | 164.35 | 34.61 |
| | ब. स्वयं सहाय्यता गट स्वरोजगारी (लाख रूपये) | 488 | 360.28 | 73.82 |
| | एकूण अर्थसहाय्य (लाख रूपये) (अनुदान + कर्ज) | 1376 | 822.05 | 59.74 |

स्रोत : पंचायत समिती कार्यालय, राहुरी

थोडक्यात, स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजनेची राहुरी तालुक्यातील भौतिक व वित्तीय प्रगती अपेक्षेइतकी समाधानकारक नाही. कारण भौतिक व वित्तीय प्रगतीची लक्ष्ये (Targets) आणि साध्ये (Achievements) यात बरीच तफावत आहे.

**5. स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजनेचा प्रभाव (Impact)**

स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजनेचा राहुरी तालुक्यातील स्वरोजगारींच्या रोजगार उत्पन्न, राहणीमान आणि दारिद्र्य निर्मूलनावर काय परिणाम झाला याचे विवेचन या विभागात केले आहे. विवेचनासाठी सर्वेक्षणाद्वारे संकलित केलेल्या माहितीचा आधार घेतला आहे. सर्वेक्षणासाठी निवडलेल्या 215 स्वरोजगारींपैकी 110 म्हणजे 51.16

टक्के स्वरोजगारी वैयक्तिक स्वरोजगारी असून उर्वरित 105 म्हणजे 48.84 टक्के स्वरोजगारी स्वयं सहाय्यता गटातील आहेत.

### 5.1 स्वरोजगारींची सामाजिक-आर्थिक स्थिती

स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजनेअंतर्गत राहुरी तालुक्यासाठी दुग्ध व्यवसाय, उपसा जलसिंचन, उपहार गृह, बेकरी उद्योग, शेळी-मेंढी पालन, विट भट्टी, तयार कपडे, शिवणकाम, फेब्रिकेशन, कृषी सेवा केंद्र, रेशीम उद्योग इत्यादी प्रमुख व्यवसाय निश्चित करण्यात आले आहेत. त्या सर्वांचे स्थूलमानाने शेती, पशुसंवर्धन आणि उद्योग सेवा-व्यवसाय अशा तीन गटात विभाजन करण्यात आले आहे. सर्वेक्षणासाठी शेती गटातून 88 (40.93 टक्के), पशुसंवर्धन गटातून 62 (28.44 टक्के) आणि उद्योग-सेवा-व्यवसाय गटातून 65 (30.23 टक्के) स्वरोजगारी निवडण्यात आले आहेत. एकूण 215 स्वरोजगारींमध्ये महिला स्वरोजगारींचे प्रमाण 47.91 टक्के, अपंग रोजगारींचे प्रमाण 2.8 टक्के, अनुसूचित जाती अनुसूचित जमातीतील स्वरोजगारींचे प्रमाण 51.63 टक्के इतके आहे. तसेच 215 स्वरोजगारीमध्येच 84 (39.07 टक्के) स्वरोजगारी निरक्षर, 52 (24.19 टक्के) स्वरोजगारी जेमतेम साक्षर तर 45 स्वरोजगारी प्राथमिक शिक्षण घेतलेले आहेत. हायस्कुल, तांत्रिक शिक्षण आणि महाविद्यालयीन शिक्षण घेतलेल्या स्वरोजगारींचे प्रमाण अनुक्रमे 11.16 टक्के, 0.93 टक्के आणि 2.79 टक्के इतके आहे.

### 5.2 राहत्या घराचे स्वरूप

राहुरी तालुक्यातील स्वरोजगारींची राहत्या घरांच्या स्थितीची पाहणी केली असता ती समाधानकारक नसल्याचे अभ्यासात दिसून येते. तक्ता क्र.3 मध्ये दिलेल्या आकडेवारीनुसार स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजनेचे सहाय्य मिळाले त्यावेळी 33.49 टक्के स्वरोजगारी झोपड्यांमध्ये राहत होते. कच्चे घर आणि अर्ध पक्क्या घरांमध्ये राहणाऱ्या स्वरोजगारींचे प्रमाण अनुक्रमे 43.26 टक्के आणि 15.35 टक्के इतके होते. पक्क्या घरात राहणाऱ्या स्वरोजगारींची संख्या फक्त 13 (6.04 टक्के) होती. 4 स्वरोजगारी भाड्याने घेतलेल्या घरात राहत होते. स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजनेचे सहाय्य मिळाल्यानंतर या स्थितीत फारसा फरक पडला नाही. झोपड्यांमध्ये राहणाऱ्या स्वरोजगारींच्या संख्येत अल्पशी घट तर कच्च्या घरांमध्ये राहणाऱ्यांची सख्या अल्प प्रमाणात वाढली. अर्ध पक्के घर, पक्के घर आणि भाड्याने घेतलेल्या घरांमध्ये राहणाऱ्या स्वरोजगारींची संख्या जवळपास स्थिर राहिली. त्यावरून स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजनेच्या सहाय्यामुळे स्वरोजगारींच्या राहत्या घरांच्या स्थितीत फारशी सुधारणा न झाल्याचे सिध्द होते.

**तक्ता क्र.3**

सर्वेक्षित स्वरोजगारांच्या राहत्या घरांची स्थिती

| अ.क्र. | घरांचा प्रकार | स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजनेचे सहाय्य मिळाले त्यावेळची स्थिती सांगणाऱ्या स्वरोजगारींची संख्या | स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजनेचे सहाय्य मिळाल्यानंतरची स्थिती सांगणाऱ्या स्वरोजगारींची संख्या |
|---|---|---|---|
| 1 | झोपडी | 72 (33.49) | 69 (32.09) |
| 2 | कच्चे घर | 93 (43.26) | 96 (44.65) |
| 3 | अर्ध पक्के घर | 33 (15.35) | 34 (15.81) |
| 4 | पक्के घर | 13 (06.04) | 13 (06.05) |
| 5 | भाड्याचे घर | 04 (01.86) | 03 (01.40) |
| | एकूण | 215 (100.00) | 215 (100.00) |

टीप : कंसातील आकडे एकूणाशी टक्केवारी दर्शवितात.

स्त्रोत : सर्वेक्षणाद्वारे संकलित केलेल्या आकडेवारीवर आधारीत.

### 5.3 रोजगार निर्मिती

ग्रामीण भागात स्वरोजगार निर्मितीला चालना देणे हा स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजनेचा मुख्य उद्देश आहे. हा उद्देश राहुरी तालुक्यात किती प्रमाणात साध्य झाला याची माहिती तक्ता क्र.4 मध्ये दिली आहे. तक्त्यातील माहितीनुसार स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजनेचे सहाय्य मिळण्यापूर्वी 215 स्वरोजगारींपैकी 76 म्हणजे 35.35 टक्के स्वरोजगारी बेरोजगार होते. शिवाय एकाही स्वरोजगारीला 12 महिने रोजगार उपलब्ध नव्हता. 9 महिने आणि 6 महिने रोजगार मिळणाऱ्या स्वरोजगारींचे प्रमाण अनुक्रमे 5.12 टक्के आणि 9.77 टक्के इतके होते.3 महिने किंवा 3 महिन्यांपेक्षा कमी कालावधीसाठी रोजगार मिळणाऱ्या स्वरोजगारींचे प्रमाण सर्वात जास्त म्हणजे 49.76 टक्के होते. स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजनेचे सहाय्य मिळाल्यानंतरच्या काळात रोजगाराच्या स्थितीत अल्पशी सुधारणा झाली. 12 महिने रोजगार मिळणाऱ्या स्वरोजगारीचे प्रमाण 6.98 टक्क्यापर्यंत वाढले.3 महिने किंवा 3 महिन्यांपेक्षा कमी कालावधीसाठी रोजगार मिळणाऱ्या स्वरोजगारींच्या संख्येत घट झाली.9 महिने कालावधीसाठी रोजगार मिळणाऱ्या स्वरोजगारींचे प्रमाण 15.35 टक्के इतके झाले. 6 महिने रोजगार मिळणाऱ्या स्वरोजगारींचे प्रमाण सर्वात जास्त म्हणजे 40 टक्क्यांपर्यत वाढले. बेरोजगारीचे प्रमाण 35.35 टक्क्यांवरून 3.65 टक्क्यांपर्यंत कमी झाले असले तरी 10 स्वरोजगारी बेरोजगारीच्या स्थितीत आढळले. या स्वरोजगारींनी स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजनेंतर्गत मिळालेल्या अर्थसहाय्याचा अनुत्पादक कार्यासाठी वापर केला. त्यामुळे त्यांना त्यांचा व्यवसाय/उद्योग सुरू करता आला नाही.

**तक्ता क्र.4**

स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजना आणि रोजगार निर्मिती

| अ.क्र. | रोजगार कालावधी | स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजनेचे सहाय्य मिळण्यापूर्वी रोजगार विषयक स्थिती सांगणाऱ्या स्वरोजगारींची संख्या | स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजनेचे सहाय्य मिळाल्या नंतरची रोजगार विषयक स्थिती सांगणाऱ्या स्वरोजगारींची संख्या |
|---|---|---|---|
| 1 | 12 महिने रोजगार | --- (--) | 15 (06.98) |
| 2 | 09 महिने रोजगार | 11 (05.12) | 33 (15.35) |
| 3 | 06 महिने रोजगार | 21 (09.77) | 86 (40.00) |
| 4 | 03 महिने रोजगार | 42 (19.53) | 34 (15.81) |
| 5 | 03 महिन्यापेक्षा कमी कालावधीसाठी रोजगार | 65 (30.23) | 37 (17.21) |
| 6 | बेरोजगार | 76 (33.35) | 10 (04.65) |
| | एकूण | 215 (100.00) | 215 (100.00) |

टीप : कंसातील आकडे एकूणाशी टक्केवारी दर्शवितात.

स्त्रोत : सर्वेक्षणाद्वारे संकलित केलेल्या आकडेवारीवर आधारीत.

### 5.4 उत्पन्नातील बदल

स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजनेमुळे राहुरी तालुक्यातील स्वरोजगारींच्या उत्पन्नात कसे बदल झाले याचे विवेचन या परिच्छेदात दिले आहे. या संदर्भात सर्वेक्षणासाठी निवडलेल्या एकूण 215 स्वरोजगारींनी उत्पन्नाबाबत निश्चित स्वरूपाची व अचूक माहिती देण्याबाबत असमर्थता व्यक्त केली. त्यामुळे होय-नाही तत्वाचा अवलंब करून उत्पन्न बदलाची माहिती संकलित करण्यात आली. उपलब्ध माहितीनुसार एकूण 215 स्वरोजगारींपैकी (तक्ता क्र.5) 171 म्हणजे 79.53 टक्के स्वरोजगारींनी उत्पन्नात अल्पशी वाढ झाल्याचे सांगितले. उत्पन्नात अल्प वाढ झाल्याचे मान्य करणाऱ्या स्वरोजगारींमध्ये उद्योग व्यवसाय-सेवा विभागातील स्वरोजगारींचे प्रमाण 89.23 टक्के होते. पशुसंवर्धन आणि शेती विभागातील स्वरोजगारींचे प्रमाण अनुक्रमे 77.41 टक्के आणि 73.86 टक्के इतके होते. 215 पैकी 44 स्वरोजगारींनी मात्र उत्पन्नात कोणताही बदल झाला नसल्याचे सांगितले.

**तक्ता क्र.5**

स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजनेअंतर्गत सर्वेक्षित स्वरोजगारांच्या उत्पन्नात झालेला बदल

| अ.क्र. | व्यवसाय/क्षेत्र | सर्वेक्षित स्वरोजगारीची संख्या | स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजनेचे सहाय्य मिळाल्यानंतर उत्पन्नात वाढ झाल्याचे सांगणाऱ्या स्वरोजगारींची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|---|
| 1 | शेती | 88 | 65 | 73.86 |
| 2 | पशुसंवर्धन | 62 | 48 | 77.41 |
| 3 | उद्योग-सेवा-व्यवसाय(खडइ) | 65 | 58 | 89.23 |
| | एकूण | 215 | 171 | 79.53 |

स्त्रोत : सर्वेक्षणाद्वारे संकलित केलेल्या आकडेवारीवर आधारीत.

## 5.5 दारिद्रय निर्मूलन

दारिद्रय निर्मूलनाच्या अनुषंगाने राहुरी तालुक्यातील 215 स्वरोजगारींचे सर्वेक्षण केले असता स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजनेला तालुक्यात दारिद्रय निर्मूलनात फारसे यश आले नसल्याचे सिध्द होते. तक्ता क्र.6 मध्ये दिलेल्या आकडेवारीनुसार स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजनेंतर्गत सहाय्य मिळण्यापूर्वी 215 स्वरोजगारीपैकी 202 म्हणजे 93.95 टक्के स्वरोजगारी दारिद्रय रेषेचे कार्डधारक होते. योजनेचे सहाय्य मिळाल्यानंतर देखील 215 स्वरोजगारींपैकी 160 म्हणजे 74.41 टक्के स्वरोजगारी दारिद्रय रेषेचे कार्ड धारक होते. दारिद्र रेषेचे कार्डधारक असणाऱ्या स्वरोजगारांना शासनाकडून अनेक सोई, सवलती व सुविधा मिळतात. त्यामुळे स्वरोजगारींनी आपले खरे उत्पन्न न सांगता चुकीची माहिती दिली असण्याची शक्यता येथे नाकारता येत नाही.

**तक्ता क्र.6**

स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजना आणि दारिद्रय निर्मूलन

| अ.क्र. | व्यवसाय/क्षेत्र | स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजनेचे सहाय्य मिळण्यापूर्वी स्थिती | | | स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजनेचे सहाय्य मिळाल्या नंतरची स्थिती | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | सर्वेक्षणासाठी निवडलेल्या स्वरोजगारींची संख्या | दारिद्र रेषेचे कार्डधारक स्वरोजगारींची संख्या | शेकडा प्रमाण | सर्वेक्षणासाठी निवडलेल्या स्वरोजगारींची संख्या | दारिद्र रेषेचे कार्डधारक स्वरोजगारींची संख्या | शेकडा प्रमाण |
| 1 | शेती | 88 | 82 | 93.18 | 88 | 65 | 73.86 |
| 2 | पशु संवर्धन | 62 | 59 | 95.16 | 62 | 49 | 79.03 |
| 3 | उद्योग-सेवा व्यवसाय (खडइ) | 65 | 61 | 93.84 | 65 | 46 | 70.76 |
| | एकूण | 215 | 202 | 93.95 | 215 | 160 | 74.41 |

स्त्रोत : सर्वेक्षणाद्वारे संकलित केलेल्या आकडेवारीवर आधारीत.

## 6. योजनेचे दोष व समस्या

स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजनेचे विविध घटक उदा.शासकीय यंत्रणा, बँका आणि स्वरोजगारींना अंमलबजावणीच्या विविध टप्प्यांवर अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते. त्यापैकी काही महत्वाच्या समस्या पुढीलप्रमाणे आहेत.

1. स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजना सरकारने निर्धारित केलेल्या उद्दिष्टांप्रमाणे कार्य करीत असली तरी उद्दिष्ट पूर्ततेची या योजनेची कार्य पध्दती जास्त लक्ष्यांक धार्जिणी आहे. योजनेत लक्ष्यांक व त्याबाबतच्या आकडेवारीला अवास्तव महत्व दिले जाते. साध्य आणि साध्याची गुणवत्ता या बाबींना गौण लेखले जाते. बेरोजगारीसारख्या जिव्हाळ्याच्या प्रश्नाच्या दृष्टिने ही बाब योग्य मानली जात नाही.
2. स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजनेच्या कामाचे स्वरूप ठरविण्यासाठी तालुक्यात राहुरी तालुका स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजना समिती स्थापन करण्यात आली आहे. या समितीच्या सभा नियमितपणे आयोजित केल्या जाव्यात असा नियम आहे. परंतु सभांचा अनियमितपणा आणि महत्वाच्या अधिकाऱ्यांच्या गैरहजेरीमुळे योजनेच्या कामकाजाचा आराखडा ठरविण्यात विलंब होतो. त्याचा प्रतिकूल परिणाम योजनेच्या फलश्रुतीवर होतो.
3. स्वरोजगारींना आवश्यक असणाऱ्या सुविधा आणि सहाय्य उदा. कच्चा माल, विपणन आणि तांत्रिक प्रशिक्षण उपलब्ध करून देण्याची तरतूद स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजनेत करण्यात आलेली आहे. राहुरी तालुक्यातील स्वरोजगारींना मात्र या सुविधा पुरेशा प्रमाणात मिळत नाहीत. तसेच मिळणाऱ्या सुविधांचा दर्जा चांगला नसतो. त्यामुळे स्वरोजगारींचे उद्योग-व्यवसाय अडचणीत येतात आणि त्यांच्या उत्पादित वस्तू व सेवांची प्रत चांगली नाही.
4. स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजनेत बऱ्याच वेळा खऱ्या गरजूंकडे दुर्लक्ष होते. गरज नसणाऱ्यांनाच योजनेचे जास्त लाभ मिळतात. योजनेतील राजकीय हस्तक्षेपामुळे कर्मचारी व अधिकाऱ्यांना नियमाप्रमाणे काम करता येत नाही. तसेच मध्यस्त यंत्रणा गरीब स्वरोजगारींची फसवणूक करून त्यांचे सहाय्य लुबाडते. त्यामुळे योजनेचे फायदे गरिबांपर्यंत म्हणावे तसे पोहचत नाहीत.
5. 1999-2000 ते 2006-07 या काळात राहुरी तालुक्यात वैयक्तिक स्वरोजगारी आणि स्वयं सहाय्यता गटातील स्वरोजगारींची संख्या व त्यांना बँकांनी दिलेले कर्ज यात वाढ झालेली दिसत असली तरी स्वरोजगारींना व विशेषत: स्वयं सहाय्यता गटातील स्वरोजगारींना कर्जाची उपलब्धता रक्कम कमी वाटते. कर्जाची ही अल्प रक्कम किफायतशीर उद्योग-व्यवसाय सुरू करण्यास कमी पडते असे तालुक्यातील स्वरोजगारींचे मत आहे.
6. राहुरी तालुक्यातील बँकांची एक महत्वाची समस्या म्हणून कर्ज थकबाकीचा उल्लेख करावा लागेल. बँकांनी तालुक्यातील स्वरोजगारींना दिलेल्या कर्जाची वसूली वेळेवर होत नाही. काही स्वरोजगारींच्या बाबतीत कर्ज वसूलीचे प्रमाण खूपच कमी असल्याचे बँकाचे म्हणणे आहे. बँक अधिकाऱ्यांनी या संदर्भात दिलेल्या माहितीनुसार वैयक्तिक स्वरोजगारी आणि स्वयं सहाय्यता गटातील स्वरोजगारींकडील थकित कर्जाचे प्रमाण अनुक्रमे 80 टक्के आणि 40 टक्के

इतके आहे. कर्ज थकबाकीचे हे प्रचंड प्रमाण स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजनेच्या पुढील वाटचालीत अडथळा बनत आहे.

7. कर्ज थकबाकीला बँका आणि स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजनेची शासकीय यंत्रणा तेवढीच जबाबदार आहे. तालुक्यात योजनेच्या सर्व घटकांमध्ये योग्य समन्वय नाही. बँक अधिकाऱ्यांच्या मते कर्ज वसूलीसाठी स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार यंत्रणेचे योग्य सहकार्य मिळत नाही. विशेषत: वैयक्तिक स्वरोजगारीकडील कर्ज वसुलीत ही यंत्रणा अपेक्षित सहकार्य करीत नाही. त्यामुळे कर्ज वसूलीचा विचार केवळ बँकानाच करावा लागतो. बँका देखील बऱ्याच वेळा आधारभूत सुविधा, विपणनविषयक सुविधा आणि स्वरोजगारींची क्षमता विचारात न घेता कर्जाचे वाटप करतात.

8. अवर्षण, अतिवर्षण, प्रतिकूल हवामान यासारख्या नैसर्गिक आपत्तींना तोंड देण्याचा प्रश्न तालुक्यातील असंख्य स्वरोजगारींवर येतो. नैसर्गिक आपत्तीच्या काळात स्वरोजगारींना त्यांच्या उद्योग-व्यवसायापासून पुरेसे उत्पन्न मिळत नाही. त्यामुळे कर्जाची परतफेड करण्याची त्यांची क्षमता कमी होते आणि कर्ज थकबाकीचे प्रमाण वाढते.

9. स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजनेचे राहुरी तालुक्यातील काही स्वरोजगारी कर्ज फेड करण्याची कुवत असतांना कर्जे बुडविण्याच्या हेतूने जाणीवपूर्वक कर्जाची परतफेड करीत नाहीत. इतर स्वरोजगारी याबाबतीत कर्जाची परतफेड न करणाऱ्यांचे अनुकरण करू लागतात. बँका आणि शासकीय यंत्रणा कर्जाची परतफेड न करणाऱ्या स्वरोजगारींविरूध्द कठोर कारवाई करीत नाही. त्यामुळे जाणीवपूर्वक कर्ज थकविणाऱ्यांचे प्रमाण वाढत आहे.

10. स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजनेचे स्वरोजगारी बँका व शासनाकडून मिळालेल्या अर्थसहाय्याचा दुरूपयोग करतात. बराच पैसा स्वरोजगारी अनुत्पादक कार्यावर खर्च करतात. ज्या उद्योग-व्यवसायासाठी अर्थसहाय्य दिलेले असते तो उद्योग-व्यवसाय सुरूच केला जात नाही. त्यामुळे कर्जफेडीसाठी पैसा उपलब्ध होत नाही. परिणाम स्वरूप थकबाकीच्या प्रमाणात वाढ होते आणि शासनाचा दारिद्रय निर्मूलन, रोजगार निर्मिती व उत्पन्न निर्मितीचा मूळ उद्देश सफल होत नाही.

11. स्वरोजगारींना अर्थसहाय्य देण्याऱ्या बँकांच्या कार्यपध्दतीतील एक ठळक दोष म्हणजे अर्थसहाय्याचे नाकारण्यात येणारे आणि प्रलंबित प्रस्तावाचे असणारे मोठे प्रमाण होय. स्वरोजगारींचे अर्थसहाय्याचे प्रस्ताव नाकारणे किंवा प्रलंबित ठेवण्याबाबत तालुक्यातील बँक अधिकाऱ्यांशी चर्चा केली असता त्यांनी कागदपत्रांची वेळेवर पूर्तता न होणे, प्रस्तावातील उद्योग-व्यवसाय आर्थिकदृष्ट्या योग्य नसणे, प्रस्ताव अधिकार कक्षेत न येणे, एकाच कुटुंबातील व्यक्तिंच्या नावे जास्त प्रस्ताव असणे इत्यादी कारणे पुढे केली. कारणे काहीही असली तरी या कृतीवर राहुरी तालुक्यातील स्वरोजगारी मात्र नाराज दिसले.

## 7. शिफारशी (Suggestions)

स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजनेची सध्याची कार्यपध्दती, समस्या व दोष लक्षात घेता

या योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी पुढील शिफारशी करता येतील.

1. स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजना जास्तीत जास्त लोकाभिमुख बनविण्यासाठी जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा आणि पंचायत समितीने जनजागृतीचे प्रयत्न करावेत. त्यासाठी तालुक्यातील वेगवेगळ्या संस्था व संघटनांची मदत घेऊन संपूर्ण तालुक्यात योजनेच्या कार्यक्रम व कार्यपध्दतीचा प्रचार करावा.
2. या योजनेंतर्गत निर्धारित करण्यात येणारी लक्ष्ये जास्त वास्तववादी असावीत. योजनेत वैयक्तिक स्वरोजगारी, स्वयं सहाय्यता गट, स्वयं सहाय्यता गटातील स्वरोजगारी, अनुदान व बँक कर्ज इत्यादी बाबतची लक्ष्ये अति महत्त्वाकांक्षी न ठेवता ती आवाक्यातील असावीत. तालुक्यातील उपलब्ध संसाधने, आधारभूत संरचना आणि बँकांची क्षमता विचारात घेऊन वर्ष निहाय लक्ष्ये निर्धारित करण्यात यावीत.
3. स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजनेची कार्यपध्दती ग्रामीण भागातील स्वरोजगारींना सहज समजेल अशी सोपी असावी. स्वरोजगारींच्या वेळ आणि पैशाचा अपव्यय होणार नाही याकडे लक्ष देण्यात यावे. त्यासाठी अंमलबजावणी यंत्रणा जास्त कार्यक्षम बनवून योजनेचे सहाय्य मिळण्यासाठी आवश्यक असणाऱ्या बाबींची पूर्तता निर्धारित वेळेत पूर्ण करण्यात यावी.
4. या योजनेचे दारिद्रय निर्मूलन व रोजगार निर्मितीचे उद्दिष्ट साध्य करावयाचे असेल तर तिच्या अंमलबजावणीतील असमतोल दूर झाला पाहिजे. अभ्यासातील उपलब्ध माहिती असे दर्शविते की राहुरी तालुक्याच्या काही भागात योजनेची प्रगती समाधानकारक तर काही भागात ती असमाधानकारक आहे. तेव्हा अंमलबजावणी यंत्रणेने अंमलबजावणीचा हा असमतोल प्रभावी उपाययोजना करून दूर करावा.
5. जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, पंचायत समिती, बँका आणि इतर संबंधित घटकांनी स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजनेकडे पाहण्याच्या दृष्टिकोनात बदल करावा. तालुक्याच्या ग्रामीण भागात स्वयंरोजगाराला चालना देण्याचे सामर्थ्य असलेल्या या योजनेचे महत्व सर्व घटकांनी ध्यानात घ्यावे. तसेच सर्वांनी आपापसात योग्य ताळमेळ व समन्वय कसा प्रस्थापित होईल यासाठी प्रमाणिक प्रयत्न करावेत.
6. स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजनेच्या अंमलबजावणीचा विशेष भर वित्त पुरवठ्यावर आहे. परंतु वित्त पुरवठ्याबरोबर क्षमतांची निर्मिती करणारे प्रशिक्षण आणि उत्पादित मालाचे योग्य विपणन याकडेही लक्ष देणे आवश्यक आहे. म्हणून अंमलबजावणीत शासनाने या सर्व बाबींना योग्य ते प्राधान्य द्यावे.
7. योजनेचे स्वरोजगारी व विशेषत: स्वयं सहाय्यता गटातील स्वरोजगारींना योजनेंतर्गत उपलब्ध होणारे अनुदान व बँक कर्जाची रक्कम फारच कमी वाटते. या रकमेत किफायतशीर उद्योग-व्यवसाय सुरू करता येत नाही असे त्यांचे म्हणणे आहे. म्हणून शासनाने नियमात बदल करून अनुदान व बँक कर्जाच्या मर्यादेत योग्य ती वाढ करावी.
8. स्वरोजगारींनी स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजनेंतर्गत मिळणाऱ्या वित्त सहाय्याचा वापर अनुत्पादक कार्यासाठी व दैनंदिन गरजा भागविण्यासाठी करू नये. तसेच स्वयंरोजगारी उद्योग-व्यवसायातून मिळणाऱ्या उत्पन्नाचा

विनियोग त्यांनी गुंतवणूकीसाठी, पोषक आहार घेण्यासाठी, जीवनमान उंचावण्यासाठी आणि मुलांचे आरोग्य व शैक्षणिक विकासासाठी करावा.

9. स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजनेचे लाभार्थी म्हणजे स्वरोजगारी वित्तसहाय्य मिळाल्यानंतर निर्धारित कालावधीत स्वावलंबी झाले पाहिजे. त्यासाठी त्यांनी प्रामाणिक प्रयत्न करावेत. दारिद्र्य रेषेच्या वर येण्याला त्यांनी प्राधान्य द्यावे. योजनेचे वित्तसहाय्य हे दारिद्र्य निर्मूलन व रोजगार निर्मितीसाठीचे कायम स्वरूपी उत्तर नव्हे. त्यासाठी योजनेतून स्वावलंबन हेच जास्त महत्वाचे आहे.
10. योजनेंतर्गत स्थापन करण्यात येणाऱ्या स्वयं सहाय्यता गटांचे व्यवहार लोकशाही पध्दतीने व्हावेत. गटातील पदाधिकाऱ्यांच्या कार्यपध्दतीत पारदर्शकता असावी. विशिष्ट कालावधीनंतर गटाचे पदाधिकारी बदलले जावेत. गटांत कोणाचीही मक्तेदारी असू नये. सर्व सदस्यांमध्ये परस्पर विश्वास व सहकार्य असावे. तसेच गटांच्या सभा नियमितपणे घेतल्या जाव्यात.
11. कर्ज थकबाकीचे वाढते प्रमाण ही राहुरी तालुक्यातील बँकांची एक ज्वलंत समस्या आहे. तेव्हा जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, पंचायत समिती व इतर सर्व घटकांनी आपल्या दैनंदिन कामकाजात कर्ज वसूलीच्या कार्यास महत्वाचे स्थान द्यावे. योजनेतील सर्व घटकांनी बँकांना स्वरोजगारींकडील कर्ज वसूलीसाठी योग्य ते सहकार्य व मदत करावी.

## समारोप

थोडक्यात, स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजना ही एक आदर्श योजना आहे. परंतु योजनेसमोरील आव्हाने, दोष व समस्यांमुळे योजनेला रोजगार निर्मितीच्या कार्यात अपेक्षित यश मिळत नाही. राजकीय हस्तक्षेप आणि मध्यस्थ यंत्रणेच्या प्रभावामुळे योजनेचे फायदे गरिबांपर्यंत म्हणावे तसे पोहचत नाहीत. योजनेची फळे गरीब स्वरोजगारींपर्यंत झिरपण्याऐवजी मध्येच गिळंकृत झालेली दिसतात. म्हणून शासनाने या योजनेची प्रभावी अंमलबजावणी करावी. योजनेचे फायदे गरिबांपर्यंत झिरपतील याची दक्षता घ्यावी. त्यासाठी नियमावलीत योग्य ते बदल करावेत. असे केल्यानेच स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजना ही ग्रामीण भागातील स्वरोजगार निर्मितीचे एक प्रभावी साधन ठरू शकेल.

# वाळवा तालुक्यातील दारिद्र्य रेषेखालील महिला स्वयं सहाय्यता बचत गटांची बलस्थाने व दुर्बलस्थाने

**सौ. पौर्णिमा दीपक चव्हाण (उडुपी)**
विभाग प्रमुख, वाणिज्य विभाग,
आर्टस अ‍ॅण्ड कॉमर्स कॉलेज, आष्टा
ता. वाळवा जि. सांगली.

**प्रस्तावना :-**

सन 2001 च्या जनगणनेनुसार भारताच्या एकूण लोकसंख्येमध्ये स्त्रियांची संख्या 48.15% इतकी आहे. यापैकी 120 दशलक्ष स्त्रिया दारिद्र्य रेषेखालील जीवन जगत आहेत. जोपर्यंत या स्त्रिया विकासाच्या मुख्य प्रवाहात येणार नाहीत. तोपर्यंत भारताचा सामाजिक, आर्थिक विकास शक्य होणार नाही.

महिलांच्या सबलीकरणासाठी शासन अनेक नियम, कायदे करीत आहे. आरक्षण दिले जात आहे. विविध धोरणे, योजना राबवित आहे. याचाच एक भाग म्हणजे 1 एप्रिल 1999 पासून बांगलादेशाच्या धर्तीवर राबविली गेलेली स्वयं सहाय्यता बचत गट चळवळ. समाजातील उपेक्षित, विकासाच्या प्रक्रियेपासून दूर असणाऱ्या महिलांना आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत आणून त्यांचे सबलीकरण करणे या उद्देशाने राबविली जात असलेली चळवळ.

आज भारतात महिला स्वयं सहाय्यता बचत गट चळवळीने चांगलाच जोर पकडला आहे. बचत गटाच्या माध्यमातून महिला संघटीत होऊ लागल्या आहेत. अर्थार्जनाचे नवे मार्ग शोधू लागल्या आहेत, विकसित करू लागल्या आहेत. स्वयं सहाय्यता महिला बचत गटाच्या माध्यमातून ज्या महिला संघटीत होत आहेत. त्यामागे कोणतीही जात, धर्म नाही अथवा कोणताही राजकीय पक्ष नाही. केवळ कुटुंबाच्या आर्थिक विकासाच्या प्रेरणेतून महिला संघटीत होत आहेत. स्वयं सहाय्यता महिला बचत गट हे ग्रामीण स्त्रियांच्या जीवनाच्या परिवर्तनाचे एक साधन बनत आहे.

प्रस्तुत शोधनिबंधामध्ये सांगली जिल्हयामधील वाळवा तालुक्यातील स्वयं सहाय्यता महिला बचत गटांचा अभ्यास केलेला आहे. यामध्ये वाळवा तालुका पंचायत समितीशी संबंधित अशा 50 बचत गटांचा; ज्यांना मार्च 2006 अखेर 5 वर्षे पूर्ण झालेली आहेत, यांचा समावेश आहे.

**उद्देश :-**

वाळवा तालुक्यामधील दारिद्रय रेषेखालील स्वयं सहाय्यता महिला बचत गटांचा अभ्यास करून त्यांची बलस्थाने व दुर्बलस्थाने शोधणे व उपाययोजना सुचविणे.

**संशोधन पध्दती :-**

वरील उद्देश विचारात घेऊन प्रस्तुत शोध निबंधासाठी बचत गट सदस्यांच्या प्रत्यक्ष मुलाखती, प्रश्नावली भरून घेणे व दुय्यम माहिती याचा आधार घेतला आहे.

**स्वयं सहाय्यता महिला बचत गट संकल्पना व व्याप्ती :-**

स्वयं सहाय्यता महिला बचत गट म्हणजे, ''स्वतःची सहाय्यता स्वतः करणे या उद्देशाने, बचतीची सवय वाढविण्याच्या दृष्टीने, आर्थिक प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी व सामाजिक विकासासाठी कमीत कमी दहा व जास्तीत जास्त वीस व्यक्तीनी एकत्र येऊन तयार केलेला समूह होय.''

स्वयं सहाय्यता बचत गटाची मूळ संकल्पना बांगलादेशातील आहे. डॉ. महमद युनुस यांनी सर्वप्रथम ''सूक्ष्म पतपुरवठा'' ही संकल्पना मांडली आणि विकसित केली. दारिद्र्यात खितपत असणाऱ्या व्यक्तींना दारिद्र्यातून बाहेर काढून दारिद्र्य निर्मूलन करणे शक्य आहे. पण त्यासाठी गरज आहे, ती त्यांच्या व्यवसायासाठी आवश्यक असणाऱ्या सूक्ष्म पतपुरवठा उपलब्ध होण्याची. बचतगट चळवळीचे प्रणेते डॉ. महमद युनुस यांच्या विचारातून प्रेरणा घेऊन भारतात महिलांच्या आर्थिक स्वावलंबणासाठी, सबलीकरणासाठी पूर्वीच्या दारिद्रय निर्मूलनाच्या योजना एकत्रित करून उदा. डवाक्रा, ट्रायसेम, सिट्रा, दशलक्ष विहिर योजना, गंगा कल्याण योजना इत्यादी स्वर्ण जयंती स्वरोजगार या नावांने योजना 1 एप्रिल 1999 पासून ही योजना सुरू झाली. महाराष्ट्रामध्ये बचत गटाच्या चळवळीमध्ये नाबार्ड, माविम यांच्या बरोबरीने जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, स्वयंसेवी संस्था, बँका यांचे योगदान महत्वपूर्ण आहे. महाराष्ट्रामध्ये सन 2007 अखेर 94386 इतके बचतगट कार्यरत असून त्यांना 21332.64 कोटी इतके कर्ज वाटप झाले आहे. बचतगट संख्येत गेल्या 5 वर्षात 11 पटीने वाढ झाली आहे.

**दारिद्रय रेषेखालील महिला बचत गट कार्यपध्दती :-**

स्वयं सहाय्यता महिला बचत गट हा गटातील महिलांकडून चालविला जातो. गटामधून अध्यक्ष व सचिव यांची निवड केली जाते.गट स्थापनेनंतर गटातील सदस्य दरमहा नियमित बचत करण्यास सुरूवात करतात. गटातील सदस्यांची महिन्यातून एकदा मिटींग होते. या मिटींगमध्ये बचतीची रक्कम जमा करणे, अडीनडीतील सदस्याना कर्ज देण्याबाबत निर्णय घेतले जातात; याचबरोबर अनेक वैयक्तिक, सामाजिक प्रश्नावर चर्चा केली जाते. तसेच गटाच्या प्रगती संबंधात चर्चा करून धोरणात्मक निर्णयही घेतले जातात. खऱ्या अर्थाने बचत गटाची मिटींग हा बचत गटाचा आत्मा आहे. बचत गटातील महिला सदस्य जी बचत करतात ती बचत गटाच्या नावाने बँकेमध्ये खाते उघडून त्यामध्ये जमा केली जाते. नियमितपणे केलेल्या बचतीतून जमा झालेल्या स्वनिधीमधून गरजू सदस्यांना वाजवी दराने अल्पमुदतीची कर्जे दिली जातात. ही कर्जे देत असताना जमा निधी, सदस्याची निकड, उपलब्ध निधी आदी बाबी विचारात घेतल्या जातात. गटाचा बचतीमधील नियमितपणा, अंतर्गत कर्जाचे वितरण व वसूली, गटाचा एकसंघपणा आदी बाबी विचारात घेऊन स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजनेअंतर्गत

गटांना त्यांच्या बचतीच्या प्रमाणात खेळते भांडवल व खेळत्या भांडवलाचा योग्य पध्दतीने विनियोग केल्यानंतर व्यवसाय कर्ज व अनुदान उपलब्ध करून दिले जाते. यामध्ये जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेबरोबर बँकांची भूमिका महत्वाची ठरते. या योजनेचा मुख्य उद्देश हा एका विशिष्ट कालावधीमध्ये ग्रामीण भागातील दारिद्रय रेषेखालील कुटुंबांना स्वयंरोजगाराच्या माध्यमातून आर्थिकदृष्ट्या सक्षम बनविणे, त्यांना दारिद्रय रेषेच्या वर आणणे हा आहे.

**कार्यक्षेत्र:-**

सांगली जिल्हयातील वाळवा तालुका हा कृष्णा आणि वारणा नदीच्या खोऱ्यात वसलेला आहे. बचत गटाच्या चळवळीमध्ये तालुका सुरूवाती पासूनच आघाडीवर आहे.तालुक्यातील महिलामधील आर्थिक विकासाची ओढ, कौटुबिक विकासाची प्रेरणा यातून बचत गटांची संख्या सातत्याने वाढत आहे. मार्च 2008 अखेर वाळवा तालुक्यात दारिद्रय रेषेवरील 4294 गट, 53849 सदस्य आणि रू .12159577/- इतकी शिल्लक तर दारिद्रय रेषेखालील 527 गट,5655 महिला सदस्य आणि रू.574837/- इतकी शिल्लक अशी स्थिती आहे. दारिद्रय रेषेखालील 527 गटापैकी मार्च 2006 अखेर 279 गट कार्यरत होते; ज्यामध्ये दारिद्रय रेषेखालील 3400 कुटूंबे सहभागी होती. त्यापैकी ज्या गटानी पाच वर्षे पूर्ण केली आहेत असे 50 बचत गट अभ्यासासाठी निवडले आहेत.

**तक्ता क्र.1**

वाळवा तालुक्यामधील दारिद्रय रेषेखालील महिला बचत गटांची आर्थिक व भौतिक प्रगती

| अ.क्र. | तपशील | 2000-2001 | 2001-2002 | 2002-2003 | 2003-2004 | 2004-2005 | 2005-2006 |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | चालू वर्षापर्यंतचे बचत गट संख्या | 102 | 167 | 181 | 197 | 259 | 268 |
| 2 | आर्थिक वर्षात स्थापन झालेले बचत गट | 65 | 14 | 16 | 62 | 09 | 11 |
| 3 | एकूण बचत गट | 167 | 181 | 197 | 259 | 268 | 279 |
| 4 | प्रथम श्रेणीकरण झालेले. बचत गट | 28 | 75 | 26 | 11 | 37 | 09 |
| 5 | द्वितीय श्रेणीकरण झालेले बचत गट | 09 | 28 | 24 | 13 | 11 | 12 |
| 6 | एकूण बचत | 4.90 | 10.47 | 12.67 | 29.56 | 32.30 | 34.85 |
| 7 | मंजूर खेळते भांडवल | 7.00 | 15.50 | 27.42 | 18.75 | 54.80 | 59.85 |
| 8 | वापरलेले खेळते भांडवल | 7.00 | 15.00 | 17.25 | 24.50 | 30.90 | 42.00 |
| 9 | व्यवसायासाठी कर्ज घेतलेले सभासद | 162 | 32 | 230 | 177 | 60 | 74 |

(स्त्रोत : दिनांक 31-3-2006 चा वाळवा पंचायत समिति इस्लामपूर चा स्वर्ण जयंती ग्राम स्वरोजगार योजनेचा वार्षिक अहवाल)

वरील तक्ता क्रं.1 वरून असे निदर्शनास येते की सन 2004 पर्यंत मोठया प्रमाणावर बचत गटांची स्थापना झालेली आहे. मात्र सन 2004 नंतर बचत गट स्थापनेचे प्रमाण कमी दिसते. सन 1999 मध्ये स्वर्ण जयंती ग्राम स्वरोजगार योजना सुरू झाली. त्यामुळे सुरवातीला बचत गट स्थापन होण्याचे प्रमाण जास्त होते. मात्रा पुढे हे सातत्य टिकले नाही. 1997 च्या दारिद्रय रेषा गणनेप्रमाणे वाळवा तालुक्यात एकूण 5837 इतकी दारिद्रय रेषेखालील कुंटुंबे आहेत. मार्च 2006 अखेर एकूण 279 बचत गट स्थापन झालेले आहेत. ज्यामध्ये तालुक्यातील 3400 महिला सहभागी झाल्या आहेत. एकूण 279 बचत गटापैकी 186 गटांचे पहिले श्रेणीकरण झाले असून दुसरे श्रेणीकरण झालेल्या

बचत गटांची संख्या केवळ 96 इतकी आहे. बचत गटांच्या बचतीच्या रकमेत व खेळते भांडवल मंजूर होण्याच्या प्रमाणात वाढ झालेली दिसून येते.पण त्या प्रमाणात त्याचा वापर झालेला दिसत नाही. मार्च 2006 पर्यंत केवळ 735 इतक्या महिलांनी व्यवसाय कर्ज घेतल्याचे दिसून येते.

**निष्कर्ष :-**

वाळवा तालुक्यातील दारिद्रय रेषेखालील स्वयं सहाय्यता महिला बचत गटांच्या अभ्यासाअंती पुढील बलस्थाने व दुर्बलस्थाने निदर्शनास आली.

**बलस्थाने :-**

१) स्वयं सहाय्यता महिला बचत गटाच्या एकूण सदस्यापैकी 83% सदस्य महिला या 20 ते 50 वयोगटातील आहेत. यावरून असे दिसून येते की, बचत गटातील अधिकांश महिला या कार्यप्रवण गटातील असून त्यांच्यामध्ये कृतीशील व उद्योगी तरूण महिला व अनुभवी, मध्यमवयीन महिला यांचा समन्वय आहे.

2) बचत गटाच्या सदस्यापैकी 83% महिला विवाहित आहेत. ज्या प्रामुख्याने त्यांचे कौटुंबिक उत्पन्न हे घर चालवण्यास पुरेसे नसल्याने गटामध्ये सहभागी झाल्याचे दिसून येते. तर गटामधील विधवा आणि परित्यक्ता महिला या उत्पन्नाचे साधन मिळेल या आशेने गटामध्ये सहभागी झाल्याचे दिसून येते.

3) बचत गटामध्ये प्रामुख्याने सर्व साधारण जाती व मागासवर्गीय जातींचे एकत्रित बचत गट दिसून येतात. यावरून बचत गटांच्या निर्मितीमध्ये केवळ समान आर्थिक परिस्थिती व समान आर्थिक ध्येय ही बाब प्रभावी ठरल्याचे दिसून येते.

4) बचत गटामध्ये सहभागी महिलामध्ये 84% महिला हया शेतमजूर 14 टक्के महिला हया किरकोळ व्यवसाय करणाऱ्या तर केवळ 2% महिला या गृहिणी असल्याचे दिसून येते. शेतमजुर महिलांना मिळणारी मजूरी पर्याप्त नसल्याने पर्यायी व जोड उत्पन्नाचे साधन प्राप्त करण्यासाठी या महिला बचत गटामध्ये सहभागी झाल्याचे दिसून येते.

5) बचत गटामधील 88% महिलांनी अंतर्गत कर्ज घेतल्याचे दिसून येते. यावरून ग्रामीण महिलांच्या दृष्टीने सूक्ष्मवित्त महत्वाचे असल्याचे स्पष्ट होते.

6) वाळवा तालुक्यातील 100% महिला बचत गटांनी व्यवसाय म्हणून म्हैस पालनाची निवड केलेली आहे. तालुक्यामधील सहकारी तसेच खाजगी दुग्ध संस्थांचे जाळे, चाऱ्याची उपलब्धता, दुग्ध व्यवसायाचा अनुभव या बाबी सदर व्यवसाय निवडीमध्ये निर्णायक ठरल्याचे दिसून येते.

**दुर्बलस्थाने :-**

1) स्वयं सहाय्यता महिला बचत गटामधील 51% महिला अशिक्षित असून प्राथमिक शिक्षण झालेल्या 18%; तर माध्यामिक शिक्षण घेतलेल्या 23% महिला आहेत. गटातील महिलांच्या अशिक्षितपणाचा, अल्पशिक्षणाचा गटाची कार्यपध्दती, व्यवसाय निवड तसेच प्रगतीवर विपरीत परिणाम झालेला दिसून येतो.

2) एकूण बचतगटापैकी 70% बचतगटांची मासिक बचत रू. 200/- पर्यंत आहे; तर 28% बचत गटांची बचत ही रू.201/- ते रू.300/- च्या दरम्यान आहे. केवळ 2% बचत गटांची मासिक बचत ही रू.300/- च्या वर आहे. यावरून असे लक्षात येते की, महिला सदस्यांनी केलेली बचत ही बचत नसून काटकसर आहे.(उपभोगाचा त्याग आहे) त्याचप्रमाणे गटाची कमी बचत ही गटाचा स्वनिधी व खेळते भांडवल उभा निर्धारित

करण्यात अडथळा ठरत आहे.

3) बहुतांश गटातील महिला अशिक्षित, अल्पशिक्षित असल्याने गटांचे दैनंदिन हिशेब व नोंदी गटाबाहेरील व्यक्तीकडून जसे ग्रामसेवक, अंगणवाडी सेविका, सहयोगिनी, स्थानिक सहकारी संस्थांचे सचिव, बचत गटाच्या अध्यक्ष/सचिव यांचे पती यांच्याकडून लिहून घेतले जातात.या व्यक्ती बचत गटातील नसल्याने त्यांच्याकडून गटाचे लेखे नियमित लिहिले जात नाहीत. यातून पारदर्शीपणा व विश्वासार्हतेला बाधा आल्याचे व संशयाचे वातावरण निर्माण होऊन गट फुटलेले दिसून येतात.

4) बहुतांशी बचत गटाच्या सभा (78%) बचत गटाचे अध्यक्ष/सचिव किंवा सदस्य यांच्या घरात होतात. त्यामुळे बचत गटातील चर्चा, मत मांडणे, निर्णय घेणे यावर मर्यादा येतात. तसेच गटावर गटाबाहेरील सदस्यांचा प्रभाव पडत असल्याचे दिसून येते. याचा परिणाम बचत गटाच्या मासिक मिटींगच्या उपस्थितीवर झाल्याचे दिसून येते.

5) कोणत्याही बचत गटाकडून व्यवसाय एका छताखाली आणि सामूहिक देखरेखीखाली चालविला जात नाही. याचा परिणाम गटाच्या एकसंघपणावर झाल्याचा तसेच कर्जाची परतफेड करताना अडचणी येत असल्याचे दिसून येते. तसेच प्रत्येक सदस्य स्वतंत्रपणे व्यवसाय करित असल्याचे व सर्व सदस्यांची म्हैस पालन या व्यवसायामध्ये रूची नसताना देखील सर्वांवर म्हैस पालन या व्यवसायाची सक्ती झाल्याचे दिसून येते. व्यवसाय निवडीचे स्वातंत्र्य दिसून येत नाही.

6) बचत गटांना देण्यात आलेले प्रशिक्षण हे साधन व्यक्तीमार्फत न देता बऱ्याच वेळा शासकीय अधिकारी व कर्मचारी यांच्यामार्फत (उद्दिष्टाभिमुख पध्दतीने) वर्षाच्या अखेरीस दिले गेलेले आहे. बचत गटामधील महिला या पहिल्या पिढीच्या उद्योजिका असल्याने व त्यांना व्यवसाय निवड, लेखे ठेवणे, वित्तीय संस्थांशी व्यवहार करणे, मालाची विक्री करणे या बाबतीत कोणताही पुर्वानुभव नसल्याने अपुऱ्या प्रशिक्षणामुळे अनेक अडचणी निर्माण होतात.

7) दारिद्रय रेषेखालील कुंटुबांची यादी ही काही अंशी सदोष आहे. त्यामुळे प्रत्यक्षात 500 ते 550 बचत गट स्थापन केले जाऊ शकत असताना प्रत्यक्षात मात्र 279 गटच स्थापन झाल्याचे दिसून येते व त्यामुळे अनेक गरजू गरीब कुंटुबे योजनेच्या लाभापासून वंचित राहिल्याचे दिसून येते.

8) वाळवा तालुक्यामध्ये स्थापन झालेल्या 279 बचत गटापैकी केवळ 186 गटांचेच श्रेणीकरण पूर्ण झालेले आहे. वेळेत श्रेणीकरण न होणे, श्रेणीकरणामध्ये बँकांची उदासिनता हे बचत गटांच्या प्रगतीमध्ये प्रमुख अडथळे असल्याचे दिसून येतात. काही क्षुल्लक कारणासाठी बचत गट फुटल्याचे दिसून येतात.

9) बँकेकडून प्राप्त फिरता निधी हा गरजू सदस्यांमध्ये मागणी प्रमाणे वाटप न करता सर्व सदस्यांनी सारख्या प्रमाणात वाटून घेतल्याचे दिसून येते. त्यामुळे गरजू लोकांना निधीचे वाटप न होणे, तसेच खेळत्या भांडवल उभारणीवर प्रतिकुल परिणाम असे दोष दिसून येते.

10) बचत गटांसाठी जिल्हा ग्रामीण यंत्रणेने बँकांच्या मदतीने सन 2000 मध्ये प्रकल्प अहवाल

केला आहे. त्यावेळी निर्धारित केलेली प्रकल्प किमंत आजही वापरली जाते व त्याप्रमाणे बँकांकडून गटांना व्यवसायासाठी निधी उपलब्ध करून दिला जातो. त्यामुळे गटांना आवश्यकते- पेक्षा कमी निधी उपलब्ध होतो. त्यामुळे निकृष्ट दर्जाची मालमत्ता खरेदी करणे, कर्जाची परत फेड होण्याआधीच मालमत्ता विकणे, व्यवसाय बंद करणे आदी दुष्परिणाम दिसून येतात.

**उपाययोजना :-**

वाळवा तालुक्यातील दारिद्रय रेषेखालील स्वयं सहाय्यता महिला बचत गटांच्या अभ्यासाअंती बचत गटांच्या दुर्बल स्थानावर पुढील उपाययोजना सुचविल्या आहेत .

1) बचत गटातील सदस्य हे अशिक्षित व अल्पशिक्षित असल्याने त्यांच्यातील साक्षरतेचे प्रमाण वाढविण्याच्या दृष्टीने विशेष मोहिमा, उपक्रम उदा.- प्रौढ शिक्षण वर्ग, निरंतर शिक्षण वर्ग सातत्याने चालविले पाहिजेत.

2) बचत गटांची स्थापना व संवर्धन यामध्ये सांगली जिल्हा मध्यवर्ती बँकेने नियुक्त केलेल्या सहयोगिनी व अंगणवाडी सेविका यांची भूमिका निर्णायक ठरल्याचे दिसून येते. त्यामुळे त्यांचा या चळवळीतील सहभाग वाढविण्याच्या दृष्टीने त्यांना जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेकडून आर्थिक मोबदला, प्रोत्साहनपर मानधन देणे गरजेचे आहे.

3) बचत गट बंद पडण्यामागे सर्वात महत्वाचे कारण बचत गटांचे लेखे अद्यावत, पूर्ण नसणे हे असल्याचे दिसून येते. याकरिता बचत गटांचे लेखे योग्य पध्दतीने ठेवण्यासाठी बचत गटाच्या सदस्यांना विशेषतः सचिव व हिशेबनीस यांना नियमित प्रशिक्षण, उजळणी प्रशिक्षण देणे गरजेचे आहे. तसेच बँकांनी देखील बचत गटांच्या पास बुकावरील नोंदी, कर्ज खात्याच्या नोंदी वेळेत अद्यावत करून देणे आवश्यक आहे.

4) केवळ उद्दिष्टपूर्तीसाठी प्रशिक्षण कार्यक्रम न राबविता स्वयंसेवी संस्था, शैक्षणिक संस्था आणि व्यावसायिक संस्था यांची मदत घेऊन प्रशिक्षणाचा सर्वंकष आराखडा आर्थिक वर्षाच्या सुरूवातीला तयार केला पाहिजे व त्याची काटेकोर अंमलबजावणी केली पाहिजे.

5) तालुका स्तरावर तालुका स्वर्ण जयंती ग्राम स्वरोजगार योजना समितीच्या दरमहा मिटींग होत नसल्याचे दिसून येते. केवळ उद्दिष्टपूर्तीच्या अनुषंगाने बैठकांचे आयोजन केले जाते. बचत गटांच्या प्रभावी वाटचाली करिता बचत गट, बँक, स्वयंसेवी संस्था, पंचायत समिती, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा यांच्या मध्ये योग्य समन्वय असणे आवश्यक आहे. याकरिता तालुका स्वर्ण जयंती ग्राम स्वरोजगार योजना समितीच्या बैठका नियमित झाल्या पाहिजेत. व त्यामध्ये बचत गटाच्या संघाला योग्य प्रतिनिधित्व दिले पाहिजे. बँक अधिकारी, विस्तार अधिकारी यांनी बचत गटांच्या काही सभांना स्वयंस्फूर्तपणे उपस्थित राहून मार्गदर्शन करणे आवश्यक आहे.

6) बचत गटांच्या केवळ संख्यात्मक वाढीवर भर न देता गुणात्मक बचत गट स्थापन करणे व त्यांचे संवर्धन करणे गरजेचे आहे. सध्या ज्या गटाला खेळते भांडवल व व्यवसाय कर्ज द्यावयाचे आहे. अशा गटांचे श्रेणीकरण केले जाते. असे न करता ठराविक कालावधीनंतर सर्वच बचत गटांचे श्रेणीकरण करणे, त्यांच्यामधील उणिवा

निदर्शनास आणून त्या सुधारण्यासाठी त्यांना कालावधी देणे व पुन्हा त्यांचे श्रेणीकरण करणे आवश्यक आहे. ही प्रक्रिया गटाची श्रेणी उत्तम होईतोपर्यंत चालू ठेवली पाहिजे. याच बरोबर बचत गटांचे लेखे तपासण्यासाठी स्वतंत्र यंत्रणा निर्माण करणे आवश्यक आहे.

7) वाळवा तालुक्यातील बहुतांशी बचत गट सदस्य हे शेती व्यवसायाशी निगडीत आहेत. उदा. शेतमजूर, लहान व सीमांत शेतकरी यांचे बचत गट. परंतु व्यवसायासाठी म्हैस पालन या एकमेव व्यवसायाची निवड केल्याचे दिसून येते. याचबरोबर बचत गट सदस्यांना इतर शेती पूरक व्यवसाय करण्यासाठी प्रवृत्त केले पाहिजे. उदा. निविष्ठा विक्री, पशु खाद्य विक्री, दुध व दुग्धजन्य पदार्थ प्रक्रिया उद्योग, फळ भाज्या, भाजीपाला विक्री संघ, खंडाने जमीन करणे, गांडूळ खत प्रकल्प इत्यादी.

8) बचतगटांचा स्वनिधी कमी असल्याने त्यांना बँकेकडून मिळणारा फिरता निधी ही कमी आहे. याकरिता गटातील संदस्यांनी त्यांची मासिक बचत वाढविली पाहिजे. तरच गटाचे खेळते भांडवल व गटाला मिळणारा फिरता निधी यामध्ये वाढ होईल.

9) बचत गटांच्या मासिक मिटींगसाठी गावांमध्ये बहुउद्देशीय सभागृह, समाज मंदीर आदी सुविधा उपलब्ध करून दिल्या पाहिजेत. तसेच एकत्रित व्यवसाय करण्याच्या दृष्टीने प्राथमिक सुविधा उदा. वर्कशेडचे नियोजन करणे आवश्यक आहे.

10) बँका त्यांच्या नियमित कामातून गटासाठी पुरेसा वेळ देत नाहीत. तसेच खेळते भांडवल वाटप, व्यवसाय कर्ज वाटप सदस्यांची मागणी असताना होत नाही. याकरिता बँकांनी बचत गटांचे श्रेणीकरण करणे, कर्ज मंजुरी व कर्ज वितरण यात तत्परता दाखविणे गरजेचे आहे. तसेच बँकांनी आठवडयांतून किंवा पंधरवडयातून एक दिवस बचत गटासाठी राखून ठेवणे आवश्यक आहे. उदा. एस.जी.एस.वाय.डे.

11) ज्या गटांचे कामकाज नियमित आहे, बचत व परत फेड नियमित आहे, अशा गटांसाठी जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, बँका यांनी प्रोत्साहन योजना सुरू करून अशा गटांना रोख बक्षीस, प्रशस्तीपत्र दिले पाहिजे. याचा इतर गटांच्या कार्य पध्दतीवर चांगला परिणाम होऊ शकेल.

**समारोप :-**

वर सुचविलेल्या उपाययोजनाप्रमाणे दारिद्रय रेषेखालील स्वयं सहाय्यता महिला बचत गटांच्या दुर्बल स्थानावर मात करण्यास मदत झाली तर स्वयं सहाय्यता महिला बचत गट हे ग्रामीण महिलांच्या जीवनात परिवर्तनाचे साधन बनतील. बचत गटाच्या माध्यमातून महिलांच्या आर्थिक विकासाला हातभार लागेल. या आर्थिक विकासाबरोबर जर महिलांचा मानसिक, सामाजिक विकास झाला तर त्यांच्यातील आत्मविश्वास वाढून निर्णय प्रक्रियेतील महिलांचा सहभाग वाढून खऱ्या अर्थाने महिला सबलीकरण झाले असे म्हणता येईल.

**संदर्भ :-**

1) **M. Lakshmipathi Raju (Editor- In- Chief)** Women Empowerment Challenges and Strategies, Regal Publications, New Delhi,

2) **Patil Sharad (2007)** : Banker to the Poor (Translated in Marathi), Suvidhya Prakashan, Solhapur.

3) **Choudhari Rajesh (Compiler and editor) (2008) :**
A Hand Book Of Self- Help Groups, Choudhari Law Publishers, Jalgaon.

4) **N. Lalitha (2008) :**
Readings in Microfinance, Dominant Publishers and Distributors.

5) **N. Lalitha (2008) :**
SHGs and Microfinance A Research, Compendium Dominant Publishers and Distributors.

6) Department of Women and Child Development, Sangli. Dist,Self-Help Groups of Women, Savings and Credit Programme

7) **Women and Economic Development.**
Deep and Deep Publications Pvt. Ltd. New Delhi.

8) **A Study Material of International Seminar (2008) :**
Social Exclusion and Inclusive Policies in South Asia, Organised by Center for Study of Social Exclusion and Inclusive Policies, Shivaji University Kolhapur March.

9) Datta and Sundaram (2007): Indian Economy, S. Chand and Company Ltd, New Delhi.

10) A Hand book on SGSY Scheme, Published by Govt. of India

11) Deshpande Deepa,Shamrao Patil, Ashok Todakar (eds.) Swayamsidha, Published by Walwa Taluka Mahila Nagri Sah. Path Santha Ltd. Rajarambapu Dyan Prabodhini Islampur. Tal. Walwa.

# हिंगोली जिल्हयातील आदिवासी समाजाच्या दारिद्रयाचे विश्लेषण

**चंद्रकांत कोकाटे**
अधिव्याख्याता,
अर्थशास्त्र विभाग, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ
औरंगाबाद

**रामकृष्ण सोळुंके**
प्राध्यापक,
अर्थशास्त्र विभाग,डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ
औरंगाबाद

भारतीय समाज व्यवस्थेतील एक महत्वाचा घटक म्हणजे आदिवासी समाज होय.विकासाच्या प्रक्रियेत समाजाच्या एखाद्या घटकाच्या समस्यांकडे दुर्लक्ष करता येणार नाही. आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत सर्वच समाजाचा विकास घडवून आणणे अभिप्रेत असते. नदीतील बेटाप्रमाणे समाज जीवनाच्या मुख्य प्रवाहापासून हा समाज अजूनही अलिप्त आहे. इतर समाज आणि आदिवासी जमाती यांच्यामधील अंतर केवळ भौगोलिक नसून मूलतः सांस्कृतिक आणि आर्थिक स्वरूपाचे आहे.लोकशाही राज्य हे सर्व लोकांचे राज्य असल्यामुळे आदिवासी आणि इतर समाज यांच्यातील हे सांस्कृतिक आणि आर्थिक स्तरावरील अंतर कमी करणे आज आवश्यक झाले आहे.

ब्रिटिश राजवटीत आदिवासींच्या विकासाचे प्रयत्न सुरू झाले होते. परंतु त्यांच्या या उद्देशामागे दयेसारख्या सात्विक भावना होत्या. त्याचप्रमाणे धर्मांतरासारखे काही राजस आणि समाज विच्छेदनासारखे तामस हेतूही होते. आज या कार्याचा वेग आणि व्याप वाढविणे आवश्यक आहे, त्याचप्रमाणे त्याच्या मुळाशी असलेली उद्दिष्टेही बदलणे आवश्यक आहे. लोकशाही राजवटीमध्ये समाजाचा कोणताही कोपरा आर्थिक विकास प्रक्रियेपासून दूर अथवा किमान विकास पातळीखाली राहता कामा नये अशी अपेक्षा असावी.

2001 या वर्षाच्या जनगणनेनुसार महाराष्ट्रमध्ये अनुसूचित जमातींची लोकसंख्या 85,77,276 एवढी असून राज्याच्या एकूण लोकसंख्येशी हे प्रमाण 8.9 टक्के एवढे येते. तसेच मराठवाडयाची एकूण लोकसंख्या 1,56,29,248 एवढी असून त्यामध्ये 6,08,109 एवढी लोकसंख्या होती. एकूण लोकसंख्येशी

हे प्रमाणे 3.9 टक्के एवढे येते. हिंगोली जिल्हयातील अनुसूचित जमातीची लोकसंख्या 86,898 एवढी असून एकूण जिल्हा लोकसंख्येशी हे प्रमाण 8.8 एवढे येते. तसेच हिंगोली जिल्हयामध्ये मराठवाड्यातील एकूण आदिवासींपैकी 14.3 टक्के आदिवासींचे वास्तव्य आहे. हिंगोली जिल्हयात आढळून येणारे आदिवासी हे 'आंध' जमातीचे आहेत. जिल्हा ठिकाणावरील अगदीच अल्प संख्येने असलेले अनिर्देशित आदिवासींचा अपवाद सोडला तर हिंगोली जिल्हा हा राज्यामधला असा एकमेव जिल्हा आहे की, जेथे केवळ एकाच जमातीचे लोक आढळतात.[1] या कारणाने 'आंध'जमातीमधील दारिद्रयाच्या पाहणी करिता सदरील अध्ययन विषयाची निवड करण्यात आली.

## संशोधनाची उद्दिष्टे :-

1) हिंगोली जिल्हयातील आदिवासी समाजातील दारिद्रयाचे प्रमाण शोधणे.
2) हिंगोली जिल्हयातील आदिवासी समाजाची खर्च रचना अभ्यासणे.
3) दारिद्रय दूर करण्याकरिता उपाय सुचविणे.

या वरील उद्दिष्टांच्या चौकटीत राहूनच संशोधन पूर्ण करण्यात आले आहे.

## संशोधन पद्धती :-

हिंगोली जिल्हयातील आदिवासी समाजातील दारिद्रयाच्या पाहणीकरिता प्राथमिक साधन सामग्रीचा आधार घेण्यात आला आहे. त्याकरिता मुलाखत अनुसूची हे साधन वापरून दारिद्रयविषयक तथ्य मिळविण्यात आली आहेत. याकरिता जिल्हा समग्राचे पाच तालुकास्तरीय उपसमग्रात विभाजन करण्यात आले. या प्रत्येक उपसमग्रातून प्रत्येकी पाच गावे व पद्धतीप्रमाणे संशोधनासाठी एकूण 25 गावांची निवड करण्यात आली. प्रत्येक गावातून सहेतुक नमुना निवड पद्धतीने (Purposive Sampling Method) एकूण 20 आदिवासी कुटुंबाची निवड करण्यात आली. अशा रीतीने समग्रामधून एकूण 500 नमुने निवडण्यात आले आणि त्याआधारे हिंगोली जिल्हयातील आदिवासी समाजातील दारिद्रयाचे अध्ययन करण्यात आले.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारतापुढे ज्या विविध समस्या होत्या; त्यामध्ये दारिद्रयाचे मोठे प्रमाण ही एक महत्वाची समस्या होती. देशाच्या आर्थिक विकासाबरोबर दारिद्रयाचे प्रमाण कमी होत गेले हे नाकारून चालणार नाही. असे असले तरी आदिवासी समाजामधील दारिद्रयाचे प्रमाण घटविण्यात शासनाला म्हणावे तसे यश मिळू शकले नाही. त्यामुळेच 1999-2000 मध्ये आदिवासी समाजातील दारिद्रयाचे प्रमाण 43.76 एवढे अधिक असल्याचे दिसून येते.[2]

भारतात सर्वसाधारण दारिद्रयाची जी व्याख्या केली जाते तिचा आधार अन्न,वस्त्र व निवारा या प्राथमिक किमान गरजांची पूर्तता हा आहे. या गरजांच्या पुर्ततेसाठी जो खर्च लागतो तो गृहीत धरून किमान दरडोई उपभोग खर्च काढला जातो. ज्या कुटुंबाची उत्पन्नपातळी या उपभोग खर्चापेक्षा कमी आहे, अशा कुटुंबाचा समावेश दारिद्रयरेषेखाली केला जातो; असे असले तरी दारिद्रयाची सर्वमान्य होईल अशी व्याख्या करणे कठीण आहे. दारिद्रयाच्या बाबतीत अनेक तज्ज्ञांनी आपले विचार व्यक्त केले असले तरी त्यात एकवाक्यता नाही. काहींनी 'किमान जीवनमान' (Minimum Level of Living),काहींनी 'वाजवी

जीवनमान' (Reasonable Level of Living ) विचारात घेऊन आपले विचार मांडले. अमर्त्य सेन यांनी 'Poverty and Famines' या पुस्तकात दारिद्रयाचे विश्लेषण दुष्काळ, अन्न धान्याचा तुटवडा, अपुऱ्या आरोग्य सुविधा, मागासलेली शिक्षण व्यवस्था, पूर, रोगराई यांचा आधार घेऊन केले. कुपोषण, निरक्षरता, आजारपण,बालमृत्यूचे प्रमाण व सरासरी कमी आयुर्मान अशी स्थिती जेथे आढळून येते, ती परिस्थिती म्हणजे दारिद्रय होय, असे अमर्त्य सेन यांनी नमुद केले आहे.[3]

## भारतातील दारिद्रयाचा अभ्यास :

भारतातील दारिद्रयाविषयक पूर्वाभ्यासामध्ये दादाभाई नौरोजी (1876), डॉ. दांडेकर व रथ (1960), मिन्हास बी. एस. (1970), डॉ. ओझा पी.पी.(1970), मोन्टेक अहलुवालिया(1977), प्रा. अमर्त्य सेन(1981), प्रा.लकडावाला (1995), इ.अर्थतज्ज्ञांची भूमिका महत्वाची मानली जाते. दादाभाई नौरोजी यांनी ब्रिटिश राजवटीने प्रसिद्ध केलेल्या आकडेवारीच्या आधारे भारतीयांचे दरडोई उत्पन्न 20 रूपये होते. तर किमान निकृष्ट जीवनाकरिता त्या वेळेस 34 रूपये आवश्यक असल्याचे निदर्शनास आणून भारतीयांच्या दारिद्रयाची तीव्रता स्पष्ट केली. डॉ. दांडेकर व रथ यांनी भारतीयांसाठी दररोज 2250 कॅलरीजचा निकष लक्षात घेऊन 1960 – 61 मध्ये ग्रामीण भागातील 40 टक्के तर शहरी भागातील 50 टक्के नागरी लोकसंख्या दारिद्रयरेषेखाली असल्याचे सांगितले.

डॉ. मिन्हास यांनी प्रत्येक भारतीय व्यक्तीस प्रत्येक वर्षी 240 रूपये इतका उपभोग खर्च आवश्यक असल्याचे गृहीत धरून 1967-68 मध्ये ग्रामीण भागात 50.6 टक्के लोक दारिद्रया रेषेखालील असल्याचा निष्कर्ष काढला. डॉ. ओझा यांनी ग्रामीण भागातील प्रत्येक व्यक्तीला रोज किमान 518 ग्रॅम अन्नधान्याचा उपभोग व शहरी भागाकरिता किमान 432 ग्रॅम उपभोग घेणे आवश्यक म्हणून 1960-61 मध्ये शहरी व ग्रामिण भागातील दारिद्रयाचे प्रमाण 44 टक्के असल्याचा निष्कर्ष काढला. मोन्टेक अहलुवालिया यांनी 1960-61 च्या किंमतीच्या आधारे ग्रामीण व शहरी भागातील प्रत्येक व्यक्तीसाठी प्रत्येक वर्षी अनुक्रमे 180 रू. व 240 रू. किमान उपभोग्य खर्च आवश्यक मानला व त्या आधारे 1973-74 मध्ये ग्रामीण भागातील 46 टक्के लोकसंख्या दारिद्रय रेषेखाली जीवन जगत असल्याचा निष्कर्ष काढला. प्रा. अमर्त्य सेन यांनी दारिद्रय विषयक विचार मांडताना असे म्हटले आहे की, अर्थव्यवस्था खुली करताना त्याचे फायदे – तोटे कोणाला, कसे होतील याचा विचार केला पाहिजे. सामाजिक संधीची कमतरता, निरक्षरता व आरोग्याची आवश्यकता असताना जर जागतिकीकरणाची गती वाढविली तर त्याचे फायदे प्राप्त होण्याऐवजी त्यामुळे समस्याच निर्माण होतील असा इशारा दिला. आरोग्याची काळजी व शिक्षणाकडे दुर्लक्ष केले तर उदारीकरणाचे फायदे कमी होतात. अमर्त्य सेन यांच्या मते धान्याची उपलब्धता नसणे हे दारिद्रयाचे कारण नाही, तर बेरोजगारीमुळे क्रयशक्तीचा अभाव हे भारतातील दारिद्रयाचे कारण आहे.[4]

## हिंगोली जिल्ह्यातील आदिवासी समाजाचे दारिद्रय :

दारिद्रय रेषेखालील कुटुंब गणनेच्या (1997-98) मार्गदर्शक पत्रात सूचित केल्याप्रमाणे ग्रामीण भागातील कुटुंबाचे सर्व बाजूंनी मिळणारे वार्षिक उत्पन्न किंवा खर्च 20 हजार रूपयांपेक्षा कमी किंवा कुटुंबाचे मासिक उत्पन्न किंवा खर्च 1700 रूपयांपेक्षा कमी आहे, अशा कुटुंबाना दारिद्रय रेषेखालील कुटुंब समाजावे.[5]

2006-07 या वर्षाकरिता ग्रामीण भागातील कुटुंबांचे सर्व बाजूंनी मिळणारे वार्षिक उत्पन्न किंवा खर्च 20 हजार रूपयांपेक्षा कमी किंवा कुटुंबाचे मासिक उत्पन्न किंवा खर्च 1700 रूपयांपेक्षा कमी असलेली कुटुंबे दारिद्र्यरेषेखालील आहेत, असे मार्गदर्शक परिपत्रकात (1997 - 98) सूचित केल्याप्रमाणे अध्ययन केले असता हिंगोली जिल्यातील आदिवासी समाजामध्ये दारिद्र्याचे

**तक्ता क्र. 1**

**आदिवासी कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न गटानुसार वर्गीकरण**

| अ.क्र. | उत्पन्न गट (रूपये ) | कुटुबांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1 | 0 ते 5000 | 00 | --- |
| 2 | 5001 ते 10000 | 19 | 3.8 |
| 3 | 10001 ते 15000 | 47 | 9.4 |
| 4 | 15001 ते 20000 | 124 | 24.8 |
| 5 | 20001 ते 25000 | 124 | 28.4 |
| 6 | 25001 ते 30000 | 52 | 10.4 |
| 7 | 30001 ते 35000 | 54 | 10.8 |
| 8 | 35001 ते 40000 | 26 | 5.2 |
| 9 | 40001 ते 45000 | 36 | 7.2 |
| | एकूण कुटुंब | 482 | 100 |

**स्त्रोत** : प्रत्यक्ष नमुना पाहणी

प्रमाण अधिक दिसून येते. तक्ता क्र. 1 नुसार हे आधिक स्पष्ट करता येईल.

तक्ता क्र.1 नुसार नमुना 500 आदिवासी कुटुंबांचे उत्पन्न गटानुसार वर्गीकरण केले असता असे दिसून येते की, 2006-07 या वर्षामध्ये 24 हजारांपेक्षा कमी वार्षिक उत्पन्न असणारे कुटुंबाचे प्रमाण 76.4 टक्के एवढे येते. दारिद्र्य रेषेखालील कुटुंब गणना 97-98 च्या मार्गदर्शक पत्रकानुसार ज्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न 20 हजारांपेक्षा कमी आहे, अशा कटुंबाचा समावेश दारिद्र्यरेषेखाली होतो. ही उत्पन्न मर्यादा विचारात घेतली असता 2006-07 मध्ये 500 नमुना कुटुंबांपैकी 190 कुटुंबे दारिद्र्य रेषेखाली जीवन जगत असल्याचे दिसून येते, म्हणजेच दारिद्र्य रेषेखालील कुटुंबाचे प्रमाण 38 टक्के एवढे येते.

थोडक्यात, तक्ता क्र.1 नुसार उत्पन्न गटानुसार आदिवासी कुटुंबाचे वर्गीकरण केले असता वार्षिक 40,000 रूपयांपेक्षा अधिक उत्पन्न असणाऱ्या कुटुंबांची संख्या केवळ 36 असून हे प्रमाण 7.2 येते. दारिद्र्यरेषेखालील असलेले 38 टक्के प्रमाण हे 97-98 च्या मार्गदर्शक पत्रकानुसार होते. प्रत्यक्षात 06-07 या स्थितीचा विचार केल्यास हे प्रमाण बरेचसे अधिक असू शकते. यावरून असे म्हणता येते की, देशपातळीवर तसेच राज्य पातळीवर दारिद्र्याच्या प्रमाणात गतीने घट होत

असली तरी आदिवासीमधील दारिद्रयाचे प्रमाण अद्याप जास्त असल्याचे दिसून येते.

हिंगोली जिल्हयातील आदिवासीमधील दारिद्रय रेषेखालील प्रमाण शोधण्यासाठी वार्षिक उत्पन्नाच्याबरोबरच मासिक उपभोग खर्च या निर्देशकाचा आधार घेण्यात आला या निकषाच्या आधारे 500 नमुना आदिवासी कुटुंबाच्या उपभोग खर्चाचे अध्ययन केले असता दारिद्रयाचे प्रमाण अधिक दिसून आले, हे तक्ता क्र. 2 नुसार स्पष्ट करता येते.

**तक्ता क्र. 2**

**मासिक उपभोग खर्चानुसार वर्गीकरण**

| अ.क्र | उपभोग खर्च(रूपये) | कुटुबांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1 | 0 ते 500 | 17 | 3.4 |
| 2 | 501ते 800 | 28 | 5.6 |
| 3 | 801 ते 1100 | 43 | 8.6 |
| 4 | 1101 ते 1400 | 62 | 12.4 |
| 5 | 1401 ते 1700 | 92 | 18.4 |
| 6 | 1701 ते 2000 | 112 | 22.4 |
| 7 | 2001 ते 2300 | 84 | 16.4 |
| 8 | 2301 ते 2600 | 32 | 6.4 |
| 9 | 2600 पेक्षा अधिक | 30 | 6 |
| 10 | एकूण कुटुंबे | 500 | -- |

**स्त्रोत :** प्रत्यक्ष नमुना पाहणी

तक्ता क्र. 2 नुसार असे दिसून येते की, 97-98 च्या दारिद्रय रेषेखालील कुटुंब गणनेच्या मार्गदर्शक पत्रकानुसार 1700 रू. पर्यंतच्या मासिक उपभोग खर्च असलेली कुटुंबे दारिद्रय रेषेखालील मानली जातात. या आधारे 06-07 या वर्षी 500 नमुना आदिवासी कुटुबांच्या मासिक खर्चाचे अध्ययन केले असता 1700 रू.पेक्षा कमी मासिक उपभोग खर्च असलेल्या कुटुंबाची संख्या 242 असून हे प्रमाण 48.8 टक्के येते.

थोडक्यात, वार्षिक उत्पन्न या निकषाच्या आधारे 38 टक्के एवढे दारिद्रयाचे प्रमाण येते.तर मासिक उपभोग या निकषाच्या आधारे हे प्रमाण 48.8 टक्के येते. या दोन्ही निकषांमध्ये 10.4 ची तफावत दिसून येते. त्यामागील कारण म्हणजे आदिवासी दैनंदिन उपभोगासाठी अनेक वस्तू स्वतःच मिळवित असल्याने त्याचा समावेश यामध्ये नाही. विशेषतः शिकार करून मांस -मासे मिळविणे, स्वतःच दारू गाळणे, कंदमुळे अथवा वनौपजीवाचा उपभोगात वापर करणे इ .कारणांमुळे वार्षिक उत्पन्न या निकषापेक्षा मासिक उपभोग खर्चाचा निकष वापरल्यास दारिद्रयाचे अधिक प्रमाण दिसून येते.

महाराष्ट्र शासनाच्या ग्रामविकास व जलसंधारण विभागाच्या दारिद्रय रेषेखालील कुटुंबांची गणना (2002-03) च्या मार्गदर्शक परिपत्रकानुसार दारिद्रय मापनासाठी एकूण 13 निकष ठरविण्यात आले आहेत. प्रत्येक निकषाकरिता 0 ते 4 असे गुण देण्यात आले. म्हणजेच या निकषांचे किमान 0 ते कमाल 52 गुण होतात. या 13 निकषांचा वापर करून ज्या कुटुंबाचे कमाल गुण 28 किंवा त्यापेक्षा कमी असतील तर त्या कुटुंबाची गणना दारिद्रय रेषेखालील केली जाते. या निकषांच्या आधारे 2002-03 नंतर दारिद्रय रेषेखालील कुटुंबाचे प्रमाण काढण्यात येते आहे. या संबंधीचा तपशील परिशिष्ट -1 मध्ये दर्शविण्यात आला आहे.

हिंगोली जिल्हयातील आदिवासी कुटुंबातील दारिद्रयाचे प्रमाण शोधण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या ग्रामविकास व जलसंधारण विभागाच्या दारिद्रय रेषेखालील कुटुंब गणना 2002-03 च्या मार्गदर्शक परिपत्रकानुसार दारिद्रय मापनासाठी जे एकूण 13 निकष वापरले, त्या निकषांचा आधार घेता खालील प्रमाणे निष्कर्ष काढता येतील.

### 1) जमीनीचे धारण क्षेत्र :

या निकषानुसार भूमिहीनाची संख्या 274 असून 1 हेक्टर पेक्षा कमी जिरायत किंवा अर्धा हेक्टर पेक्षा कमी बागायत धारणक्षेत्र असणाऱ्या कुटुबांची संख्या 47 एवढी होती. 1 हे. ते 2 हे. जिरायत किंवा अर्धा हे. ते 1 हे.बागायत धारणक्षेत्र असणारांची संख्या 119 होती. 2 हे. ते 5 हे. जिरायत किंवा 1 हे. ते 2.5 हे.बागायत जमीन असलेल्या कुटुंबाची संख्या 42 एवढी होती. 5 हे. पेक्षा अधिक जिरायत किंवा 2.5 हे. पेक्षा अधिक बागायत जमीन असलेल्या कुटुंबांची संख्या 18 एवढी होती.

### 2) घराचा प्रकार :

नमुना कुटुंबापैकी कच्चे घर 285 कुटुंबांकडे होते. अर्धवट पक्के घर असणाऱ्या कुटुंबांची संख्या 95 एवढी होती. पक्के घर 118 जणांकडे होती, तर शहरी प्रकारची घरे केवळ 02 कुटुंबांकडे आढळली.

### 3) कपडे वापर :

नमुना कुटुंबापैकी प्रती व्यक्ती 2 पेक्षा कमी कपडे असणाऱ्या कुटुंबांची संख्या 27 असून, प्रती व्यक्ती 2 ते 4 कपडे असणाऱ्या कुटुंबांची संख्या 372 एवढी होती. प्रती व्यक्ती 4 ते 6 कपडे असणारी कुटुंबाची संख्या 89 होती. प्रती व्यक्ती 6 ते 12 कपडे असलेल्या कुटुंबांची संख्या 12 एवढी होती.

### 4) अन्न सुरक्षा :

नमुना कुटुंबापैकी सर्वसाधारण प्रतिदिन 1 चौरस आहार जेवण घेणाऱ्या कुटुंबांची संख्या 118 असून, वर्षभर 1 चौरस आहार जेवण घेणाऱ्या कुटुंबांची संख्या 285 एवढी होती. काही वेळेस कमतरता परंतु वर्षभर प्रतिदिन 2 चौरस आहार जेवण घेणाऱ्या कुटुंबांची संख्या 95 होती. केवळ 24 कुटुंबांना वर्षभर पुरेल एवढे अन्न मिळते.

### 5) स्वच्छता :

नमुना कुटुंबापैकी उघडयावर शौच्यास बसणे भाग पडते; अशा कुटुंबांची संख्या 475 असून अनियमित पाणी पुरवठयाशिवाय सामुदायिक शौचालये असणारी कुटुंबे 22 एवढी होती. तर केवळ 03 कुटुंबाकडे खाजगी शौचालये होती.

### 6) उपभोग योग्य टिकाऊ वस्तुः

दूरदर्शन, विद्युत पंखे, रेडिओ,स्वयंपाक घरातील उपकरणे या पैकी एक, दोन, तीन उपकरणे असलेली कुटुंबे ही अनुक्रमे 112,118,46 असून वरील पैकी उपकरण नसलेली कुटुंबांची संख्या 176 एवढी होती. या उपकरणाच्या जोडीने दूरध्वनी, फ्रिज, रंगीत दूरदर्शन संच, ट्रॅक्टर या पैकी एक उपकरण असणारी कुटुंबे 48 होती.

**7) घरातील जास्त शिकलेल्या प्रौढ व्यक्तीची संख्या :**

नमुना कुटुंबांपैकी प्रौढ व्यक्ती निरक्षर असलेल्या कुटुंबांची संख्या 62 असून कुटुंबात प्रौढ व्यक्तींनी प्राथमिक शिक्षण घेतलेल्या कुटुंबांची संख्या 232 एवढी आढळली. 10 वी उत्तीर्ण आणि पदवीधर किंवा व्यावसायिक पदविका शिक्षण घेतलेल्या प्रौढ व्यक्तींची कु टुंब संख्या अनुक्रमे 142 व 48 एवढी होती. पदव्युत्तर पदवी किंवा व्यावसायिक पदवीधर प्रौढ व्यक्ती असलेल्या कुटुंबांची संख्या 16 एवढी होती.

**8) कुटुंबांच्या मजुर शक्तीचा दर्जा :**

कुटुंबाचा मजुर शक्तीचा दर्जा अभ्यासला असता नमुना कुटुंबापैकी 382 कुटुंबांच्या मजुर शक्तीत स्त्रिया व बालमजुर आढळतात. केवळ स्त्री मजुर असलेली व बालमजुर नसलेली 94 कुटुंबे आढळली, तर केवळ 24 कुटंबांत फक्त प्रौढ पुरूष मजुर आढळली.

**9) उपजीविकेचे साधन :**

उपजीविकेचे साधन केवळ मजूरी असलेली नमुना कुटुंबापैकी 242 कुटुंबे आढळली असून, उदरनिर्वाहासाठी शेतीचा वापर 218 कुटुंबे करताना दिसून येतात. उपजीविकेचे साधन कारागीरी असलेले 06 कुटुंबे आढळली. उपजीविकेचे साधन वेतन असलेल्या कुटुंबांची संख्या 24 एवढी येते. इतर प्रकारचे उदरनिर्वाहाचे साधन असणारी 10 कुटुंबे आढळली.

**10) 5 ते 14 या वयोगटातील मुलांचा शैक्षणिक दर्जा :**

नमुना पाहणीत शाळेत न जाता काम करणारी मुले 67 कुटुंबांत आढळली. शाळा व काम करणारी मुले 337 कुटुंबांत आढळली, तर शाळेत जाणारी आणि काम न करणारी मुले 96 कुटुंबांत आढळली.

**11) कर्जबाजारीपणाचा प्रकार :**

नमुना पाहणीत अनौपचारीकरित्या दैनंदिन उपभोगासाठी कर्ज घेणारी 57 कुटुंबे आढळली. अनौपचारीकरित्या उत्पादन कार्यासाठी कर्ज घेणारी 112 कुटुंबे होती.अनौपचारीकरित्या इतर उद्दिष्टासाठी कर्ज घेणारी 178 कुटुंबे होती. वित्तीय संस्थांकडून 153 कुटुंबांनी कर्ज घेतले होते.

**12) स्थलांतरणाची कारणे :**

नमुना कुटुंबापैकी 42 कुटुंबांनी प्रासंगिक कामासाठी घरातून स्थलांतर केल्याचे दिसते. हंगामी रोजगारासाठी 158 कुटुंबे स्थलांतर करतात. उपजीविकेच्या इतर स्वरूपासाठी 26 कुटुंबे स्थलांतर करतात. अस्थलांतरीत कुटुंबांची संख्या 274 एवढी होती.

**13) सहाय्याची पसंती किंवा आवड :**

शासनाकडून मजुरी, रोजगार, निर्धारीत

सार्वजनिक वितरण पद्धती द्वारे साह्य हवे असलेली नमुना कुटुंबापैकी 272 कुटुंबे होती. स्वयंरोजगार या माध्यमाने साह्य हवे असलेली 18 कुटुंबे होती. निवाऱ्याकरिता साह्याला पसंती देणारी कुटुंबे 210 एवढी होती.

थोडक्यात दारिद्रय मापनाकरिता वापरण्यात येणाऱ्या 13 निकषांनुसार नमुना 500 कुटुंबांचे अध्ययन केले असता बहुतांशी कुटुंबे दारिद्रयामध्ये जीवन जगतांना दिसून येतात.

जिल्हयातील आदिवासी कुटुंबांच्या खर्चाची रचना अभ्यासली तर आदिवासी समाजातील दारिद्रयाचे अधिक प्रमाण विचारात घेता अधिकाधिक खर्च मूलभूत गरजांच्या पुर्ततेसाठीच होताना दिसून येतो. हे तक्ता क्र.3 वरून अधिक स्पष्ट होईल.

**तक्ता क्र. ३**

**नमुना कुटुंबाची खर्च रचना**

| अ.क्र. | तपशील | खर्चाचे प्रमाण |
|---|---|---|
| 1 | अन्न | 62.43 |
| 2 | कपडा | 8.02 |
| 3 | व्यसन | 10.12 |
| 4 | शिक्षण | 01.93 |
| 5 | प्रवास | 5.6 |
| 6 | करमणूक | 1.63 |
| 7 | इतर | 10.81 |
| 8 | एकूण | 100 |

**स्त्रोत** : प्रत्यक्ष नमुना पाहणी

तक्ता क्र.3 नुसार आदिवासी कुटुंबांच्या खर्चाची रचना अभ्यासली असता असे दिसून येते की, अन्न या मूलभूत गरजेवरच एकूण खर्चापैकी 62.43 टक्के एवढा खर्च केला जात होता. कापडा करिता 8.02 टक्के एवढा खर्च केला जातो, तर व्यसनावरील खर्चाचे प्रमाण 10.12 टक्के आहे.

थोडक्यात, हिंगोली जिल्हयातील आदिवासी समाजाच्या दारिद्रयाचे विश्लेषण केले असता, वार्षिक उत्पन्न 20 हजार ही उत्पन्न मर्यादा विचारात घेतली तर दारिद्रय रेषेखालील कुटुंबांचे प्रमाण 38 टक्के एवढे येते. तर महाराष्ट्र शासनाच्या ग्रामविकास व जलसंधारण विभागाच्या दारिद्रय रेषेखालील कुटुंब गणना (2002-03 ) च्या मार्गदर्शक परिपत्रकानुसार दारिद्रय मापनासाठी जे एकूण 13 निकष वापरले त्या निकषांचा आधार घेतला तर दारिद्रयाचे प्रमाण लक्षणीय असल्याचे

दिसून येते. आदिवासी कुटुंबांच्या खर्चाची रचना अभ्यासली तर अन्नधान्य या मूलभूत गरजेवर एकूण खर्चापैकी 62.43 टक्के एवढा खर्च केला जात असल्याचे दिसून येते.

**सारांश :**

थोडक्यात आदिवासी समाज हा डोंगर दऱ्यात वास्तव्य करणारा समाज आहे. जंगलाशी निगडीत शिकार करणे, मासे पकडणे, कंदमुळे, वनौपजिवे गोळा करणे. या बाबी त्यांच्या दृष्टिने जीवन जगण्याचा मार्ग आहे. कमाची दैन्यावस्था व त्यामुळे दैनंदिन उदरनिर्वाहाचा प्रश्न यातून या समाजाचे शिक्षणाकडे दुर्लक्ष झाल्याचे दिसून येते. अज्ञान, दारिद्र्य व आर्थिक पिळवणुकीमुळे हा समाज मागासलेला राहिला. आदिवासी समाज हा पुर्वीपासूनच उपेक्षित जीवन जगणारा समाज म्हणून ओळखला जातो. जंगल, डोंगरदऱ्याच्या साहाय्याने त्यांचे स्वातंत्र्य अबाधित ठेवले. इतर समाजापासून हा समाज दूर राहिल्याने आत्मकेंद्रीत बनला. अशा अलिप्तपणामुळे त्यांनी त्यांची संस्कृती टिकवून ठेवली असली तरी त्याचा विपरीत परिणाम त्यांच्या दूरगामी विकासावर झाल्याचे ठळकपणे दिसून येते. सिमित भूप्रदेश, सिमित तंत्रविद्या, साधी अर्थव्यवस्था, विशिष्ट भाषिक गट इ. वैशिष्ट्यांमुळे आदिवासी समाज इतर समाजापेक्षा सांस्कृतिक, आर्थिक, शैक्षणिक तसेच सामाजिक दृष्ट्या मागासलेला दिसून येतो. खरे तर आदिवासी या देशातील मूळ निवासी असून आर्य भारतात येण्यापुर्वी आदिवासी हे सांस्कृतिक आणि आर्थिकदृष्टया संपन्न होते. परंतु आर्यांच्या आगमनानंतर त्यांच्याशी होत असलेल्या नेहमीच्या संघर्षामुळे आदिवासींना त्यांचे स्वतंत्र जीवन जगण्यासाठी जंगल डोंगरदऱ्याचा आश्रय घ्यावा लागला. त्यामुळे आदिवासींच्या सुपीक जमीनीवर आणि संपन्न नगरांवर आर्यांनी ताबा मिळविल्यामुळे आदिवासीच्या विपन्नावस्थेला सुरूवात झाली. आज हिंगोली जिल्हयात आढळणारा आदिवासी समाज शेती व शेतमजुरी करीत असला तरी त्यांची वस्ती ही डोंगराळ भागात, दऱ्याखोऱ्यात आहे. त्यामुळे नागरी भागापासून दूर आणि खडकाळ जमीन यामुळे आदिवासींची आर्थिक स्थिती फारच हलाखीची दिसून येते.

**उपाययोजना :**

1) आदिवासींच्या दारिद्र्याचे मूळ अल्पशिक्षणात आहे. परंतु जर पोटाची खळगी रिकामी असतील तर शिक्षणाचा विचार कसा करणार ? यासाठी शासनाने आदिवासींचा सुरूवातीला उदरनिर्वाहाचा प्रश्न सोडवावा.
2) आदिवासी मध्ये भूमीहीन मजुराचे मोठे प्रमाण आहे. हे मोठे प्रमाण विचारात घेता शासनाच्या ताब्यातील जमीनीचे वाटप भूमीहीन आदिवासींमध्ये करावे की, जेणे करून भूमीपुत्रांना योग्य न्याय देता येईल.
3) शासन आदिवासी विकासावर प्रचंड प्रमाणात खर्च करताना दिसून येते. परंतु त्याचा फारच अल्प प्रमाणात लाभ प्रत्यक्ष आदिवासीपर्यंत पोहचतांना दिसून येतो . त्यामुळे इतर समाजाचे दारिद्र्य जलद गतीने कमी होत असले तरी आदिवासी मधील दारिद्र्याचे प्रमाण अद्याप मोठे असल्याचे दिसून येते. तेव्हा या विकास योजनेचा लाभ आदिवासींना प्रत्यक्षात कसा मिळेल या दृष्टीने प्रयत्न करावा.
4) शासन आदिवासींच्या विकासासाठी जेवढा

निधी उपलब्ध करून देते; त्याचा पूर्ण वापर केला जात नाही. शिल्लक राहिलेला निधी परस्पर इतर खात्याकडे वळविला जातो. हे आदिवासींच्या विकासावरील अतिक्रमण थांबवून या शिल्लक निधीचा स्वतंत्र आदिवासी विकास निधीत समावेश करून त्याचा आदिवासींच्या कल्याणासाठी वापर करावा.

5) आदिवासी विभागातील यंत्रणा विभागाला उपलब्ध झालेल्या निधीचा पूर्णतः विनियोग करीत नसल्याचे दिसून येते. तेंव्हा जेवढा निधी मंजूर होतो त्याचा पूर्णतः विनियोग होण्यासाठी त्या त्या भागातील आदिवासी नेत्यांचे त्यावर पूर्णतः नियंत्रण ठेवले जावे.

6) महाराष्ट्रातील आदिवासींचे एकूण लोकसंख्येमध्ये 9 टक्के प्रमाण विचारात घेता नोकरी मध्ये लोकसंख्येच्या प्रमाणात आरक्षण देण्यात यावे.

7) हिंगोली जिल्हयातील आदिवासी विभागाकडून राबविण्यात येणाऱ्या योजनेचा फारच अल्प प्रमाणात लाभ मिळाल्याचे दिसून येते. तेव्हा हा लाभ जिल्हयातील आदिवासींपर्यंत पोहचण्यासाठी हिंगोली जिल्हयाच्या ठिकाणी जिल्हयातील आदिवासी लोकसंख्येचा विचार करता स्वतंत्र प्रकल्प कार्यालय सुरू करावे.

8) जिल्हयातील आदिवासींमध्ये व्यावसायिक तसेच स्वंयरोजगाराचे प्रमाण कमी आहे. तेव्हा व्यावसायिक शिक्षण सुविधेत वाढ करून स्वयंरोजगाराचे प्रशिक्षण आदिवासी मुलांना दिले जावे.

9) आदिवासींच्या घराची स्थिती अभ्यासली तर तुलनात्मकदृष्टया अधिक संख्येने कच्ची घरे दिसून येतात. तेव्हा इंदिरा आवास योजनेच्या माध्यमाने आदिवासींना पक्क्या घराचे बांधकाम करून द्यावे.

थोडक्यात कल्याणकारी राज्य निर्माण करण्याचे स्वप्न उराशी बाळगून वाटचाल करणाऱ्या भारत देशाला आदिवासींच्या समस्यांकडे दुर्लक्ष करून आपली सर्वकंष प्रगती साधणे शक्य होणार नाही. त्याचबरोबर समाजातील एवढा मोठा गट दीर्घकाळ उपेक्षित जीवन जगत आहे. ही स्थिती सामाजिक न्यायाच्या दृष्टीनेही योग्य नाही. म्हणूनच आदिवासींची समस्या ही एक राष्ट्रीय समस्या आहे, असे मानूनच त्यावर उपाययोजना केली पाहिजे. तरच डोंगर कपाऱ्यात राहणाऱ्या निर्मळ परंतु खडतर जीवन जगणाऱ्या हाडामासाच्या आदिमांना काहीतरी न्याय देता येईल आणि आदिवासींच्या जीवनात आशेची नवीन पहाट उगवेल.

**संदर्भ :**

1) कोकाटे चंद्रकांत, हिंगोली जिल्हयातील आदिवासी समाजाचे आर्थिक आणि सामाजिक अध्ययन, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद (अप्रकाशित प्रबंध) 2008, पृ.क्र.१४७

2) सरकार एस., मिश्रा. एस., दयाल एच., नाथन डी, (2006) : शेडयुल ट्राईब्स् ऑफ इंडिया - डेव्हलपमेंट ॲन्ड डिप्रीव्हेशन, इन्स्टिट्यूट फॉर ह्यूमन डेव्हलपमेंट, न्यू दिल्ली पृ.क्र.9

3) अमर्त्य सेन, (1981), ''पॉव्हर्टी ॲन्ड फॅमिन्स'' ॲन एस्से ऑफ इनटायटलमेन्ट ॲन्ड डिप्रीव्हेशन, ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेस, न्यू दिल्ली.

4) देशमुख सुदर्शन (2007), ''आदिवासी

समाजाचे दारिद्रय'', निर्मल प्रकाशन, नांदेड पृ.क्र.39

5) दारिद्रय रेषेखालील कु टुंबगणनाः (1997 - 98) मार्गदर्शक परिपत्रक, महाराष्ट्र शासन .

6) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभागाच्या दारिद्रय रेषेखालील कुटुंबांची गणना (2002-03) चे मार्गदर्शन परिपत्रक.

# मराठी अर्थशास्त्र परिषद

## अर्थसंवादसाठी अनुदान

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या विनंतीला प्रतिसाद देऊन भारतीय सामाजिक विज्ञान अनुसंधान परिषद (ICSSR), नवी दिल्ली यांचेकडून अर्थसंवादच्या अंकांच्या प्रकाशनाच्या खर्चासाठी पन्नास हजार रूपयांचे अनुदान प्राप्त झाले आहे. सन 2008-09 या वर्षासाठी मिळालेल्या विशेष अनुदानाबद्दल मराठी अर्थशास्त्र परिषद भारतीय सामाजिक विज्ञान अनुसंधान परिषदेची कृतज्ञ आहे.

**कार्यवाह खजिनदार**

# दक्षिण कोकणातील आंबा प्रक्रिया उद्योगाचे अर्थशास्त्र आणि समस्या

**बबन खामकर**
प्रपाठक, अर्थशास्त्र विभाग,
कणकवली कॉलेज, कणकवली
जि. सिंधुदुर्ग – 416602
फोन नं. – 9423203745

**1.1 प्रास्ताविक :**

महाराष्ट्राच्या पश्चिम किनारपट्टीचे दोन भाग पडतात; दक्षिण कोकण आणि उत्तर कोकण. उत्तर कोकणामध्ये औद्योगिकरण आणि शहरीकरण अधिक प्रमाणात झालेले आहे. दक्षिण कोकणामध्ये औद्योगिकरण आणि शहरीकरणाचा वेग कमी आहे. दक्षिण कोकणात रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या दोन जिल्हयांचा समावेश होतो. या जिल्हयातील जमीन आणि हवामान फलोद्यान विकासासाठी उपयुक्त आहे. या जिल्हयाला 100% अनुदानातून फळबाग लागवड कार्यक्रमाचा चांगला लाभ झालेला आहे. त्यामुळे आंबा, काजू, कोकम, फणस इत्यादी फळांचे उत्पादन मोठ्या प्रमाणावर होते. या फळांवर प्रक्रिया करणारे उद्योग या दोन जिल्हयांमध्ये सुरु झाले. परंतु त्यांचा विकास ज्या वेगाने व्हायला पाहिजे तसा तो झाला नाही. म्हणून आंबा प्रक्रिया उद्योगाचे अर्थशास्त्र आणि या उद्योगाच्या समस्या जाणून घेणे असा या अभ्यासाचा हेतू आहे.

या अभ्यासासाठी माहिती गोळा करण्यासाठी या दोन जिल्हयांतील आंबा प्रक्रिया उद्योजकांच्या मुलाखती आणि उद्योगाच्या जमा खर्चावरुन आणि प्रत्यक्ष निरीक्षणाद्वारे प्रक्रिया कालावधीमध्ये असणाऱ्या अडचणी भेटी दरम्यान जाणून घेण्याचा प्रयत्न केलेला आहे. या अभ्यासाचा कालावधी 2004-05 ते 2006-07 असा तीन वर्षाचा निवडण्यात आलेला आहे. आंब्यावर प्रक्रिया करणारे 25 उद्योग रत्नागिरी जिल्हयात आहेत

आणि 4 उद्योग सिंधुदुर्ग जिल्हयात आहेत. असे एकूण 29 उद्योग दक्षिण कोकणामध्ये आहेत. अभ्यासासाठी 20% नमुना निवडण्यात आला. त्यानुसार[6] उद्योजकांकडून माहिती गोळा करण्यात आली.

**सारणी क्र. 1.1**

**दक्षिण कोकणातील विविध फळ पिकांखालील क्षेत्र (हेक्टर्समध्ये) – 2001**

| अ. नं. | फळ पिकाचे नांव | फळ पिकाखालील क्षेत्र | फळ पिकाखालील एकूण क्षेत्राशी प्रमाण % |
|---|---|---|---|
| 1 | आंबा | 76439 | 37.23 |
| 2 | काजू | 109164 | 53.17 |
| 3 | नारळ | 19116 | 9.32 |
| 4 | इतर | 567 | 0.28 |
| | | 205286 | 100.00 |

**स्त्रोत :** जिल्हा कृषी कार्यालय, जिल्हा रत्नागिरी व सिंधुदुर्ग.

वरील आकडेवारीवरुन काजू पिकाखालील क्षेत्र सर्वात अधिक आहे आणि त्यापाठोपाठ दक्षिण कोकणामध्ये आंबा या पिकाखाली 76439 हेक्टर्स एवढे क्षेत्र आहे. एकूण फळ पिकाखालील क्षेत्राशी हे प्रमाण 37.23% एवढे होते.

**1.2 आंबा प्रक्रियेतून तयार होणारी उत्पादने**

आंब्याच्या अनेक नामांकित जातींपैकी हापूस ही एक अग्रणी जात आहे. उष्ण आणि दमट हवामानामध्ये हापूसचे उत्पादन चांगले येते. दक्षिण कोकणामध्ये जवळपास 90% उत्पादन हापूस आंब्याचे घेतले जाते. पर्याप्त आकार, आकर्षक रंग, उत्कृष्ट स्वाद आणि पिकल्यानंतर अधिक काळ टिकून राहण्याच्या वैशिष्टयांमुळे हापूसला विशेष मूल्य आहे. हापूस जसा टेबल व्हरायटी म्हणून योग्य आहे तसा तो प्रक्रियेसाठीही अत्यंत चांगला आहे.

**कच्च्या फळापासून तयार करता येणारी उत्पादने :**

लोणची, चटणी, शीतपेये, जाम, मुरंबा, आमचूर, पन्हे आणि इतर वाळवलेली उत्पादने.

**पिकलेल्या फळापासून तयार करता येणारी उत्पादने :**

पल्प, नेक्टर, स्क्वॅश, जाम, जेली, सरबत, आंबा मावा, आंबा पोळी, आंबा वडी व इतर.

आंबा या फळापासून वरील उत्पादने तयार केली जात असली तरी प्रामुख्याने मॅन्गो पल्प हे उत्पादन प्रक्रिया उद्योगांकडून तयार केले जाते.

## 1.3 आंबा प्रक्रिया उद्योगातील भांडवल गुंतवणूक :

### सारणी क्र.1.2

### आंबा प्रक्रिया उद्योगातील कारखानानिहाय भांडवल गुंतवणूक (पल्प तयार करणाऱ्या)

(रूपये)

| अ. नं. | खर्चाचा घटक | नमुना आंबा प्रक्रिया कारखान्यांची संख्या I | II | III | IV | V | VI | सरासरी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1. स्थिर भांडवल | | | | | | | | |
| I | यंत्रसामुग्री व अवजारे | 300000.00 (11.36) | 200000.00 (15.32) | 400000.00 (3.71) | 200000.00 (9.52) | 300000.00 (12.79) | 50000.00 (17.69) | 241666.66 (7.45) |
| II | जमीन | 100000 (3.78) | 50000 (3.83) | 100000 (0.93) | 100000 (4.75) | 50000 (2.13) | 10000 (3.54) | 68333.33 (2.12) |
| III | इमारत | 480000 (18.18) | 500000 (38.32) | 480000 (4.46) | 500000 (23.76) | 550000 (23.45) | 110000 (38.93) | 436666.66 (13.46) |
| IV | फर्निचर व कार्यालय संरचना | 125000 (4.73) | 10000 (0.77) | 20000 (0.18) | 5000 (0.24) | 60.000 (2.56) | 8000 (2.83) | 38000 (1.17) |
| V | वाहने | - | - | - | - | - | - | - |
| VI | इतर | 50000 (1.89) | 50000 (1.89) | - | - | - | - | 16666.66 (0.15) |
| | एकूण | 1055000 (39.93) | 810000 (62.07) | 1000000 (9.28) | 805000 (38.27) | 960000 (40.93) | 178000 (62.99) | 801333.33 (24.71) |

| अ. नं. | खर्चाचा घटक | नमुना आंबा प्रक्रिया कारखान्यांची संख्या I | II | III | IV | V | VI | सरासरी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 2. खेळते भांडवल | | | | | | | | |
| I | कच्चा माल | 1012055.33 (38.34) | 327908.33 (25.13) | 55778000.00 (51.74) | 941724.99 (44.77) | 901800.00 (38.44) | 64345.00 (22.77) | 1471105.60 (45.35) |
| II | कच्चा माल संकलन | 34250.00 (1.30) | - - | | - - | 26666.66 (1.14) | - - | 10152.77 |
| III | मजूरी | 83475.00 (3.16) | 37050.00 (2.85) | 240000.00 (2.22) | 39600.00 (1.68) | 48825.00 (2.08) | 4899.75 (1.73) | 75641.63 (2.33) |
| IV | इंधन | 53496.00 (2.02) | 18733.33 (1.43) | 45000.00 (0.42) | 41705.00 (1.98) | 47500.00 (2.02) | 7366.66 (2.61) | 35633.49 (1.10) |
| V | डबे व लेबल | 397924.99 (15.06) | 111.40.44 (8.51) | 3798252.00 (35.23) | 254175.77 (12.08) | 345611.11 (14.73) | 27396.37 (9.69) | 822400.11 (25.36) |

सारणी.... (पुढे चालू)

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| VI | इतर | 4700.00 (0.18) | 250.00 (0.01) | 120160.00 (1.11) | 21500.00 (1.02) | 15250.00 (0.68) | 600.00 (0.21) | 27076.66 (0.83) |
| | एकूण | 1586901.32 (60.07) | 494982.1 (37.93) | 9781212.00 (90.72) | 1298705.76 (61.73) | 1385652.77 (59.07) | 104607.81 (37.01) | 2442010.26 (75.29) |
| | 3:1 + 2 ची बेरीज | 2641901.32 (100) | 1304982.1 (100) | 10781212.00 (100) | 2103705.76 (100) | 2345652.77 (100) | 282607.81 (100) | 3243343.57 (100) |

**तळटीप :** कंसातील आकडे एकूण बेरजेशी टक्केवारी दाखवितात.

**स्त्रोत** : उद्योजकांकडून गोळा केलेल्या प्राथमिक माहितीच्या आधारावर.

विशेषीकृत आंबा प्रक्रिया कारखाने पल्पचे उत्पादन करतात. या उद्योगांसाठी स्थिर भांडवलाची गरज यंत्रसामग्री, अवजारे, जमीन, इमारत, फर्निचर, कार्यालय संरचना आणि वाहन यासाठी असते. तर खेळत्या भांडवलाची गरज कच्चा माल, तो गोळा करण्यासाठी येणारा खर्च, मजूरी, इंधन, डबे, लेबल्स यासाठी असतो. नमुना म्हणून निवडलेल्या कारखान्यांतील सरासरी भांडवल गुंतवणूक याप्रमाणे, सारणी क्र. 1.2 मधील आकडेवारीनुसार प्रत्येक कारखान्यामध्ये सरासरी भांडवली गुंतवणूक रु. 32,43,343.57 इतकी झालेली आहे. पैकी रु. 8,01,333.31 (24.71%) इतकी स्थिर भांडवली गुंतवणूक आणि रु.24,42,010.26 (75.29%) इतकी खेळत्या भांडवलातील गुंतवणूक आहे. एकूण भांडवल गुंतवणूकीमध्ये कच्च्या मालाचा वाटा 25.36 % सर्वात अधिक आहे. डबे आणि लेबल यांचा 25.36% एवढा वाटा आहे. इमारतीचा वाटा 3.46 एवढा आहे. तर एकूण भांडवली गुंतवणूकीत यंत्रसामुग्री आणि अवजारांचा वाटा 7.45% एवढा आहे. श्रमावरील खर्चाचा वाटा 2.33% एवढा आहे. तर किरकोळ खर्चाचा वाटा 1.5% एवढा आहे. यावरुन असे दिसून येते की, पल्प तयार करणाऱ्या उद्योगात स्थिर भांडवलाचा वाटा १/४ इतका आहे. एकूण गुंतवणूकीमध्ये सर्वात अधिक गुंतवणूक कच्च्या मालामध्ये आणि त्यापाठोपाठ डबे आणि लेबल यामध्ये करावी लागत आहे.

## 1.4 कारखाना पातळीवर आंबा प्रक्रिया उत्पादन खर्च आणि उत्पन्न :

### सारणी क्र. 1.3

### कारखाना पातळीवर आंबा प्रक्रिया उत्पादन खर्च आणि उत्पन्न

**(पल्प तयार करणाऱ्या)** (रूपये)

| अ. नं. | तपशील | नमुना आंबा प्रक्रिया कारखान्यांची संख्या | | | | | | सरासरी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | I | II | III | IV | V | VI | |
| 1. | कच्चा माल | | | | | | | |
| | a. आंबा फळे | 965833.33 (47.24) | 313333.33 (43.71) | 5360000.00 (46.52) | 900666.66 (55.00) | 860000.00 (48.24) | 61320.00 (38.80) | 1410192.22 (47.37) |
| | b. साखर | 47222.00 (2.32) | 14575.00 (2.03) | 217800.00 (1.89) | 41058.33 (2.51) | 41800.00 (2.34) | 3025.00 (1.96) | 60913.38 (2.05) |
| | c. प्रिझर्व्हेटीव्हज | - | - | - | - | - | - | - |
| | d. डबे व लेबल | 397924.99 (19.45) | 111040.44 (15.48) | 3798252.00 (32.96) | 254175.77 (15.53) | 345611.00 (19.39) | 27396.37 (17.39) | 822400.11 (27.64) |
| | e. इंधन | 53496.00 (2.61) | 18733.33 (2.61) | 45000.00 (0.39) | 41705.00 (2.54) | 47500.00 (2.66) | 7366.66 (4.78) | 35633.49 (1.19) |
| | f. कच्चा माल संकलन खर्च | 34250.00 (1.67) | - | - | - | 26666.66 (1.50) | - | 10152.77 (0.34) |
| 2. | मजूरी खर्च | 83475.00 (4.08) | 37050.00 (5.18) | 240000.00 (2.08) | 39600.00 (2.43) | 48825.00 (2.75) | 4899.78 (3.18) | 75641.63 (2.55) |
| 3. | घसारा<br>a. इमारत | 10600.00 (0.52) | 11000.00 (1.53) | 9600.00 (0.08) | 10000.00 (0.61) | 11000.00 (0.62) | 2200.00 (1.43) | 9066.66 (0.30) |
| | b. यंत्रसामग्री व अवजारे | 10600.00 (2.07) | 11000.00 (2.93) | 9600.00 (0.36) | 10000.00 (1.25) | 11000.00 (2.01) | 2200.00 (3.76) | 9066.66 (0.94) |
| 4. | व्याज | | | | | | | |
| | a. खेळते भांडवल @16% | 253904.6 9 (12.41) | 79097.13 (11.04) | 1564993.92 (13.58) | 207792.92 (12.68) | 221704.44 (12.43) | 19217.28 (12.47) | 391135.06 (13.14) |
| | b. स्थिर भांडवल @12.5% | 131875.0 0 (6.45) | 101250.00 (14.13) | 125000.00 (1.09) | 100625.00 (6.14) | 120000.00 (6.73) | 22250.00 (14.44) | 100166.66 (3.36) |
| 5. | इतर खर्च भांडवल | 4700.00 (0.22) | 250.00 (0.03) | 120160.00 (1.04) | 21500.00 (1.31) | 15250.00 (0.85) | 600.00 (0.39) | 27076.66 (0.91) |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 6. | वाया गेलेल्या मालाचे मूल्य | 19625.00 (0.96) | 9552.93 (1.33) | 1444.78 (0.01) | - - | 8524.16 (0.48) | - - | 6524.47 (0.21) |
| | एकूण खर्च | 2045406.00 (100) | 716982.16 (100) | 11524250.70 (100) | 1637623.68 (100) | 1782881.32 (100) | 154075.09 (100) | 2976869.77 (100) |
| 7. | स्थूल मूल्य | | | | | | | |
| | a. मुख्य उत्पादन | 2831499.7 | 955293.06 | 14447816.30 | 2630113.20 | 2399849.20 | 179999.40 | 390748.47 |
| | b.उप उत्पादन | - | 2000.00 | - | - | 25000.00 | 5000.00 | 5333.33 |
| | एकूण उत्पन्न | 2831499.70 | 957239.06 | 14447816.30 | 2630113.20 | 2424849.20 | 184999.40 | 3912761.80 |
| 8. | निव्वळ उत्पन्न | 786093.69 | 240310.90 | 2923566.84 | 992489.52 | 641967.83 | 30924.31 | 935892.03 |

**तळटीप :** कंसातील आकडे एकूण बेरजेशी टक्केवारी दाखवितात.

**स्त्रोत :** सारणी क्र. 1.2 नुसार

उत्पादन खर्च उत्पन्न रचना यामध्ये एकवाक्यता राहवी यासाठी कारखाना पातळीवरील उत्पादन खर्च आणि उत्पन्न विचारात घेण्यात आले आहे. वरील सारणीमध्ये सहा उद्योगांच्या उत्पादन खर्चाची सरासरी आणि उत्पन्नाची सरासरी खर्च रु. 29,76,869.77 एवढा आलेला आहे. एकूण खर्चामध्ये आंबा फळांवर 47.37%, लेबलसह डब्यांवर 27.64% एवढा खर्च होतो. यावरुन सर्व पातळयांवरील कच्च्या मालावर 78.59% एवढा खर्च होतो. भांडवलावरील व्याजाचा एकूण खर्चातील हिस्सा 16.50% एवढा आहे. तर मजुरीवर फक्त 2.55% एवढा खर्च होतो. पल्प आणि उप उत्पादन विक्रीतून प्रत्येक कारखान्याला सरासरी रु. 39,12,761.80 प्राप्त झाले. या उत्पन्नातून उत्पादन खर्च वजा करता, प्रत्येक कारखान्याला सरासरी रु.9,35,892.03 निव्वळ उत्पन्न प्राप्त झाले.

### 1.5 आंबा प्रक्रिया उद्योगामध्ये प्रति क्विंटल उत्पादन खर्च आणि उत्पन्न

**सारणी क्र. 1.4**

**आंबा प्रक्रिया उद्योगामध्ये प्रति क्विंटल उत्पादन खर्च आणि उत्पन्न**

(पल्प तयार करणाऱ्या) **(रूपये)**

| अ. नं. | तपशील | नमुना आंबा प्रक्रिया कारखान्यांची संख्या | | | | | | सरासरी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | I | II | III | IV | V | VI | |
| 1. | **कच्चा माल** | | | | | | | |
| | 1. आंबा फळे | 3149.62 | 3357.26 | 3828.57 | 3408.83 | 3046.02 | 3406.66 | 3366.16 |
| | 2. साखर | 153.99 | 156.16 | 155.57 | 155.39 | 148.05 | 168.05 | 156.20 |
| | 3. प्रिझर्व्हेटीव्हज | - | - | - | - | - | - | - |
| | 4. डबे व लेबल | 1297.65 | 1189.76 | 2713.03 | 962.00 | 1224.00 | 1522.02 | 1484.76 |
| | 5. इंधन | 174.45 | 200.72 | 32.14 | 157.84 | 168.23 | 49.25 | 190.43 |
| | 6. कच्चा माल संकलन खर्च | 111.69 | - | - | - | 94.45 | - | 34.35 |
| 2. | मजूरी खर्च | 272.21 | 396.97 | 171.42 | 149.87 | 172.93 | 272.21 | 239.26 |
| 3. | घसारा | | | | | | | |
| | a. इमारत | 34.56 | 117.86 | 6.85 | 37.84 | 38.96 | 122.22 | 59.71 |
| | b. यंत्रसामग्री व अवजारे | 138.59 | 225.00 | 30.00 | 77.58 | 127.50 | 322.22 | 153.48 |
| 4. | व्याज | | | | | | | |
| | a. खेळते भांडवल @16% | 827.99 | 848.57 | 117.85 | 786.45 | 785.25 | 1067.62 | 905.62 |
| | b. स्थिर भांडवल @12.5% | 430.05 | 1084.62 | 89.28 | 380.84 | 425.02 | 1236.11 | 607.76 |
| 5. | इतर खर्च | 15.32 | 2.67 | 85.82 | 81.37 | 54.01 | 33.33 | 45.42 |
| 6. | वाया गेलेल्या मालाचे मूल्य | 64.08 | 102.35 | 1.03 | - | 30.19 | - | 32.94 |
| | **एकूण खर्च** | 6670.20 | 7682.14 | 8231.56 | 6198.01 | 6314.72 | 8559.03 | 7276.09 |
| 7. | स्थूल उत्पन्न | | | | | | | |
| | a. मुख्य उत्पादन | 9233.42 | 10235.28 | 10319.86 | 9954.44 | 8500.00 | 9999.4 | 9707.06 |
| | b. उप उत्पादन | - | 21.42 | - | - | 88.54 | 277.77 | 64.62 |
| | **एकूण उत्पन्न** | 9233.42 | 10256.7 | 10319.86 | 9954.44 | 8588.54 | 10277.17 | 9771.68 |
| 8. | **निव्वळ उत्पन्न** | 2563.22 | 2574.56 | 2088.30 | 3756.43 | 2273.82 | 1718.14 | 2495.59 |
| 9. | **प्रक्रिया खर्च** (प्रती किलो) | 66.70 | 76.82 | 82.31 | 61.98 | 63.14 | 85.59 | 72.76 |

**स्त्रोत : सारणी क्र. 1.2 नुसार**

वरील सारणीवरुन एक क्विंटल आंबा पल्प तयार करण्यासाठी रु.7,276.09 एवढा खर्च येतो. यापैकी आंबा फळ या प्रमुख कच्च्या मालावर रु. 3,666.16 खर्च होतात. त्यापाठोपाठ रु. 1,484.76 एवढा खर्च डबे आणि लेबलवर होतो. इंधन आणि साखर यावर अनुक्रमे रु. 156.20 आणि रु.190.43 एवढा खर्च होतो. याचा अर्थ एकूण खर्चामध्ये सर्व प्रकारच्या कच्च्या मालाचा वाटा रु.5,231.90 एवढा आहे. तर कच्च्या माला शिवाय येणाऱ्या खर्चाचा वाटा रु. 2,044.19 इतका आहे. 1 क्विंटल आंबा पल्पपासून रु.9771.68 कारखाना पातळीवर प्राप्त होतात. उत्पन्नातून उत्पादन खर्च वजा जाता प्रति क्विंटल मॅन्गो पल्प पाठीमागे रु.2,495.59 एवढा नफा होतो.

**1.6 आंबा प्रक्रिया कारखान्यांचे उत्पादन परीमाण आणि त्यातून प्राप्त झालेले मूल्य :**

सारणी क्र. 1.5

आंबा प्रक्रिया उद्योगातील कारखानानिहाय उत्पादन परीमाण आणि प्राप्त मूल्य (पल्प तयार करणाऱ्या)

| अ. नं. | तपशील | नमुना आंबा प्रक्रिया कारखान्यांची संख्या | | | | | | सरासरी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | I | II | III | IV | V | VI | |
| 1. | प्रक्रिया डबे नग संख्या | | | | | | | |
| | I.3.1.किलो क्षमता | 2500.00 | - | 6451.61 | 2071.45 | - | - | 1837.17 |
| | II.850. ग्रॅम क्षमता | 26958.82 | 9333.33 | 141176.47 | 23529.41 | 23529.41 | 2117.64 | 38558.19 |
| 2. | विक्री किंमत /प्रती डबा रु. | | | | | | | |
| | I.3.1. किलो क्षमता | 216 | - | 270 | 253.33 | - | - | 246.44 |
| | II.850. ग्रॅम क्षमता | 85 | 87 | 90 | 88.50 | 85 | 85 | 86.75 |
| 3. | प्राप्त झालेले एकूण मूल्य रु. | | | | | | | |
| | a.मुख्य उत्पादन | 2813499.7 | 955293.06 | 14447816.3 | 2630113.20 | 2399849.2 | 179999.4 | 3907428.47 |
| | b.उप उत्पादन | - | 2000.00 | - | - | 25000 | 5000 | 5333.33 |
| | **एकूण** | 2831499.7 | 957293.06 | 14447816.3 | 2630113.20 | 2424849.2 | 184999.4 | 3912761.8 |

स्त्रोत : सारणी क्र 1.2 नुसार

आंबा प्रक्रिया उद्योगातील कारखानानिहाय उत्पादन परिमाण डब्याच्या स्वरुपात मोजले जाते. यातून घाऊक डब्याचे वजन 3.1 किलो आणि किरकोळ डब्याचे वजन 850 ग्रॅम असते. प्रत्येक कारखान्याने सरासरी घाऊक डब्यांचे ( 3.1 किलो) उत्पादन 1837.13 नग आणि किरकोळ डब्यांचे उत्पादनांचे (850 ग्रॅम)38558.19 नग एवढे केलेले आहे. कारखाना पातळीवर घाऊक डब्याला रु.246.44 तर किरकोळ डब्याला रु.86.75 असा दर मिळाला आहे. अशा प्रकारे मुख्य उत्पादनाचे मूल्य रु.39,07,428.97 आणि उप उत्पादनाचे मूल्य (बाटा विक्री) रु.5,333.33 असे एकूण रु. 39,12,761.80 एवढे मूल्य प्राप्त झाले.

आंबा प्रक्रिया उद्योगामध्ये भांडवली उलाढालीचा दर 120.63% आहे. आणि भांडवली गुंतवणूकीवर निव्वळ उत्पन्न 41.78% प्राप्त होते. आणि वित्तीय स्वरुपात आदान प्रदान दर 1:1.31 असे दिसून आले. यावरुन आंबा प्रक्रिया उद्योगातील गुंतवणूक फायदेशीर आहे असे दिसून येते.

आंबा प्रक्रिया उद्योगातील समस्यांचा आढावा घेता असे दिसून येते की, आंबा प्रक्रिया हे हंगामी उत्पादन आहे. तसा त्याचा उपयोगही हंगामी आहे. त्यामुळे एप्रिल – मे मध्ये प्रक्रिया केलेला माल ऑक्टोबर महिन्यामध्ये आणि पुढच्या वर्षीच्या एप्रिल – मे महिन्यामध्ये शीतपेयांसाठी कोल्ड्रींक्स हाऊसकडून मागविला जातो. त्यामुळे हंगामानंतर यंत्रसामग्री पडून राहते. तर दुसऱ्या बाजूला माल तयार करण्यासाठी केलेली गुंतवणूक वर्षभर अडकून राहते. त्यामुळे भांडवलावरील व्याज उद्योजकाला सहन करावे लागते. याचबरोबर कच्च्या मालाची उपलब्धता ही पूर्णपणे हवामानावर अवलंबून असते. मार्च महिन्यामध्ये आंब्याचे दर एवढे अधिक असतात की, या दराने उद्योजक प्रक्रियेसाठी आंबा खरेदी करु शकत नाही. तसेच माल कच्च्या स्वरुपात खरेदी करावा लागतो. प्रक्रियेसाठी माल तयार होईपर्यंत त्यातील 20% माल पिकण्याच्या प्रक्रियेमध्ये खराब होतो. त्याचप्रमाणे कच्च्या मालाच्या गुणवत्तेतील विविधता आणि विखुरलेल्या स्वरुपात उपलब्धता या समस्या आहेत. सर्वेक्षणादरम्यान असेही दिसून आले आहे की, 80% उद्योजकांनी आपला स्वत:चा कच्चा माल सुरक्षित करण्यासाठी प्रक्रिया कारखाने सुरु केले आहेत. या समस्यांबरोबरच कामगारांची गैरहजेरी आणि श्रम आवर्त या समस्यांनाही सामोरे जावे लागते. या उद्योगाची खरी समस्या अशी आहे की, एकूण खर्चामध्ये डब्यावरील खर्चाचा (Container) खर्चाचा वाटा 27.64% एवढा आहे. हा खर्च कमी करणे उद्योजकांना शक्य झालेले नाही. त्याचे कारण डबे तयार करण्यासाठीचा कच्चा माल परदेशातून आयात करावा लागतो. कमी दर्जाचे डबे वापरले तर गळती आणि फर्मेंटेशन या समस्या जाणवतात आणि म्हणून उच्च दर्जाचे डबे वापरावे लागतात.

प्रक्रिया उद्योगांच्यामध्ये हंगामामध्ये आंबा प्रक्रिया उद्योगाला स्वत:च्या कच्च्या मालाबरोबर स्पर्धा करावी लागते. त्याचप्रमाणे आंबा पल्प प्रामुख्याने शीतपेये विकणाऱ्या कोल्ड्रींक्स हाऊसेसकडून व दूध प्रक्रिया कारखान्यांकडून खरेदी केला जातो. घरगुती उपयोगासाठी वैयक्तिक उपभोक्त्याकडून मॅन्गो पल्पला मागणी नसते. आंबा प्रक्रिया उद्योजकांना निर्यात निकष आणि प्रक्रिया माहिती नसल्यामुळे या दोन्ही जिल्हयांतून आंबा पल्पची निर्यात होत नाही. पल्प तयार करण्यासाठी फक्त हापूस आंबाच कच्चा माल म्हणून वापरता

येतो ही या उद्योगाची मर्यादा आहे. त्याचप्रमाणे उच्चप्रतीचा आंबा मुंबई, पुणे यासारख्या मोठ्या शहरांतील बाजारात पाठविला जातो आणि लहान आकाराचा आंबा प्रक्रियेसाठी वापरला जातो. जर सिंधुदुर्ग आणि रत्नागिरी या दोन जिल्हयांमध्ये किनारपट्टीच्या तालुक्यांच्या ठिकाणी कृषी उत्पन्न बाजार समितीची बाजार आवारे आणि खुल्या लिलावाने विक्री झाल्यास प्रक्रिया उद्योजकांची कच्च्या मालाची समस्या सुटू शकेल. पल्प भरण्यासाठीचे डबे परदेशातून आयात करावे लागतात. यासाठी पर्यायी पॅकींग मटेरीयल संशोधित करणे आवश्यक आहे. तसे झाले तर उपभोक्त्यांच्या क्रयशक्तीनुसार लहान मोठे पॅकींग करता येईल. प्रक्रिया उद्योजक आपला माल मुंबईच्या कृषी उत्पन्न बाजार समितीच्या बाजार आवारात आडत्यामार्फत विकतात. त्यामुळे अडत आणि कृषी उत्पन्न बाजार समितीचे आकार उद्योजकांना सहन करावे लागतात. यासाठी उद्योजकाने आपल्या मालाची किरकोळ विक्री स्वत: करणे आवश्यक आहे. अशा प्रकारचा प्रयत्न द्वारका फूडस, देवगड, आणि देसाई कॅनिंग पावस (रत्नागिरी) या दोन उद्योजकांनी केला आहे. द्वारका फूडस्चे किरकोळ विक्री दुकान मुंबई या ठिकाणी आहे; तर देसाई कॅनिंगचे किरकोळ विक्री दुकान पुणे या ठिकाणी आहे. याशिवाय गणेशोत्सव, दिवाळी; नाताळ, ईद यासारख्या महत्वाचा सणांच्या काळात प्रक्रिया उद्योजकाने सरकारी कार्यालये, बँका, शाळा महाविद्यालये यामध्ये किरकोळ विक्री केल्यास मुंबईसारख्या दूरच्या बाजारपेठेपर्यंतचा वाहतूक खर्च, जकात, अडत, माल हाताळणी खर्च, कृषि उत्पन्न बाजार समितीचे आकार यावर होणारा खर्च वाचू शकतो आणि त्याचा फायदा प्रक्रिया उद्योजकांना होऊ शकतो.

**संदर्भसूची :**


**A-BOOKS**

1. **Girdhari Lal, Siddappa G. S. & Tondon G.L. (1986) :**
   Preservation of Fruits and Vegetables. ICAR Publication, New Delhi - 110012.

2. **Jule - Janik - Purdue University, USA**
   Horticultural Science
   Surjeet Publication, 7 - K, Kolhapur Road, Kamalnagar, Delhi - 11007

3. **Ministry of Food Processing - Gov ernment of India (1994) :**
   Food Processing Industries in India - Global Business Press, G. T. Road, 18-19, Dilshad Garden, Delhi - 110095

4. **Thakur Shrinivas Y. (1985) :**
   Rural Industrialisation in India - Strategy & Approach. Sterling Publication Pvt. Ltd. New Delhi - 110016. 1985.

5. **Vishwanathan N., Amla B. L. (1985):**
   Guide for Entrepreneur on Agro - based & Food Industries in Karnataka,CFTRI & TEESOCK.

**B-JOURNALS**

1. **Chadha Rajani (Nov-Dec 1995) :**
   Indian Food Packer - Nov. Dec. Journal of All India Food Preservers Association (Bimonthly) B-168, East of Kailash, New Delhi.

2.**Directorate of Agriculture,July Sept. 1990,**
Government of Maharashtra Shetakari (Marathi) - Vol. 26 (5).

3.**Mishra S. N. (April-June 1999) :**
Journal of Rural Development, April June Vol. 18, No. 2, National Institute of Rural Development, Hyderabad.

4.**Sinha Sanjay, Sinha Sourabh (1992)**
Economic & Political Weekly,June 27


# मराठी अर्थशास्त्र परिषद

## डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ ग्रंथ पारितोषिक

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या वतीने मराठी भाषेत प्रसिध्द झालेल्या सर्वोत्कृष्ट अर्थशास्त्रीय ग्रंथास रू.1000/- चे डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ ग्रंथ पारितोषिक प्रतिवर्षी देण्यात येते. 1 जानेवारी 2008 ते 31 डिसेंबर 2008 या कालावधीत प्रसिध्द झालेल्या मराठीतील अर्थशास्त्रीय ग्रंथाच्या लेखकांना यंदाच्या स्पर्धेत सहभागी होता येईल. स्पर्धेचे नियम व अटी इत्यादींसाठी अनिल सूर्यवंशी, कार्यवाह – खजिनदार, मराठी अर्थशास्त्र परिषद, 'गोदाई' शिवशक्ती मैदानाजवळ, शिवाजीनगर, बार्शी, जि.सोलापूर 413 441 यांच्याशी संपर्क साधावा. विहित नमुन्यातील अर्ज, संबंधित ग्रंथाच्या 4 प्रतीसह कार्यवाहांकडे 15 ऑक्टोबर 2009 पर्यंत मिळावेत.

**कार्यवाह खजिनदार**

# नांदणी भाजीपाला व फळफळावळ उत्पादक सहकारी संघ मर्यादित, नांदणी

(ता.शिरोळ, जि.कोल्हापूर) या संस्थेचा एक अभ्यास

**श्री. मोराळे मन्मथ भगवानराव**
एन्.डी. पाटील नाईट कॉलेज,
सांगली.

### 1) प्रस्तावना :-

सहकारी चळवळीमध्ये अग्रेसर असणाऱ्या महाराष्ट्र राज्यातील कोल्हापूर जिल्ह्यातील शिरोळ तालुक्यातील नांदणी गावामध्ये या संस्थेची स्थापना झाली. तालुक्यातील कृष्णा व पंचगंगा या व त्यांच्या उपनद्यावरील पाटबंधारे प्रकल्पामुळे संस्थेच्या कार्यक्षेत्रात बारमाही मुबलक पाण्याची उपलब्धता झाली. कार्यक्षेत्रातील सुपीक जमीन व बारमाही मुबलक पाण्यामुळे परिसरातील शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणावर लिफ्ट इरिगेशन स्किम केल्या. अशा रीतीने उत्तम नैसर्गिक सुविधांची उपलब्धता झाल्याने या परिसरातील बागायती क्षेत्रामध्ये फार मोठ्या प्रमाणात वाढ झाली. त्या बरोबरच या परिसरातील शेतकरी फळे / भाजीपाला अशा नगदी पीक लागवडीकडे वळला. परिणामी या क्षेत्रात प्रचंड प्रमाणात भाजीपाला पिकांचे उत्पादन घेणेत येऊ लागले. पूर्वी स्थानिक बाजारपेठांमध्ये पाठविणेत येणाऱ्या भाजीपाला पिकांच्या प्रमाणात वरीलप्रमाणे प्रचंड वाढ झाल्याने स्थानिक बाजारपेठांमध्ये अतिरिक्त मालाची विक्री होईनाशी झाली व बाजारभाव ही कमी प्रमाणात मिळू लागले. त्यामुळे पाच-सहा, पाच-सहा शेतकऱ्यांच्या समूहाद्वारे उत्पादित भाजीपाला पुणे येथील बाजारपेठामध्ये विक्रीस जाऊ लागला. परंतु या पध्दतीमध्ये आवश्यक पॅकिंग मटेरिलयचा पुरवठा, वाहतूक यांचे नियोजन करणे फारच अडचणीचे होऊ लागले. पुणे येथील बाजारपेठेमध्ये सुध्दा या परिसरातून मोठ्या प्रमाणावर मालाची आवक होऊ लागल्याने अतिरिक्त मालाची विक्री होईनाशी झाली व बाजार भाव ही कमी प्रमाणात मिळू लागले. त्यामुळे त्याच धर्तीवर पाच-सहा, पाच-सहा शेतकऱ्यांच्या समूहाद्वारे उत्पादित भाजीपाला मुंबई येथील बाजारपेठामध्ये विक्रीस जाऊ लागला. या पध्दतीने शेतकरी समूहाना माल काढण्याचे नियोजन, उत्पादित मालाच्या पॅकिंग करिता आवश्यक

त्या पॅकिंग मटेरियलच्या पुरवठ्याचे नियोजन, वाहतुकीकरिता गाड्यांचे नियोजन अशी कामे आणि त्याबरोबरच माल गाड्यासोबत समक्ष उपस्थित राहून आडतदारामार्फत विक्री करुन विक्री पश्चात पेमेंट रोखीने घेऊन यावे लागत असे. या सर्व बाबी जोखमीच्या होत्या. भाजीपाल्यासारख्या नाशवंत मालाची हाताळणी करावी लागत असल्याने या सर्व कामकाजाकरिता या संस्थेची स्थापना केली.

## 2) गृहितक :-

फळे व भाजीपाला या सारख्या नाशवंत शेतमालाचा व्यापार या सहकारी संघामार्फत केला जातो.त्यामुळे शिरोळ व हातकणंगले तालुका कार्यक्षेत्रातील शेतकऱ्यांना चांगला दर मिळतो. मध्यस्थांचे उच्चाटन होऊन पैसे वेळेत मिळतात, इत्यादी फायदे मिळतात.

## 3) अभ्यासाची उद्दिष्टे :-

या शोधनिबंधाच्या अभ्यासाची प्रमुख उद्दिष्टे पुढील प्रमाणे -

1) फळे व भाजीपाला या शेतमालाचे विपणन करणाऱ्या सहकारी संघाच्या स्थापनेचा अभ्यास करणे.
2) सहकारी संघाच्या विविध विभागाचा अभ्यास करणे.
3) या सहकारी संघाच्या प्रगतीचा आढावा घेणे.
4) या संघाला मिळणाऱ्या मदतीचा व अनुदानाचा अभ्यास करणे.

## 4) अभ्यास पध्दती :-

प्रस्तुत शोधनिबंध हा पूर्णपणे दुय्यम साधनसामग्रीवर आधारित आहे. या दुय्यम साधनसामुग्रीत संघाचे प्रत्येक वर्षाचे वार्षिक अहवाल, दशकपूर्ती अहवाल व कार्यालयातील तत्सम कागदपत्रांचा दुय्यम साधनसामुग्री म्हणून आधार घेणेत आलेला आहे. या अभ्यासासाठी सन 2003-2004 ते 2007-2008 अशी पाच वर्षे घेतली आहेत.

## 5)संस्थेची नोंदणी व संघटनात्मक रचना :-

दिनांक 3-11-1986 रोजी नांदणी येथील प्रमुख भाजीपाला उत्पादक शेतकऱ्यांनी नांदणी भाजीपाला उत्पादक संघ नांदणी या संस्थेची स्थापना केली. परंतु राज्य शासनाने फळे भाजीपाला उत्पादक, खरेदी-विक्री, प्रक्रिया संस्था नोंदणी संदर्भातील मार्गदर्शक तत्वे निश्चित केल्यानंतर दिनांक 17-8-1990 रोजी ''नांदणी भाजीपाला व फळफळावळ उत्पादक सहकारी संघ मर्यादित, नांदणी'' या संस्थेची नोंदणी करणेत आली. नोंदणी वेळी फक्त 100 शेतकरी सभासद होते. त्यात वाढ होऊन सन 2006-2007 मध्ये सभासद शेतकऱ्यांची संख्या 1892 पर्यंत वाढली.

लोकशाही पध्दतीने सभासदांमधून तेरा सदस्यांचे संचालक मंडळ निवडले जाते. संचालकांमधून चेअरमन व व्हाईस चेअरमनची निवड होते. मुख्य व्यवस्थापकाच्या नियंत्रणाखाली दैनंदिन कार्य सेवक वर्गामार्फत केले जाते.

## 6) संस्थेचे विविध विभाग :-

संघामार्फत परिसरातील फळे भाजीपाला उत्पादक शेतकऱ्यांना जरुर त्या सोयी सुविधा पुरविण्याचे नियोजन सुयोग्य रीतीने होणेकरिता पुढीलप्रमाणे विविध विभागांची रचना करून प्रभावी यंत्रणा निर्माण केली आहे.

### 6.1 बी–बियाणे,कीटकनाशके व खत विभाग–

या विभागामार्फत कार्यक्षेत्रातील फळे भाजीपाला उत्पादक शेतकऱ्यांना लागवडी विषयक आधुनिक तंत्रज्ञान, सुधारित जाती, कीड / कीटकनाशके, सुक्ष्म, जैविक खते / औषधे याबाबतची माहिती, वापराच्या पध्दती यांचे मार्गदर्शन केले जाते. वेळो–वेळी विविध क्षेत्रातील तज्ञांचे मार्गदर्शन उपलब्ध करुन देणेकरिता चर्चासत्रे व कार्यशाळा यांचे आयोजन केले जाते.

सुधारित जातीच्या बी–बियाणे, कीटकनाशके, संवर्धके, रासायनिक व सेंद्रिय खते आणि जरुर त्या प्रकारचे पॅकिंग मटेरियल यांचा किफायतशीर दराने पुरवठा केला जातो. सदर मालाची रोखीने तसेच क्रेडीटने विक्री केली जाते. क्रेडीटने दिलेल्या मालाची रक्कम संबंधित शेतकऱ्याच्या उत्पादित माल संघामार्फत विक्री झाल्यानंतर येणाऱ्या पेमेंटमधून कपात करुन घेणेत येते.

### 6.2 ट्रान्स्पोर्ट विभाग –

सदर विभागाकडे संगणक, फॅक्स, इंटरनेट सेवा उपलब्ध आहे. सदर सेवेमार्फत देशांतर्गत बाजारपेठांमधील भाजीपाल्याच्या बाजारभावांची व आवक या बाबतची दैनंदिन माहिती घेतली जाते. देशातील कोलकत्ता, दिल्ली, मुंबई, बडोदा, अहमदाबाद, राजमंडी, नागपूर, रायपूर, पुणे अशा बाजारपेठांमध्ये भाजीपाला पाठविला जातो. संबंधित शेतकरी माल काढणीच्या अगोदरच्या दिवशी अथवा काढणीच्या दिवशी सकाळी 8 वाजेपर्यंत मालाची नोंद करतात. त्यानुसार वाहतुकीकरिता गाड्यांचे व संकलनाचे मार्ग यांचे निश्चितीकरण केले जाते. प्रत्येक गाडीत गाडी भरणेकरीता हमाल देऊन गाड्या संकलन मार्गावर पाठविल्या जातात. संस्थेकडे करारबध्द असणाऱ्या कोणत्याही आडतदाराकडे माल पाठविणेचे उत्पादक शेतकऱ्यांना निवडीचे स्वातंत्र्य आहे.

प्रत्यक्ष काढणी झालेल्या मालाचे संकलन पूर्ण होऊन गाडी विभागाकडे आलेल्या एकंदर गाडीतील मालाचा व आडतदार निहाय मेमो केले जातात. मेमोवर नमूद केलेल्या वेळेत गाडी संबंधित मार्केटमध्ये पोहोचली तरच त्याचे भाडे अदा करणेत येते.

विक्री झालेल्या मालाचे बाजारभाव व वजन याबाबतचे माहितीचे फॅक्स ज्या–त्या आडतदाराकडून सायंकाळी ७ वाजेपर्यंत प्राप्त होतात. त्यावरुन शेतकरी माल पाठविण्याबाबतचे पुढील धोरण ठरवितात.

### 6.3 पट्टी–पेमेंट विभाग –

संस्थेमार्फत ज्या–ज्या बाजारपेठेमध्ये भाजीपाला पाठविला जातो. त्या बाजारपेठांमधील आडतदारांचे सर्वेक्षण या विभागामार्फत केले जाते. जास्तीत–जास्त शेतमाल ज्या बाजारपेठेमध्ये जात असतो; अशा बाजारपेठातील प्रमुख आडतदारांशी करार केले जातात. संस्थेशी साधारणपणे 100 आडतदारांनी करार केलेले आहेत.

संबंधित आडतदाराकडून वेळचेवेळी पेमेंट डी.डी. द्वारे जमा होते. पेमेंट जमा झाल्यानंतर संबंधित शेतकऱ्याने संस्थेकडून क्रेडीटवर माल घेतलेला असल्यास त्याची कपात करुन स्थानिक बँकेच्या धनादेशाने पेमेंट वितरित केले जाते.

### 6.4 मुख्य विभाग –

संस्थेमार्फत विक्रीस पाठविणेत

येणाऱ्या माल विक्री रकमेमधून 1 % शेअर्स अनामत व 0.5 % वटणावळ घेतली जाते. कपात होणारी शेअर्स अनामतची रक्कम रु.100/- च्या पटीतील भागभांडवलाकडे वर्ग केली जाते. अशा पध्दतीमुळे प्रत्यक्ष उत्पादक शेतकऱ्यांचे हित जोपासले जाते. संस्थेच्या एकंदर कामकाजावर नियंत्रण ठेवणेचे व नियोजनाचे काम मुख्य विभागामार्फत केले जाते.

## 6.5 वसुली वितरण विभाग –

संस्थेकडील कामाचा व्याप वाढल्यानंतर येणेबाकी वसुली बाबत आणि संचालक मंडळाच्या धोरणानुसार क्रेडीटबाबत निश्चित करणेत आलेल्या धोरणांची अंमलबजावणी करणेकरिता वसूली व वितरण विभाग अशा स्वतंत्र विभागाची निर्मिती करणेत आली.

वेळोवेळी संचालक मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार क्रेडीटबाबतचे प्रमाण, निकष/पात्रता याची अंमलबजावणी करणे.

बी–बियाणे, कीटकनाशके, खते विभागामार्फत क्रेडीटवर वितरित केलेल्या मालाची थकीत येणेबाकी, क्रेडीटवर माल घेऊन परस्पर मालाची विल्हेवाट लावणाऱ्या शेतकऱ्यावर आणि पुरवठादाराशी उद्भवणारे वाद, वाहतुकीकरीता येणाऱ्या गाडी चालक, मालक यांचेशी उद्भवणारे वाद, आडतदाराकडील येणेबाकी आणि संस्थेच्या व्यवहाराशी निगडीत इतर बाबींची कायदेशीर कारवाई या विभागामार्फत केली जाते.

## 6.6 प्रि–कुलिंग कोल्ड स्टोअरेज –

फळे / भाजीपाला हा माल नाशवंत असल्याने आणि बाजारपेठांमधील आवक तसेच हंगाम यामुळे त्याच्या बाजार भावामध्ये फार मोठ्या प्रमाणात चढ–उतार होत असतात. याकरिता या मालाची साठवणूक अथवा निर्यात करावयाची झाल्यास त्याकरिता प्रि–कुलिंग कोल्ड स्टोअरेजची आवश्यकता असते.

याकरिता संस्थेने राष्ट्रीय सहकारी विकास निगम, नवी दिल्ली यांचे अर्थसहाय्यातून साधारणपणे रु.1.50 कोटी गुंतवणूक असणाऱ्या सन 1996-97 मध्ये प्रि–कुलिंग कोल्ड स्टोअरेज प्रकल्पाची उभारणी केली. या प्रकल्पाकरिता कॅलिफोर्निया येथील मशिनरी आयात करणेत आलेली आहे.

सदर प्रकल्पाकरिता अखंडीत विद्युत पुरवठा होणेसाठी संस्थेने त्यावेळी रु.5.00 लाख गुंतवणूक करुन जयसिंगपूर येथील औद्योगिक प्रक्षेत्रातील फीडर वरुन विद्युत वाहिनी टाकून घेतलेली आहे.

सदर प्रकल्पाच्या माध्यमातून द्राक्ष व डाळिंब यांची युरोपियन राष्ट्रे तसेच आखाती राष्ट्रांमध्ये सातत्याने निर्यात चालू ठेवली आहे.

## 6.7 नांदणी सहकारी बँक लि., नांदणी –

संस्थेमार्फत उत्पादन वाढीसाठी आवश्यक तो माल शेतकऱ्यांना पुरविण्यात येत आहे. त्याचप्रमाणे उत्पादित मालाची वाहतूक व विक्री व्यवस्थाही करणेत आली आहे. तथापि; शेतकऱ्यांना आवश्यकतेनुसार अर्थसहाय्य करणे; त्याचप्रमाणे संस्थेमार्फत विक्री झालेल्या मालाचे पेमेंट करणे अधिक सोयीचे व्हावे या उद्देशाने संघाच्या 1995-96 च्या वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये सहकारी बँक स्थापन करणेचा संकल्प करणेत आला.

रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या

धोरणाप्रमाणे अर्बन बँकेच्या स्थापनेचा प्रस्ताव दाखल करणेत आला. त्यास मान्यता मिळालेनंतर नांदणी सहकारी बँक लि., नांदणीची नोंदणी करणेत आली. रिझर्व्ह बँकेकडून बँकेस बँकिंग लायसेन्स मिळालेनंतर सन 1997-98 मध्ये बँकेच्या प्रत्यक्ष व्यवसायास प्रारंभ झाला.

स्थापनेपासून दरवर्षी बँकेची 100 % कर्ज वसूली असून शून्य एन.पी.ए. असणाऱ्या बँकेने अल्पावधीतच नेत्रदीपक प्रगती केली आहे. नांदणी, जयसिंगपूर, कुरुंदवाड अशा तिन्ही शाखा संगणकीकृत असून बँकेस अनेक पुरस्कारही प्राप्त झालेले आहेत.

## 6.8 विभाजन –

नांदणी भाजीपाला व फळफळावळ उत्पादक सहकारी संस्था मर्यादित, नांदणी संस्थेच्या वाटचालीमध्ये कालांतराने निर्णयाभिमुख विभागाकरिता स्वतंत्र व्यवस्थापन व प्रशासन असणे अधिक लाभदायक ठरणार असल्याने तत्कालीन संचालक मंडळाने संस्थेच्या विभाजनाचा प्रस्ताव नोंदणी अधिकाऱ्यांचेकडे सादर केला. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 व नियम यातील तरतूदीप्रमाणे विभाजनाची प्रक्रिया पार पडून दि. 22-6-2001 रोजी मूळ मातृ संस्थेची

1) नांदणी भाजीपाला व फळफळावळ उत्पादक सहकारी संस्था मर्यादित, नांदणी
2) मार्केटिंग ॲण्ड प्रोसेसिंग को-ऑप सोसायटी लि., नांदणी (मॅपकॉस)

या संस्थामध्ये विभागणी झाली. विभाजनाद्वारे प्रि-कुलिंग कोल्ड स्टोअरेज प्रकल्प मार्केटिंग ॲण्ड प्रोसेसिंग को-ऑप सोसायटी लि., नांदणी (मॅपकॉस) या संस्थेकडे हस्तांतरित झाला व उर्वरीत विभाग नांदणी भाजीपाला व फळफळावळ उत्पादक सहकारी संस्था मर्यादित, नांदणी या संस्थेकडे हस्तांतरीत झाले.

## 6.9 नवी मुंबई मार्केटमधील गाळे –

संस्थेची स्वत:ची विक्री व्यवस्था असावी याकरिता संस्थेने मुंबई कृषी उत्पन्न बाजार समिती, नवी मुंबई मार्केटमध्ये गाळ्यांची मागणी केली होती. प्रस्थापित आडतदारांनी सहकारी संस्थेस गाळे देण्यास विरोध केला.

तथापि, संस्थेस भाजीपाला मार्केटमधील ए-3 आणि फळ मार्केटमधील एम्-800 असे दोन गाळे ताब्यात मिळाले असून बाजार समितीकडील घाऊक विक्रीची अनुज्ञप्ती ही संस्थेने घेतलेली आहे. लवकरच सदर गाळ्यावर संस्थेची स्वत:ची विक्री व्यवस्था चालू करणेत येत आहे. सदर विक्री केंद्रावर इलेक्ट्रॉनिक वजन काट्यासह संगणकीकृत यंत्रणा कार्यान्वित करणेत येत आहे.

## 7) अनुदान :-

मूळ मातृ संस्थेने एन.सी. डी.सी. च्या अर्थसाहाय्याने प्रि-कुलींग कोल्ड स्टोअरेज या प्रकल्पाची उभारणी केली. या प्रकल्पास एन.सी.डी.सी. कडून रु.10.00 लाख, ॲपेडाकडून रु.5.00 लाख अनुदान प्राप्त झाले आहे. एम.एफ.पी.आय. (मिनीस्ट्री ऑफ फुड प्रोसेसींग इंडस्ट्रीज, न्यु दिल्ली) कडून रु.18.50 लाख मंजूर झाले. केंद्र शासनाच्या नॅशनल हॉर्टिकल्चर बोर्ड या अंगीकृत उपक्रमाकडून या प्रकल्पासाठी रु.25 लाख अनुदान मंजूर झाले आहे. एन.एच.बी.ने सदर अनुदान प्रस्तावाची गुणात्मक तपासणी करुन अनुदान मंजूर करुन रक्कम वितरित करण्याबाबत

एन.सी.डी.सी. ला कळविले आहे.

**8) प्रगती :-**

सन 2003-2004 ते 2007-2008 या कालखंडातील संस्थेची सभासद संख्या भाग-भांडवल, फंडस्,उलाढाल व नफा इत्यादी घटकावर दृष्टिक्षेप टाकला असता पुढील तक्त्यावरुन संस्थेची प्रगती आजमावता येईल.

**नांदणी भाजीपाला व फळफळावळ उत्पादक सहकारी संघ मर्यादित, नांदणी, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर प्रगतीवरील दृष्टिक्षेप (सन2003-2004 ते 2007-2008)**

| अ.क्र. | तपशील | 2003-04 | 2004-05 | 2005-06 | 2006-07 | 2007-08 |
|---|---|---|---|---|---|---|
| 1. | सभासद संख्या | 1196 | 1323 | 1887 | 1887 | 1892 |
| 2. | भाग-भांडवल (सभासदांचे)रू. | १२४७०० | १५६६३०० | १७२७८०० | १७२७८०० | १९७९५०० |
| 3. | शासकीय भाग-भांडवल रू. | ५७१३८४ | ४२८५१२ | ३५७०७६ | ७१४३६ | २१४२०४ |
| 4. | फंडस् रू. | ३२९४७०५ | ३२४०६०४ | ३५३९८८२ | ३५११११८ | ३८३२००६ |
| 5. | उलाढाल | २६ कोटी रु. | २७ कोटी रु. | २५ कोटी रु. | ११ कोटी रु. | १५५७८९१३७ |
| 6. | नफा रू. | ७४३२० | १००७३६ | १४६७८ | १९६५३ | ४५७९३ |

**स्रोत** - वार्षिक अहवाल सन 2003-2004 ते 2007-2008

संस्थेच्या प्रगतीवर दृष्टिक्षेप टाकल्यास वरील आकडेवारीवरुन स्पष्ट होते की, सन 17.8.1990 रोजी नोंदणी झालेल्या या संस्थेचे सुरूवातीला फक्त 100 शेतकरी सभासद होते आणि सुरूवातीचे सभासदाचे भाग-भांडवल रु.10,000/- इतके होते. या संस्थेच्या सभासद संख्येत सतत वाढ होऊन सन 2003-04 या वर्षात 1996 इतके सभासद वाढले तर सभासदाचे भाग-भांडवल रु. 1,24,700 इतके वाढले; सन 2007-08 या वर्षात सभासद संख्या 1892 पर्यंत वाढून भाग-भांडवल रु.19,79,500 पर्यंत वाढले. सभासद व भागभांडवलामध्ये सतत वाढ होत असल्याचे दिसते. सन 2003-04 या वर्षी शासकीय भाग-भांडवल रु. 5,71,384 इतके होते ते कमी होऊन सन 2007-2008 मध्ये रु.2,14,204 पर्यंत कमी झाले. शासकीय भाग-भांडवल संस्थेने प्रत्येक वर्षी काही प्रमाणात परत केल्याने ते कमी झाले.

सन 2003-2004 यावर्षी संस्थेचे फंडस् रु. 32,94,705 होते, त्यात वाढ होऊन सन 2007-2008 या वर्षात रु. 38,32,006 पर्यंत वाढले. संस्थेच्या फंडस् मध्ये प्रत्येक वर्षी वाढ होत असल्याचे दिसते. संस्थेच्या सर्व विभागाची एकूण उलाढाल सन 2003-2004 मध्ये रु.26 कोटी होती. ती वाढून सन 2004-2005 मध्ये रु. 27 कोटी झाली.पण सन 2005-2006 मध्ये घटून रु.25 कोटी इतकी कमी झाली. पुन्हा आणखी उलाढाल कमी

होऊन रु. 11 कोटी पर्यंत घटली होती. ही उलाढाल इतकी कमी होणेचे कारण म्हणजे संस्थेच्या कार्यक्षेत्रात प्रथमत: अचानक आलेल्या महापुराने भाजीपाल्याचे नुकसान होऊन उत्पादन घटले. नांदणी गावात व संस्थेच्या कार्यक्षेत्रातील अनेक गावात 'खाजगी भाजीपाला उत्पादक खरेदी–विक्री संघ' स्थापन झाल्याने संस्थेच्या सभासद शेतकऱ्यांनी परस्पर खाजगी संघाना भाजीपाला विकल्याने उलाढाल घटली. या उलाढाली मधून संस्थेला सन 2003-2004 मध्ये रु.74320 रुपयाचा नफा झाला. तो वाढून सन 2004-2005 मध्ये रु. 100736 पर्यंत वाढला. पण पुन्हा तो घटून सन 2005-2006 मध्ये रु.14678 इतका कमी झाला. तर सन 2006-2007 मध्ये रु. 19653 इतका झाला. परंतु सन 2007-2008 मध्ये उलाढाल वाढल्याने हा नफा रु. 45793 पर्यंत वाढला.

## 9) उपसंहार :-

'नांदणी भाजीपाला व फळफळावळ उत्पादक सहकारी संघ मर्यादित, नांदणी' ही एक नाशवंत असणाऱ्या फळांचे व भाजीपाल्यांचे विपणन करणारी यशस्वी संस्था आहे. ही संस्था शेतकऱ्यांना वस्तू स्वरुपात बी–बियाणे, कीटकनाशके व खते उधारीवर पुरवठा करीत असल्याने भाजीपाला उत्पादन वाढविण्यास शेतकऱ्यांना कोणत्याही अडचणी येत नाहीत. यासंस्थेमार्फत विविध फळे व भाजीपाल्यांचे उत्पादन वाढविणेसाठी तज्ञ मार्गदर्शकाची मार्गदर्शनपर व्याख्याने आयोजित केली जातात. त्याचा फायदा शेतकऱ्यांना होत आहे. या संस्थेमार्फत पुणे, मुंबई, नागपूर, अहमदाबाद, दिल्ली, कलकत्ता येथे मोठ्या प्रमाणात फळे व भाजीपाल्यांची निर्यात केली जात असल्याने आणि या निर्यातीमुळे मागणी–पुरवठ्यातील योग्य समन्वय साधला जात असल्याने शेतकऱ्याना चांगला दर मिळतो. संस्थेने प्रि–कुलिंग कोल्ड स्टोअरेज या प्रकल्पाच्या माध्यमातून द्राक्षे व डाळिंब यांची युरोपियन राष्ट्रे तसेच आखाती राष्ट्रांमध्ये सातत्याने निर्यात चालू ठेवली आहे. संस्थेच्या सभासद संख्येत, भाग–भांडवलात उलाढालीमध्ये आणि नफ्यात सतत वाढ होत असल्याचे दिसते. या संघाच्या कार्यक्षेत्रात अनेक गावी एक किंवा एकापेक्षा जास्त 'खाजगी भाजीपाला उत्पादक खरेदी–विक्री संघ' निघाले आहेत. तरी सुध्दा शेतकऱ्यांचा या सहकारी संघावरील विश्वास अद्याप दृढ असल्याचे दिसते. यातच या संघाच्या यशाचे गमक दडल्याचे स्पष्ट होते.

# सत्य : भाववाढी संदर्भातील

**राजकुमार आण्णासो वाइंगडे**
अधिव्याख्याता, के.आय.टी.चे,
ऑफ मॅनेजमेंट एज्यूकेशन अँण्ड रिसर्च,
कोल्हापूर
मोबा. नं. 9922273966

4 जूलै 2009 ला संपलेल्या आठवड्यामध्ये घाऊक किंमत निर्देशांक आधारित भाववाढीचा दर (Wholesale Price Index based inflation rate) सलग पाचव्यांदा शून्याखाली राहिला. भाववाढीचा दर, जो या वर्षीच्या एका आठवड्यातील घाऊक किंमत निर्देशांकातील, मागील वर्षीच्या याच आठवड्यातील घाऊक किंमत निर्देशांकाशी तुलना करता, झालेला टक्केवारी बदल दर्शवतो. तो 4 जूलै 2009 ला संपलेल्या आठवड्यामध्ये 1.21 इतका राहिला. भाववाढीचा हा दर पुढील दोन महिन्यासाठी शून्याखाली राहील असा अंदाज तज्ञाकडून वर्तविण्यात येत आहे. ही गोष्ट सामान्य माणसाला, ज्याला नजरेसमोर ठेवूनच अलीकडील धोरणे आखली जाऊ लागली आहेत त्याला सुखावणारी ठरली पाहिजे.

ज्यावेळी सरकारकडून असे सांगितले जाते की त्यांची आर्थिक धोरणे ही अशा पध्दतीने आखली जातात की जेणेकरून सामान्य माणसाचे संरक्षण होईल व त्याला देशाच्या आर्थिक विकासातील पुरेसा हिस्सा मिळेल, त्यावेळी त्याचा अर्थ असा होतो की सामान्य माणूस आर्थिक विकास प्रक्रियेतील एक भाग आहे व त्याचे वास्तव उत्पन्न वाढत असल्याचे अनुभवत आहे. पण हे शक्य होण्यासाठी त्याचे भाववाढीपासून संरक्षण केले पाहिजे.त्यामुळे आर्थिक धोरणे आखताना आर्थिक विकासाबरोबर किंमत स्थिरता असे उद्दिष्ट समोर ठेवले जाते.

आपण मागील पाच वर्षात (2003-04 ते 2007-08)काय झाले हे पाहिल्यास असे लक्षात येते की आपण आर्थिक विकासाचा दर तर चढा राखलाच पण भाववाढीचा दर ही 5 ते 6 टक्के च्या खाली ठेवण्यात यश संपादन केले. ज्यांचा फिलिप्स वक्रावरचा विश्वास अजूनही दृढ आहे ते चढा विकास दर व कमी भाववाढीचा दर यांच्या एकत्रित अस्तित्वामुळे

आश्चर्यचकीत झाले असले पाहिजेत. त्यांच्यासाठी मागील पाच वर्षे चमत्कारिक ठरली असली पाहिजेत. कारण या काळात भारतीय अर्थव्यवस्थेचा विकास दर समाधानकारक होताच (8 टक्के पेक्षा जास्त),पण भाववाढीचा दर ही खालच्या पातळीला राहिला होता.त्यामुळे भारतीय अर्थव्यवस्थेचे गुणपत्रक समाधानकारक असल्याचे दिसते.

यासंदर्भात विचारात घेण्यासारखी बाब म्हणजे भारतीय अर्थव्यवस्थेची मागील पाच वर्षातील कामगिरी जी समाधानकारक असल्याचे सांगितले जाते ते खरे पहाता एका अर्थाने भासविले जात आहे. याच्या खोलवर गेल्यास याबाबतीतील सत्यता ध्यानात येते. भाववाढीच्या दरासंदर्भात प्रामुख्याने हे खरे ठरते. भाववाढीच्या दराबाबतीत जे चित्र दाखविले गेले आहे ते वास्तवतः खोटे व फसवणूक करणारे आहे. हे खरे आहे की घाऊक किंमत निर्देशांक आधारित भाववाढीचा दर हा खालच्या पातळीला राहिला आहे. पण वस्तूतः हा भाववाढीचा दर सामान्य माणसावरील भाववाढीचा पूर्ण परिणाम मोजण्यात अयशस्वी ठरतो. भाववाढीचा दर मोजण्यासाठी वापरण्यात येणारा घाऊक किंमत निर्देशांक हा जरी व्यापक स्वरूपाचा असला व त्यामुळे सरकारकडून आर्थिक धोरणे आखताना विचारात घेतला जात असला तरी त्यामध्ये काही उणिवा आहेत. पहिली उणिव म्हणजे घाऊक किंमत निर्देशांकामध्ये सेवा क्षेत्राचा, ज्या क्षेत्राचा राष्ट्रीय उत्पन्नातील वाटा हा निम्यापेक्षा जास्त आहे व खाजगी अंतिम उपभोग खर्चामधील हिस्सा हा एक तृतीयांश आहे, त्या क्षेत्राचा विचार केला जात नाही याचाच अर्थ विविध सेवा ज्या सामान्य माणूस उपभोगतो, त्यांच्या किंमतीतील वाढ घाऊक किंमत निर्देशांकात परावर्तित होत नाही. दुसरी गोष्ट म्हणजे घाऊक किंमत निर्देशांक हा भारित किंमत निर्देशांक (WEIGHTED PRICE INDEX) आहे. व तो तयार करताना तीन प्रकारच्या वस्तूंचा योग्य भारासह विचार केला जातो. या तीन प्रकारच्या वस्तू म्हणजे प्राथमिक वस्तू, इंधन व औद्योगिक / वस्तू होत व त्याचे अनुक्रमे भार 22.02 % , 14.23% व 63.75% असे आहेत. सामान्य माणसाशी प्रत्यक्ष संबंधित असणाऱ्या वस्तू म्हणजे प्राथमिक वस्तू व त्यामध्ये अन्नधान्य, वस्तू होत. प्राथमिक वस्तूचा घाऊक किंमत निर्देशांकातील भार कमी असल्यामुळे हा निर्देशांक अशा वस्तूंच्या किंमतीतील वाढ पुरेशा प्रमाणात परावर्तित करण्यास व अशा वाढीचा सामान्य माणसाच्या बजेटवरील परिणाम मोजण्यास असमर्थ ठरतो. घाऊक किंमत निर्देशांकातील तिसरी उणीव म्हणजे तो तयार करताना घाऊक किमती विचारात घेतल्या जातात. पण सामान्य माणसाच्या बाबतीत संबंधित किमती या घाऊक किंमती नसून त्या किरकोळ (रिटेल) असतात. चौथी बाब अशी की सध्या वापरात असलेला घाऊक किंमत निर्देशांक हा सन 2000 साली सुधारित करण्यात आला होता व त्यासाठी 1993-94 हे वर्ष आधार वर्ष म्हणून निश्चित करण्यात आले होते. असे म्हटले जाते की जुना व नवीन निर्देशांक (आधार वर्ष) यामधील फरक हा जास्तीत जास्त दहा वर्षाचा असावा. त्यामुळे आता घाऊक किंमत निर्देशांक सुधारित करण्याची व आधार वर्ष बदलण्याची गरज होती. पण ते आजपर्यंत केले गेलेले नाही. विविध वस्तू ज्या सध्या वापरात नाहीत अशा वस्तू सध्याच्या घाऊक किंमत निर्देशांकाचा भाग आहेत. त्यामुळे अशा वस्तू वगळून नवीन वस्तू समाविष्ट करण्यासाठी घाऊक किंमत निर्देशांक सुधारित करण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे.[२]

भारतामध्ये सरकारने गठित केलेल्या कार्य गटाच्या (Working Group) शिफारशीनुसार घाऊक किंमत निर्देशांक सुधारित करण्याची पध्दत रूढ आहे. असा कार्यगट दहा वर्षातून एकदा गठित केला जातो. घाऊक किंमत निर्देशांक प्रस्तावित केल्यापासून (10 जानेवारी 1942 पासून) आजपर्यंत सहा वेळा तो सुधारित करण्यात आलेला आहे व त्यानुसार बदललेली आधार वर्षे 1948-49, 1952-53, 1961-62, 1970-71, 1981-82 आणि 1993-94 अशी आहेत. एप्रिल 2000 मध्ये केलेल्या शेवटच्या सुधारणेनंतर भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये फार मोठे बदल घडून आलेले आहेत. विविध वस्तू व त्याच्या वैशिष्ट्यामध्ये वेगाने बदल होत आहेत. काही वस्तू ज्या त्यांच्या बाजारातील हिश्यामुळे व लोकांच्या वापरामुळे महत्त्वाच्या होत्या अशा वस्तू लोप पावलेल्या आहेत. त्यामुळे त्या वगळून नवीन प्रचलित वस्तूंचा निर्देशांकात समावेश करण्याची गरज निर्माण झालेली आहे. या अनुषंगाने प्रा. अभिजित सेन यांच्या अध्यक्षतेखाली घाऊक किंमत निर्देशांक सुधारित करण्यासाठी एक नवीन कार्यगट गठित करण्यात आलेला आहे. या कार्यगटाने सुरूवातीला सन 2001-02 हे नवीन आधार वर्ष प्रस्तावित केले होते. पण आवश्यक किंमत आकडेवारी उपलब्ध न झाल्यामुळे नवीन घाऊक किंमत निर्देशांकाची (आधार वर्ष 2001-02) चाचणी (टेस्ट रण) घेणे शक्य झाले नाही. त्यामुळे पुन्हा सन 2004-05 हे आधार वर्ष नवीन घाऊक किंमत निर्देशांकासाठी शिफारस करण्यात आले. मे 2008 मध्ये या कार्यगटाने आपला तांत्रिक अहवाल सरकारला सादर केला आहे. पण अजूनही नवीन प्रास्तावित घाऊक किंमत निर्देशांकाची चाचणी घेतली नाही. कार्यगटाने सरकारला सादर केलेला तांत्रिक अहवाल हा प्राथमिक स्वरूपाचा आहे व त्यामुळे त्यात बदल होण्याची शक्यता आहे. त्यामुळे असे दिसते की सुधारित घाऊक किंमत निर्देशांक (आधार वर्ष 2004-05) हा वापरात येण्यास काही कालावधी लागण्याची शक्यता आहे व परिणामतः सरकारकडून सध्याचा घाऊक किंमत निर्देशांकच (आधार वर्ष 1993-94) भाववाढीचा दर मोजण्यासाठी वापरला जाणार आहे.

वर उल्लेख केलेल्या उणिवांमुळे घाऊक किंमत निर्देशांक हा भाववाढीचा दर, जो सामान्य माणसाशी संबंधित आहे, तो मोजण्यास अपात्र ठरतो. हा निर्देशांक सरकारकडून वापरला जाण्याचे कारण म्हणजे त्याचे व्यापक स्वरूप व दर आठवड्याला त्याची उपलब्धता (दोन आठवड्याच्या अंतरावर). पण घाऊक किंमत निर्देशांक आधारित भाववाढीचा दर हा नियंत्रणात ठेवल्याचे सांगून सरकारकडून लोकांची मने जिंकण्याचा प्रयत्न केला गेला नसला पाहिजे. दुसऱ्या शब्दात, आपण घाऊक किंमत निर्देशांक आधारित भाववाढीचा दर सहनशील पातळीच्या खाली ठेवण्यात यश संपादन करून सामान्य माणसाचे संरक्षण केले आहे असे सांगून सरकारने त्यांची फसवणूक करू नये. घाऊक किंमत निर्देशांक आधारित भाववाढीचा दर हा सामान्य माणसाशी संबंधित नसल्यामुळे त्यातील घट अथवा त्याचे उणे होणे ही गोष्ट सामान्य माणसासाठी आनंददायी बातमी ठरू शकत नाही.

सध्याची भारतातील परिस्थिती यापेक्षा वेगळी नाही आहे. वर उल्लेख केल्याप्रमाणे घाऊक किंमत निर्देशांक आधारित दर हा सलग पाचव्यांदा 4 जूलै 2009 ला संपलेल्या आठवड्यासाठी उणे (-1.21) असल्याचे जाहीर करण्यात आलेले आहे.

त्यावरून एखाद्या सामान्य माणसाला असे वाटेल की त्याच्यासाठी आता किंमती कमी होत आहेत, तो आता ज्यादा वस्तू खरेदी करू शकेल त्यांचे राहणीमान उंचावेल वगैरे वगैरे त्याने त्याच्या कल्पनेत तयार केलेले हे गुलाबी, आल्हाददायक चित्र तो प्रत्यक्षात बाजारात गेल्यानंतर अंधकारमय व उदास बनते. बाजारात खरेदीसाठी गेल्यानंतर त्याच्या लक्षात येते की दैनंदिन गरजा भागविण्यासाठी आवश्यक असणाऱ्या वस्तुंच्या किंमती या घाऊक किंमत निर्देशांक आधारित भाववाढीच्या दराने दाखविल्यानुसार कमी झालेल्या नाहीत, तर त्या वास्तवतः वाढलेल्या आहेत. घाऊक किंमत निर्देशांक, त्यावर आधारित भाववाढीचा दर आणि या दराचा त्याच्याशी असलेला संबंध या गोष्टी त्याला माहित नसल्यामुळे त्याची फसवणूक होते. सरकारकडून विविध माध्यमातून जाहीर केलेल्या भाववाढीच्या दराचाच तो विचार करतो व फसतो.

त्यामुळे सामान्य माणसाला हे सांगण्याची गरज आहे की त्याला लागू होणारा भाववाढीचा दर हा घाऊक किंमत निर्देशांक आधारित नसून तो किरकोळ किंमत निर्देशांक आधारित आहे आणि किरकोळ किंमत निर्देशांक आधारित भाववाढीचा दर हा कमी किंवा उणे झालेला नाही तर तो वाढत आहे व त्यामुळे सामान्य माणसाचे जीवन जगणे असह्य करत आहे. खाली दिलेल्या कोष्टकावरून सरकार घाऊक किंमत निर्देशांक आधारित भाववाढीचा दर, जो सामान्य माणसाच्या राहणीमान खर्चातील बदल परावर्तित करण्यास असमर्थ ठरतो, तो कमी झाल्याचे दाखवून सामान्य माणसाची फसवणूक करत असल्याचा ठोस पुरावा मिळतो. सामान्य माणसाच्या राहणीमान खर्चातील बदल मोजण्यासाठी आपणास किरकोळ/उपभोक्ता किंमत निर्देशांकाचा (Consumer Price Index) वापर करावा लागतो.

उपभोक्ता किंमत निर्देशांकाचे तीन प्रकार आपल्याकडे प्रचलित आहेत. त्यामध्ये औद्योगिक कामगारासाठीचा निर्देशांक, शेती मजूरासाठीचा निर्देशांक व ग्रामीण मजूरासाठीचा निर्देशांक याचा समावेश होतो. यावर आधारित भाववाढीचे दर हे भारत सरकारच्या श्रम खात्यामार्फत जाहीर केले जातात. उपभोक्ता किंमत निर्देशांकांचे हे तीन प्रकार तीन प्रकारच्या लोकांच्या राहणीमान खर्चातील बदल मोजण्यासाठी वापरले जातात खालील कोष्टकामध्ये दिलेल्या उपभोक्ता किंमत निर्देशांकावर एक नजर टाकल्यास असे लक्षात येते की वर उल्लेख केलेल्या तीन प्रकारच्या लोकांसाठी किंमती या वाढत आहेत. काही वेळा दोन संख्येने वाढत आहेत व अलीकडच्या भूतकाळात त्या कधीही उणे झालेल्या नाहीत.

**कोष्टक क्र.१**

**भाववाढीचा मासिक दर (टक्के)**

| वर्ष/महिना | उपभोक्ता किंमत निर्देशांक | | | घाऊक किंमत निर्देशांक |
|---|---|---|---|---|
| | औद्योगिक कामगारासाठी (आधार वर्ष-2001=100) | शेती मजूरासाठी (आधार वर्ष) 1986-87 = 100 | ग्रामीण मजूरासाठी (आधार वर्ष) 1986-87 =100 | सर्व साधारण / सर्व वस्तूसाठी (आधार वर्ष - 1993-94 = 100) |
| 2008 जानेवारी | 5.51 | 4.69 | 4.66 | 4.45 |
| फेब्रुवारी | 5.47 | 6.38 | 6.11 | 5.26 |
| मार्च | 7.87 | 7.91 | 7.63 | 7.48 |
| एप्रिल | 7.81 | 8.88 | 8.61 | 8.03 |
| मे | 7.75 | 9.11 | 8.84 | 8.85 |
| जून | 7.69 | 8.77 | 8.75 | 11.82 |
| जुलै | 8.33 | 9.41 | 9.41 | 12.35 |
| ऑगस्ट | 9.02 | 10.29 | 10.29 | 12.81 |
| सप्टेंबर | 9.77 | 10.98 | 10.98 | 12.27 |
| आक्टोंबर | 10.45 | 11.14 | 11.14 | 11.05 |
| नोव्हेंबर | 10.45 | 11.11 | 11.11 | 8.47 |
| डिसेंबर | 9.70 | 11.14 | 11.14 | 6.14 |
| 2009 जानेवारी | 10.45 | 11.62 | 11.35 | 4.95 |
| फेब्रुवारी | 9.63 | 10.79 | 10.79 | 3.50 |
| मार्च | 8.03 | 9.46 | 9.69 | 1.19 |
| एप्रिल | 8.70 | 9.09 | 9.09 | 1.31 |
| मे | 8.63 | 10.21 | 10.21 | 0.43 |

Sources :- 1) Labour Bureau, Ministry of Labour & Employment,GOI.
2) Office of the Economic Advisor, Ministry of Commerce & Industry, GOI

सन 2008 मधील 5 ते 6 महिन्याचा काळ सोडल्यास (जेव्हा आंतरराष्ट्रीय बाजारातील वस्तूंच्या चढत्या किंमतीमुळे घाऊक किंमत निर्देशांक आधारित भाववाढीचा दर हा उपभोक्ता किंमत निर्देशांक आधारित भाववाढीच्या दरापेक्षा जास्त होता) इतर काळासाठी उपभोक्ता किंमत निर्देशांक आधारित भाववाढीचा दर हा वरच्या पातळीला व घाऊक किंमत निर्देशांक आधारित भाववाढीच्या दरापेक्षा जास्त राहिल्याचे दिसते. घाऊक किंमत निर्देशांक आधारित भाववाढीचा मासिक दर नोव्हेंबर 2008 पासून कमी होण्यास सुरूवात झाली व जून 2009 मध्ये तो उणे झाला. याच काळात उपभोक्ता किंमत निर्देशांक आधारित भाववाढीचा मासिक दर तीनही वर्गासाठी 8 टक्के पेक्षा जास्त राहिला. याचाच अर्थ सामान्य माणसासाठी किंमती कमी झालेल्या तर नाहीतच पण त्या सहनशक्य दरापेक्षा (4 ते 5 टक्के) जास्त दराने वाढत आहेत. त्यामुळे सरकार जरी भाववाढीचा दर कमी झालेला आहे असा डंका वाजवत असले तरी सामान्य माणूस हा वाढणाऱ्या किमतीमुळे नुकसान सोसत आहे व त्याच्या वास्तव उत्पन्नातील ऱ्हास अनुभवत आहे.

सत्य हेच आहे की भाववाढीचा दर अजूनही उपभोक्ता व सामान्य माणूस यांना टोचत आहे हे दुःख सोसण्यास भाग पाडत आहे. त्याचप्रमाणे उपभोक्ता किंमत निर्देशांक आधारित औद्योगिक कामगारासाठीचा भाववाढीचा दर व शेती व ग्रामीण मजूरासाठीचा भाववाढीचा दर याची तूलना केल्यास तो शेवटच्या दोन वर्गासाठी जास्त असल्याचे दिसते. त्यामुळे अलीकडच्या काळातील आर्थिक विकासाचे फायदे हे ग्रामीण भागापेक्षा शहरी भागास जास्त मिळाले आहेत हे गृहीत सत्य मानल्यास, शेती व ग्रामीण मजुरासाठीच्या चढया भाववाढीच्या दरामुळे ग्रामीण भागात सामान्य माणसाचे जगणेच असह्य झाले असले पाहिजे असे म्हणावे लागेल.

## आतापर्यंतचे सरकारी धोरण

आतापर्यंतचे सरकारी धोरण, मग ते वित्त मंत्रालयाचे असो अथवा रिझर्व्ह बँकेचे असो, हे घाऊक किंमत निर्देशांक आधारित भाववाढीचा दर आटोक्यात आणण्यासाठीच्या दिशेने आखले गेले आहे व उपभोक्ता किंमत निर्देशांक आधारित भाववाढीच्या दराकडे सरकारने पूर्णपणे दुर्लक्ष केले असल्याचे दिसून येते. मार्च ते नोव्हेंबर 2008 या कालावधीत घाऊक किंमत निर्देशांक आधारित भाववाढीचा दर जास्त असताना सरकारी धोरणाचा पवित्रा हा कठोर व ताठ ठेवण्यात आला आणि जेव्हा तो कमी होण्यास सुरूवात झाली तेव्हा धोरणाचा पवित्रा मऊ करण्यात आला. गेल्या चार ते पाच महिन्यात रिझर्व्ह बँकेकडून केली गेलेली रेपो दर, रिव्हर्स रेपो दर राखीव निधी प्रमाण यामधील कपात ही द्योतक आहे की भाववाढ आता सरकारसाठी चिंतेची बाब नाही आहे व त्यामुळे सरकारी धोरणाने आता आर्थिक विकास दरावरती जास्त लक्ष केंद्रित केले पाहिजे. तथापि, धोरण कर्त्यांनी अजूनही वरच्या पातळीला असलेल्या उपभोक्ता किंमत निर्देशांक आधारित भाववाढीचा दर व त्यांचा सामान्य माणसासाठीचा अन्वयार्थ याचा विचार केलेला दिसत नाही. अलीकडे ज्याची वारंवार चर्चा केली जाते असे सर्वसमावेशक आर्थिक वाढीचे (Inclusive Economic Growth) लक्ष्य हे कधीही साध्य होणार नाही व एक स्वप्न बनून राहील जर सरकारने सामान्य लोकांचे भाववाढीपासून संरक्षण केले नाही तर. प्रामुख्याने अन्नधान्य वस्तूंच्या भाववाढीपासून सामान्य लोकांचे

संरक्षण करणे गरजेचे आहे कारण उपलब्ध आकडेवारीवरून असे दिसून येते की भारतातील एखाद्या गरीब कुटुंबाच्या उत्पन्नापैकी जवळपास 60 ते 70 टक्के हिस्सा हा अन्नधान्य वस्तूवरती खर्च केला जातो.[5]

याचाच अर्थ असा होतो की गरीब कुटुंबांच्या दृष्टीने कच्चे इंधन तेल व धातू यांच्या किंमती कशा बदलतात यापेक्षा अन्नधान्याच्या किंमती बाबतीत काय होते हे महत्त्वाचे ठरते. आतापर्यंतचे सरकारी धोरण हे कच्चे तेल व धातूच्या किंमतीतील बदलास (घाऊक किंमत निर्देशांक आधारित भाववाढीच्या दरास) जास्त प्रतिसाद देणारे व अन्नधान्य व इतर जीवनावश्यक वस्तूच्या किंमतीकडे दुर्लक्ष करणारे असल्याचे दिसून येते. रिझर्व्ह बँकेकडून अलीकडच्या काळात स्वीकारले गेलेले सौम्य स्वरूपाचे मौद्रिक व पत धोरण (Soft Monetary L & Credit Policy) हे स्पष्टपणे घाऊक किंमत निर्देशांक आधारित भाववाढीचा दर समोर ठेवून आखण्यात आलेले आहे. त्यामुळे उपभोक्ता किंमत निर्देशांक आधारित भाववाढीचा दर जो अजूनही वरच्या पातळीला आहे. त्याकडे पूर्णपणे दुर्लक्ष झालेले आहे. सामान्य व गरीब लोक ज्यांना आतापर्यंतच्या आर्थिक विकासाचा फारसा फायदा मिळालेला नाही अशा लोकांना उपभोक्ता किंमत निर्देशांक आधारित भाववाढीचा दर आटोक्यात न आणल्यास दुहेरी फटका बसणार आहे.[6] अगोदरच त्यांचे वास्तव उत्पन्न फारसे वाढलेले नाही. त्यामुळे जर अन्नधान्य वस्तूच्या किंमती नियंत्रित केल्या गेल्या नाहीत तर त्यांच्या वास्तव उत्पन्नात घट होऊन त्यांना उदर निर्वाह करणे सुध्दा अवघड होऊन बसेल. त्यामुळे सरकारी धोरणाने उपभोक्ता किंमत निर्देशांक आधारित भाववाढीचा दर आटोक्यात आणण्यावर लक्ष केंद्रित करणे गरीब व सामान्य लोकांचे संरक्षण करण्याच्या दृष्टीने गरजेचे बनले आहे.

**योग्य धोरणात्मक प्रतिसाद :-**

उपभोक्ता किंमत निर्देशांक आधारित भाववाढीचा दर (अन्नधान्य वस्तूच्या भाववाढीचा दर) आटोक्यात आणण्यासाठी आखले जाणारे सरकारी धोरण हे अन्नधान्य वस्तूंच्या पुरवठ्यावर लक्ष केंद्रित करणारे असले पाहिजे. अन्नधान्य वस्तूच्या बाबतीतील भाववाढ व त्यामुळे होणारी उपभोक्ता किंमत निर्देशांक आधारित भाववाढ ही प्रामुख्याने ज्यादा मागणी व अपुरा पुरवठा यामुळे उद्‌भवते. पण मागणी कमी करण्यासाठी केलेला प्रयत्न हा भाववाढ आटोक्यात आणण्यात अयशस्वी ठरण्याची शक्यता जास्त. कारण अन्नधान्य वस्तूसाठी असणारी मागणी ही वास्तवतःअलवचिक स्वरूपाची असते. त्यामुळे ताठ मौद्रिक धोरण अवलंबणे मागणी व त्यामुळे भाववाढ कमी करण्यात फारशे यश संपादन करू शकत नाही. अन्नधान्य वस्तूच्या बाबतीतील भाववाढ आटोक्यात आणण्यासाठी कायम स्वरूपाचा उपाय म्हणजे देशांतर्गत उत्पादने वाढवणे हा होय. अल्पकाळात किंमती नियंत्रणात ठेवण्यासाठी सार्वजनिक वितरण व्यवस्था कार्यक्षम करणे, आयातीद्वारे अन्नधान्याचा साठा करून तो योग्य वेळी वापरणे (Buffer Stock Operations) खाद्य तेल व डाळी यासारख्या अन्नधान्य वस्तू वरील उत्पादन शुल्क व आयात शुल्क कमी करणे, इ. सारख्या मार्गाचा अवलंब करता येऊ शकतो.

सारांश रूपाने लक्षात ठेवण्यासारखी महत्त्वाची बाब म्हणजे सरकारने लोकांना अंधारात ठेवून फसविण्याचा व्यवसाय बंद केला पाहिजे व

अन्नधान्य वस्तूची भाववाढ नियंत्रित ठेवण्यासाठी काही ठोस उपाय योजिले पाहिजेत. अन्यथा, भारतासमोर असणाऱ्या इतर समस्या सारखी अन्नधान्याच्या भाववाढीची समस्या ही कायमस्वरूपी (Chronic) बनून राहील.

**संदर्भ**


1) Rastogi, Rashmi & Tanu M. Goyal (2009) : For a Comprehensive Index, The Economic Times, 13 June.
2) Govt. of India (May,2008): Technical Report of the Working Group- Revision of Index Number of wholesale prices in India form the base year 1993-94 to 2004-05 office of the Economic Advisor, Department of Industrial policy & promotion, ministry of commerce & Industry.
3) Ibid
4) Reddy, Y.V.(2000): Monetary & Financial Sector Retorms in India :A Central Banker's Perspective, UBSPD, New Delhi)
5) Tuteja, Usha (2008): Protect Poor from Food Inflation,The Economic Times, 31 December.
6) Ibid


---


**MARATHI ARTHASHASTRA PARISHAD**
**(Estd.1977)**

**ANNOUNCEMENT**

The Parishad has constituted an endowment fund for the award, on an annual basis, of Dr. R.S.Sabnis Memorial prize of Rupees Four Thousand only for outstanding contribution in the form of an article published during calendar year 2007 - 2008 in standard accredited journals on themes belonging to the areas : Central banking, Industrial Finance and General industrial Economics. Last date for the submission of entries (Two copies) for this year's contest is 28th September 2009. For further details contact the undersigned at his address : Sadanand Bengiow, opp. Venkatesh Plaza, Mahadevnagar, Urun-Islampur. Tal.Walwa.Dist.Sangli Pin-415 409.

Yours Faithfully,

(Dr.D.K.Patil)
Executive President

# ग्रंथपरीक्षण

## India and China Comparing the Incomparable

**लेखक : विष्णू सराफ,**

Observer Research Foundationआणि मॅकमिलन इंडिया लिमिटेड, २००८, पृष्ठे १५७, किंमत रू. ३८५/-

सु.गो. भानुशाली,
पुणे.

भारत आणि चीन या दोन देशांची बहुसमावेशक तुलना करणारे विष्णू सराफ यांचे हे पुस्तक अनेक दृष्टींनी वैशिष्टयपूर्ण आहे. या दोन देशांची तुलना करणारी अनेक पुस्तके आणि शोध निबंध प्रकाशित झाले असताना मॅकमिलन सारख्या ख्यातनाम प्रकाशन संस्थेने ते प्रकाशित करावे यातच त्याचे वैशिष्टय आहे. सराफ यांची दोन देशांची तुलना आर्थिक, सामाजिक, राजकीय व संरचनात्मक मुद्यांना धरून केली असून त्यासाठी त्यांनी निवडलेली प्राचले या तुलनेला अर्थ प्राप्त करून देणारी आहेत. या दोन देशातील विकासाची प्रतिमाने, वित्तीय व्यवस्था,उत्पादन व्यवस्था,परदेशी प्रत्यक्ष गुंतवणूक, मूलभूत सुविधा, अधिमूल्यित चलन ही आर्थिक तुलनेसाठी निवडलेली प्राचले इतरांनी निवडलेल्या प्राचलांपेक्षा वेगळी आहेत. या प्राचलांमधील गुणात्मक बहुमिती त्यांनी उलगडून दाखविली आहे हे विशेष होय.लोकसंख्येचा आकृतीबंध, शैक्षणिक व्यवस्था, संचार स्वातंत्र्य, प्रामाणिकपणा, प्रदूषण ही सामाजिक प्राचले त्यांनी निवडली आहेत. अस्पष्ट मताअधिकार, राजकीय बंधने, श्रमविषयक कायदे, अकार्यक्षम कायदा व्यवस्था, स्वातंत्र्य नसलेने प्रसार माध्यम ही राजकीय प्राचले आणि प्रशासकीय यंत्रणा,शासनाची रचना, बँका व इतर वित्तीय संस्था तसेच न्याय संस्थांची मांडणी अशी संरचनात्मक प्राचले सराफ यांनी निवडली आहेत. ह्या प्रत्येक प्राचलासंबंधी तुलना पृथक्पणे न करता विवेचनाच्या ओघात त्यांची स्थिती व त्यावरील टिप्पणी करीत गेल्यामुळे ही तुलना जास्त प्रत्ययकारी झाली आहे; वास्तव व न्याय देणारी झाली आहे.

आर्थिक, सामाजिक व राजकीय बाबतीत वर्चस्व प्रस्थापित करण्यासाठी चीनने वरून खाली कार्यवाहित आणले जाणारे विकासाचे प्रतिमान स्वीकारले आहे. तर देशाच्या राष्ट्रीय उत्पन्नात वाढ घडवून आर्थिक समानता,

राजकीय, आर्थिक, सामाजिक व धार्मिक स्वातंत्र्य निर्माण करण्याच्या उद्देशाने खालून वर कार्यवाहित आणले जाणारे विकासाचे प्रतिमान भारताने स्वीकारले आहे. पुस्तकातील चर्चा तीन विभागात आहे. भारत व चीन यामधील तुलना नेहमी ज्या प्राचलांवर केली जाते; त्यांचे विवेचन व या प्राचलांवर आधारून तुलनात्मक निष्कर्ष काढण्यातील त्रुटी यांचे परीक्षण पहिल्या भागात केले आहे. भारत चीनला मागे टाकू शकेल का या शिर्षकाखाली या दोन देशांमधील तुलना वास्तववादी व्हावी म्हणून निवडलेल्या प्राचलांच्या आधारे केलेले विश्लेषण दुसऱ्या भागात समाविष्ट केलेले आहे. भारताच्या विकासातील अडथळ्यांची चर्चा तिसऱ्या भागात केली आहे. या भागाच्या शेवटी चीन आणि भारतासाठी काही महत्वाच्या सूचना दिल्या आहेत. परिशिष्टात चीनचे चलन अधोमूलित असण्याच्या परिस्थितीची व त्याच्या परिणामांची चर्चा केली आहे. या तीनही भागांचे विवेचन पुढे केले आहे.

चीनमध्ये भौतिक मूलभूत सुविधा खूप व चांगल्या दर्जाच्या आहेत. त्यात चीनी शासन ए.रा.ड.च्या 9% रक्कम गुंतवते. वीज कपातीमुळे केवळ दोन टक्के उत्पादन घटते. श्रमिक कायदे निगम संस्थांना सोयिस्कर असलेले आहेत (म्हणजेच श्रमिकांचे शोषण जास्त आहे), प्रशिक्षित, कौशल्य व उत्पादकता जास्त असलेल्या श्रमिकांचा पुरवठा पुरेसा आहे. निगम कराचा दर केवळ 15% आहे. परदेशी भांडवलाला सवलतीची वागणूक मिळते. भांडवलावर जास्त दराने परतावा मिळतो. त्यामुळे भारताच्या जवळ-जवळ अठरापट जास्त परदेशी प्रत्यक्ष गुंतवणूक चीनमध्ये येते. पण परदेशी प्रत्यक्ष गुंतवणूकीची चीन देत असलेली आकडेवारी फसवी आहे. एक बाब अशी की चीनमध्ये येणारा अवैध पैसा परदेशी प्रत्यक्ष गुंतवणूक म्हणून दाखविला जातो. एकूण परेदशी गुंतवणुकीतील त्याचे प्रमाण वीस टक्के आहे. दुसरी बाब अशी की, विविध देशातून झालेल्या गुंतवणूकीची चीनने दिलेली आकडेवारी व त्या देशांनी दिलेली आकडेवारी यात बरीच तफावत आहे. उदाहरणार्थ, यु.एन.सी.टी.ए.डी.च्या 2005 च्या गुंतवणूक अहवालाप्रमाणे अमेरिकेची चीनमध्ये चीनने दाखविलेली गुंतवणूक 242.4 कोटी डॉलर्स आहे. (तक्ता 1.3 पान-9) आणि हे सर्वच देशांच्या बाबतीत आहे. चीनमध्ये येणारी परदेशी प्रत्यक्ष गुंतवणूक भारतात येणाऱ्या गुंतवणूकीपेक्षा जास्त असल्यामुळे आर्थिक व राजकीय दृष्ट्या चीन भारताच्या पुढे आहे असा निष्कर्ष काढणे फसवे ठरेल. परदेशी प्रत्यक्ष गुतंवणुकीमुळे विकास साधता येतो हेही खरे नाही. जपान, दक्षिण कोरिया, तैवान या देशांमध्ये फारशी परदेशी प्रत्यक्ष गुंतवणूक नसताना सुध्दा विकास साधला गेला तर ब्राझीलमध्ये ती असूनही विकास साधता आला नाही.

भारताच्या मानाने चीनमध्ये नागरीकरण दीडपट झाले असूनही तेथे शहरांना झोपडपट्ट्यांचा विळखा पडलेला नाही. शहरात झोपडपट्टी होऊन देशाची राजकीय इच्छाशक्ती व परिणामकारक प्रशासन चीनमध्ये आहे असा निष्कर्ष शोध निबंधातून काढला आहे. मात्र याची कारणमीमांसा वेगळी आहे. चीनमध्ये ग्रामीण भागातून नागरी भागात स्थलांतर करण्यासाठी परवाना लागतो व तो सहजा सहजी मिळत नाही. त्यामुळे ग्रामीण भागात दारिद्रयात पिचत असलेल्या लोकांना नागरी भागात येऊन आपले जीवनमान सुधारता येत नाही चीनमधील शहरे चकाचक दिसत असली तरी तेथे

प्रदूषण जास्त आहे. प्रदूषण नियंत्रणाचे कायदे भारताइतके कडक नसल्यामुळे परदेशी निगम संस्थांना प्रदूषण नियंत्रणावरील खर्च टाळता येतो. भारतातही परदेशी निगम संस्था प्रदुषणाचे कायदे धाब्यावर बसवित असतातच. चीनमध्ये आर्थिक विषमता खूप आहे व 1970 नंतर ती आणखी वाढली आहे. नागरीकरणाच्या मुद्यावर चीन भारतापेक्षा जास्त पुढे आहे म्हणून चीन विकसित आहे असा निष्कर्ष काढणे भारतावर अन्याय करण्यासारखे होईल.

चीन आणि भारत यांचे एकूण राष्ट्रीय उत्पन्न 1980 मध्ये सारखे होते.पण 2006 मध्ये चीनचे एकूण राष्ट्रीय उत्पन्न भारताच्या तिप्पट होते.चीनमधील बचतीचा दर एकूण राष्ट्रीय उत्पन्नाच्या 45 ते 50 टक्के असल्यामुळे आणि जास्त प्रमाणात परदेशी प्रत्यक्ष गुंतवणूक येत असल्यामुळे हे शक्य आहे. प्रत्यक्षात चीन भाववाढीचा दर कमी दाखवित असल्यामुळे एकूण राष्ट्रीय उत्पन्न जास्त वेगाने वाढत आहे असे वाटते.

भारत आणि चीन यांची तुलना करण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या पारंपारिक प्राचलांपैकी काही प्राचलांची वानगी दाखल येथे चर्चा केली आहे. या प्राचलांची अशी उकल करून दाखवून काढलेले निष्कर्ष फोल आहेत असे सराफ यांनी दाखवून दिले आहे. सराफ यांनी तुलना करण्यासाठी निवडलेल्या नवीन प्राचलांबाबतीतील विश्लेषण पुढील परिच्छेदात मांडले आहे.

चीनने स्वीकारलेल्या लोकसंख्याविषयक धोरणामुळे 1975 ते 2006 या काळात चीनची लोकसंख्या 43% नी वाढली. भारताची लोकसंख्या याच कालावधीत 80 टक्क्यांनी वाढली. चीन लोकसंख्या संक्रमणाच्या पहिल्या अवस्थेतून दुसऱ्या अवस्थेत १९७५ मध्ये तर भारत १९८० मध्ये गेला. लोकसंख्या संक्रमणाची दुसरी अवस्था पार करून चीन २०१५ मध्ये तिसऱ्या अवस्थेत प्रवेश करील, भारताला दुसऱ्या अवस्थेतून तिसऱ्या अवस्थेत जाण्यासाठी 2030 साल उजाडण्याची वाट पहावी लागेल. लोकसंख्येतील काम करणाऱ्या वयोगटाचे एकूण लोकसंख्येशी असलेले प्रमाण, बचत आणि गुंतवणूक दर यावर आर्थिक वाढीचा दर अवलंबून असतो. काम करणाऱ्या वयोगटातील लोकांचे लोकसंख्येतील प्रमाण जास्त असल्यास चालू खात्यावरील वाढावा वाढतो; ज्येष्ठ नागरिकांचे प्रमाण जास्त असल्यास राजकोषीय तूट वाढते.

या संक्रमणावस्थेच्या परिस्थितीचे विश्लेषण केल्यास असे दिसून येते की 2005 मध्ये भारतातील माध्य वय 28 वर्षे व चीनमधील 34 वर्षे होते. म्हणजे भारताची लोकसंख्या चीनी लोकसंख्येपेक्षा तरूण आहे. प्रत्येक जोडप्यामागे एक मूल हे लोकसंख्याविषयक धोरण चीनमध्ये स्वीकारल्यामुळे चीनमधील लोकसंख्या आकृतीबंध 4-2-1 असा झाला आहे. चार आजी-आजोबा, दोन आई-वडील आणि एक मूल म्हणजे दोघांनी पाच जणांना पोसावयाचे भारतात श्रमशक्ती अतिरिक्त असेल तर चीनमध्ये श्रमशक्तीची तूट असेल. याचा निष्कर्ष असा की चीनच्या लोकसंख्येतील ज्येष्ठ नागरिकांचे प्रमाण जास्त असून चीनी लोकसंख्या श्रीमंत होण्यापूर्वीच म्हातारी होत आहे.

चीनमध्ये 1980 पर्यंत कोणत्याच आर्थिक क्षेत्रात खाजगी क्षेत्र नव्हते. आता काही लहान उद्योग खाजगी क्षेत्रात सुरू झाले असले तरी कोणते उद्योग वाढवावयाचे, कोणत्या व्यवसाय संस्था स्थापन करावयाच्या व त्यांचे यश कितपत दाखवावयाचे

हे सर्व निर्णय राजकीय नेतृत्व घेत असते. विनामूल्य जमीन, स्वस्त कर्ज आणि हमखास बाजारपेठ असल्यामुळे उत्पादन परिव्यय कमी असतो व व्यवसाय संस्था यशस्वी ठरतात. पण आज एकही चीनी ब्रँड राष्ट्रीय व जागतिक पातळीवर मान्यता पावलेला नाही. चीनी शासन आर्थिक घडामोडीत आजही फार हस्तक्षेप करते. चीनमध्ये राजकीय भांडवलशाही आहे.

भारतात स्वातंत्र्यपूर्व काळापासून सक्षम खाजगी क्षेत्र आहे.1952 ते 1985 च्या 'लायसन्स राज'च्या काळात खाजगी क्षेत्राचा विकास मंदावला असला तरी क्षमता आबाधित होती. भारतात कर दर जास्त आहेत. श्रमाभिमुख श्रमिक कायदे आहेत. व्याज दर जास्त आहे. बँकाना वित्त सहज मिळत नाही. तरीसुध्दा खाजगी उद्योग यशस्वी होत आहेत. खाद्य पदार्थ, कपडे, दुचाकी व चार चाकी वाहने, अल्युमिनियम, लोखंड व पोलाद, मद्य, संगणक सेवा, आरोग्य सेवा या क्षेत्रातील बावीस पेक्षा जास्त ब्रँड जागतिक पातळीवर मान्यता पावलेले आहेत.

स्वस्त श्रमशक्ती, जास्त सोपी कर प्रणाली चांगल्या मूलभूत सुविधांची उपलब्धता आणि सुधारणा करण्याची प्रबळ राजकीय इच्छाशक्ती यामुळे परदेशी गुंतवणूक व परदेशी व्यवसाय संस्था जास्त प्रमाणात चीनमध्ये येतात. भारतातील निगम कर दर चीनच्या निगम करदराच्या तुलनेत जवळ जवळ तिप्पट आहे. चीन मध्ये संयुक्त व्यवसाय संस्था स्थापण्याचा करार 406 दिवसात कार्यान्वित केला जाऊ शकतो; तर भारतात 1420 दिवस लागतात. या दोन्ही देशात सर्वदूर भ्रष्टाचार आहे. चीनी कर्मचारी पैसे घेऊन चटकन कामे करतात तर भारतातील शासकीय सेवक पैसे घेऊनही काम करण्यात चालढकल करतात. असे असूनही फार मोठ्या प्रमाणावर परदेशी भांडवल व परदेशी व्यवसाय संस्था भारतात येतात. याला तशीच प्रबळ कारणे आहेत. भारतातील भांडवल बाजार विकसित व सुस्थिर आहे. भारतात 23 समभाग बाजार आहेत व ते खाजगी व्यवसाय संस्थांना भांडवल पुरवितात.चीनमधील दोन्ही समभाग बाजार शासकीय व्यवसाय संस्थांना भांडवल पुरवितात. बँकाचा व्याजदर ऋण असल्यामुळे चीनमधील किरकोळ गुंतवणूकदार काहीही किंमत देऊन समभाग विकत घेतात. चीनी लोकांकडे पैसा आहे पण गुंतवणूकीची विविध साधने नाहीत.भारतातील भांडवल बाजाराच्या भांडवलीकरणाचा एकूण राष्ट्रीय उत्पन्नाशी असलेला अनुपात 69 टक्के आहे तर चीनमध्ये तो 22 टक्के आहे.शिवाय शांघाय समभाग बाजारातील पंचावन्न टक्के समभाग विनिमय योग्य नाहीत. भारतीय भांडवल बाजारात नोंदणीकृत व्यवसाय संस्थांची संख्या 4842 आहे तर शांघाय भांडवल बाजारात 850 व्यवसाय संस्था नोंदविलेल्या आहेत. चीनच्या समभाग बाजारातील चढउतार भारतातील समभाग बाजारातील चढउतारापेक्षा जास्त असतात. त्यामुळे चीनी समभाग बाजार गुंतवणूकीची केंद्रे म्हणून मानण्याऐवजी जुगाराचे अड्डे मानले जातात. चीनी व्यवसाय संस्थांना भांडवल उभारणीसाठी परदेशात जावे लागते.

परदेशी व्यवसाय संस्थांना चीनमधील गुंतवणूकीवर जास्त परतावा मिळत असला तरी तेथे जोखीम जास्त आहे. भारतातील परदेशी व्यवसाय संस्थांपैकी 90% संस्था नफा मिळवितात. चीनमध्ये हे प्रमाण 45% आहे. भारतातील गुंतवणूक जास्त लाभदायक नसली तरी सुरक्षित आहे. जोखीम आहे पण कमी आहे. भारतात न्याय व्यवस्था स्वतंत्र

आहे. निगम संस्कृती उत्तम आहे. भांडवल बाजारपेठ विकसित आहे. वाढते खाजगी क्षेत्र आहे. कुशल श्रमिक सहज उपलब्ध आहेत.स्थैर्य आहे. भविष्याबद्दलची निश्चिंतता आहे. भारतीय समाज आणि लोकशाही व्यवस्था भरवशाची आहे. सराफ यांनी गुंतवणूक वातावरणाचे केलेले हे गुणात्मक विश्लेषण जास्त मर्मग्राही आहे. त्यातून दोन्ही देशातील व्यवस्थेचे तुलनात्मक त्रिमिती आकलन होते.

चीनमध्ये रस्ते, पूल, वीज निर्मिती केंद्रे, विशेष आर्थिक क्षेत्रे आदी भौतिक मूलभूत सुविधा मोठ्या प्रमाणावर मौजूद आहेत. या सुविधांमुळे परदेशी व्यवसाय संस्था काही प्रमाणात आकर्षित होतातही पण हे आकर्षण फक्त भौतिक उत्पादन क्षेत्रापुरतेच मर्यादित रहाते. ज्ञानाधारीत उत्पादन व सेवा सुविधांना भौतिक मूलभूत सुविधांमध्ये फारसे स्वारस्य नसते. भारतात मृदू मूलभूत सुविधा उत्तम प्रतीच्या आहेत. 'गुड टु ग्रेट ' या पुस्तकात जिम कोविन्स लिहितात की 'भांडवल तंत्रज्ञान यांनी आता विकास साधणे अश्यक आहे.विकासासाठी आता काय हवे यापेक्षा कोण हवे हे महत्त्वाचे आहे.उत्पादन भूमिका बजावित असते. चीन मधून अमेरिकेत भौतिक उत्पादनाची निर्यात होते (तक्ता क्र .42 पृष्ठ 53)पण भौतीक उत्पादनाने अमेरिकन अर्थव्यवस्थेतील योगदान फक्त वीस टक्के आहे. भारतातून अमेरिकेत सेवांची निर्यात होते व ती महत्वाची आहे कारण अमेरिकन अर्थव्यवस्थेत सेवा क्षेत्राचे योगदान 79 टक्के आहे. बौध्दिक कौशल्य वापरण्यात भारत जगात पहिल्या क्रमांकाचा देश आहे.चीनची मृदुसामग्रीची निर्यात एकूण निर्यातीच्या दहा टक्के तर भारताच्या एकूण निर्यातीतील मृदुसामुग्रीचा हिस्सा 79 टक्के आहे.

या मुद्यांच्या जोडीने सराफ दोन्ही देशातील शैक्षणिक व्यवस्थेचा लेखाजोखा मांडतात, व हे दोन्ही मुद्दे जोडून टिपणी करतात ती महत्वाची ठरते. भारतातील प्राथमिक शिक्षणाची अवस्था दयनीय आहे. प्रौढामधील साक्षरतेचा दर 61 टक्के आहे. चीनमधील प्रौढ साक्षरता दर 87 टक्के आहे. याचा अर्थ असा की जगातील 34 टक्के अक्षर शत्रू भारतात राहतात व हा आकडा चीनच्या तिप्पट आहे. भारतात शाळेत नावे नोंदविलेल्या विद्यार्थ्यांपैकी फक्त 31 टक्के मुले पाचवी पर्यंत जातात, चीन मध्ये हे प्रमाण 100 टक्के आहे. चीनमधील भक्कम प्राथमिक व माध्यमिक शिक्षण पध्दतीमुळे कुशल व कार्यक्षम श्रमिक निर्माण होतात. त्यांची उत्पादकता भारतीय श्रमिकांच्या उत्पादकतेच्या 134 टक्के आहे. मात्र अशा श्रमिकांकडून तंत्रज्ञान क्रांती होणार नाही. त्यासाठी व्यावसायिक व संकल्पनात्मक अभियांत्रिकी शिक्षण हवे आणि भारतात ते उत्तम आहे. चीनमध्ये शिक्षणसंस्था कारखाना या संकल्पनेवर चालतात. फक्त दहा टक्के चीनी अभियंते जागतिक पातळीच्या उत्पादन संस्थेत काम करण्यास लायक असतात. एकविसावे शतक ज्ञानाधारीत उत्पादन पध्दतीचे शतक आहे आणि चीनपेक्षा भारत श्रेष्ठ आहे. हे सिध्द करण्यासाठी लेखक Global Competitiveness Report , World Competitiveness Year Book चे दाखले देतात. ही दोन्ही प्रकाशने भारतात जागतिक प्रतीची श्रमशक्ती निर्माण होते असे सांगतात. व्यवसाय व्यवस्थापन संस्थांच्या गुणवत्ते बाबतीत जगात भारत सहाव्या स्थानावर तर चीन 73 व्या स्थानावर आहे. कुशल श्रमिकांच्या बाबतीत भारत जर्मनीच्या पाठोपाठ दुसऱ्या स्थानावर आहे.

आर्थिक व शैक्षणिक बाबींबरोबरच सराफ

या दोन देशांमधील सामाजिक, राजकीय व संरचनात्मक बाबींचीही तुलना करीत आहेत. ती थोडक्यात देत आहे. चीनमध्ये आर्थिक सुधारणांबरोबर प्रशासकीय सुधारणाही अमलात आल्या आहेत. चीन मधील प्रशासन भारतातील प्रशासनापेक्षा जास्त विकेंद्रित आहे. भारतात आर्थिक विकेंद्रिकरण बऱ्याच प्रमाणात झाले असले तरी प्रशासन केंद्रित आहे आणि भारतीय व्यवस्थेच्या या दोन अंगामधील असमतोल विकासात अडथळा आणतो. चीनमध्ये एकता, संघर्ष रहित सुधारणांचा कार्यक्रम हे वरून दिसत असले तरी याच्याखाली समस्या खदखदत आहेत.मानववंशातील संघर्ष, भौगोलिक प्रादेशिक विषमता,लोकांचे मोठ्या प्रमाणावरील स्थलांतर आणि सर्वदूर पसरलेला भ्रष्टाचार या त्यापैकी काही समस्या होत. भारतापुढेही यातील बऱ्याच समस्या आहेत. पण त्यांची उघडपणे चर्चा होते.भारतात बरीच धोरणे खुल्या चर्चेने ठरतात.पण त्याचा अर्थ भारताची भविष्यातील वाट निश्चित आहे असे नव्हे; पण चीनपेक्षा जास्त निश्चित आहे. सामाजिक पातळीवर दोन्ही देशातील समाज एकसंघ असल्याचे दिसत नाही. दोन्ही देशातील शासन, समाज व संस्था प्रामाणिक आहेत असे नाही.पण भारतात अप्रामाणिकता सामाजिक दृष्ट्या दोष मानला जातो. समाज शासनाला अप्रामाणिकपणाबद्दल जाब विचारू शकतो. चीनमध्ये शासन परदेशी गुंतवणूकीची आकडेवारी प्रकाशित करताना, बँका आपले ताळेबंद जाहीर करताना, व्यवसाय संस्था आर्थिक व्यवहार करताना उघडपणे अप्रामाणिकपणा, लबाडी करीत असतात.

संस्थात्मक संरचनेबद्दल परिस्थिती फारशी वेगळी नाही. न्यायव्यवस्थेबाबत चीनचा केंव्हाही लौकिक नव्हता, चीनमध्ये खाजगी वकिली करण्यास मज्जाव आहे. 1970 पर्यंत चीनमध्ये कायदा लिखित स्वरूपात जवळजवळ नव्हताच. न्यायालये राष्ट्रीय नोकरशाहीची प्रतिनिधी आहे. भारतात न्याय व्यवस्था बरीच स्वायत्त व स्वतंत्र असून कायदेमंडळाचा फारसा हस्तक्षेप नसतो. आर्थिक स्वातंत्र्याच्या बाबतीत भारत बाविसाव्या स्थानावर तर चीन चौसष्टाव्या स्थानावर आहे. प्रसार माध्यम हा आजच्या समाज व्यवस्थेचा मोठा आधारस्तंभ होय. लोकांचा आवाज म्हणून कार्य करणारी प्रसार माध्यमे चीनमध्ये शासनाच्या हातातील बाहुली आहेत. गुगलवर तैवान, तिबेटचे स्वातंत्र्य या बाबी गाळाव्या लागल्या आहेत.

पुस्तकाच्या तिसऱ्या भागात भारताच्या वृध्दीमधील अडथळे स्पष्ट करून सांगितले आहेत. कोसळणाऱ्या भौतिक सुविधा हा त्यातील पहिला अडथळा होय. भारतात विजेचा मोठा तुटवडा आहे. त्यामुळे वार्षिक नऊ टक्के उत्पादन घटते. भारतीय शासन टेलिकॉम, वीज, बंदरे, विमानतळ, इमारती या सारख्या मोबदला देणाऱ्या सुविधांवर लक्ष केंद्रित करते. तर मूलभूत सुविधांचे इतर प्रकल्प खाजगी क्षेत्राच्या सहयोगाने कार्यान्वित केले जात असल्यामुळे त्यांचे भवितव्य परताव्याच्या दरावर अवलंबून असते.

भारतातील अकार्यक्षम कर व्यवस्था विकासातील मोठा अडथळा आहे. भारतातील आयात प्रशुल्क महसूलाचे एकूण आयात मुल्याशी असलेले प्रमाण दहा टक्के आहे. चीनमध्ये ते दोन टक्के आहे. भारतातील अप्रत्यक्ष करांचे दर जास्त आहेत आणि खूप प्रकारचे आहेत. अप्रत्यक्ष कर दरातील फरकामुळे चीनपेक्षा भारतातील किंमतीत 14.5 टक्के तफावत पडते. भारतात कर दर जास्त असूनही कर महसूलांचे एकूण राष्ट्रीय उत्पन्नाशी

असलेले प्रमाण चीनपेक्षा पाच टक्के कमी आहे. भारतात करसूटही विविधप्रकारे व खूप देण्यात येते. पूर्ण नियोजन करून अमलात आणलेली मूल्यवर्धित कर प्रणाली अकार्यक्षम आणि परिणाम शून्य ठरलेली आहे.

भारतातील नोकरशाही हास्यास्पद आहे. भारतीय प्रशासन प्रणाली खूप केंद्रित आहे. शासकीय कर्मचाऱ्यांची संख्या 80 लाख एवढी प्रचंड असूनही समस्या सुटत नाहीत. बहुजिनसी भारतीय व्यवस्था विकेंद्रिकरणाशिवाय प्रशासित करणे शक्य नाही. लालफीत आणि भ्रष्टाचार हे व्यवसाय आणि सुचालू प्रशासनातील, व्यवस्थापनातील अडसर आहेत. व्यावसायिकांना शासकीय प्रशासनाकडून कामे करून घेण्यासाठी सोळा टक्के वेळखर्च करावा लागतो. या सर्व बाबींचा परिणाम आर्थिक विकासाचा वेग मंदावण्यावर होतो.

भारतातील राजकोषीय तूट जास्त आणि वाढती आहे. तिचे एकूण राष्ट्रीय उत्पन्नाशी असलेले प्रमाण सहा टक्के आहे. भारतातील महसूली खर्च एकूण खर्चाच्या 78 टक्के व भांडवली खर्च 13 टक्के आहे. भारताला जुने कर्ज फेडण्यासाठी स्वातंत्र्योत्तर काळात बावीस वेळा नवे कर्ज घ्यावे लागेल. भारताचे देय दायित्व एकूण राष्ट्रीय उत्पन्नाच्या नव्वद टक्के आहे. भारतीय रूपयाचे अधोमूल्यन अवास्तव व्याजदर आणि भाववाढ हे भारतीय अर्थव्यवस्थेपुढील तीन मोठे धोके आहेत. भारतात अनुदाने मोठ्या प्रमाणावर दिली जातात ती कमी करणे जरूरीचे आहे पण ते करण्याचे धारिष्ट शासनाकडे नाही.

चीनमध्ये गुंतवणूक करणे एवढे लाभदायी असताना परदेशी व्यवसाय संस्था भारतात गुंतवणूक करण्याची कारणमिमांसा वाचकाला पटेल या पध्दतीने लेखकाने या पुस्तकात मांडली आहे. गुंतवणूकीवरील संख्यात्मक परताव्याच्या दरापेक्षा व्यावसायिक ज्या आर्थिकेत्तर बाबी विचारात घेतो त्यांचा उहापोह सविस्तरपणे केला आहे. चीनने स्वीकारलेल्या आर्थिक आणि वित्तीय धोरणांमुळे सुरूवातीच्या काळात चीनचा आर्थिक विकास वेगाने झाला, पण भविष्यात विकासाचा दर घटून अरिष्ट उदभवेल हे लेखकाचे विधान वादग्रस्त आहे. चीनने आपल्या धोरणाची आजपर्यंत फळे चाखली. पुढे चीनला या धोरणांची किंमत चुकवावी लागेल हे विधानही असेच वादग्रस्त आहे. भारताने धीम्या गतीने विकास साधण्याचे अंमलात आणलेले प्रतिमान भविष्यात भारताला चांगला परतावा मिळवून देईल हे विधान भारतातील आजची राजकीय व आर्थिक परिस्थिती पहाता खरे ठरेल असे वाटत नाही.

भारतातील लोकसंख्या स्फोटाचे दुष्परिणाम भारताने भोगले आहेत. पण भविष्यात वाढणाऱ्या श्रमशक्तिचा लाभ भारताला होईल हे विधान एकतर्फी वाटते कारण एवढ्या हातांना काम देण्यासाठी आवश्यक असलेल्या निविष्टी आणि गुंतवणूक भारताकडे नाही. चीन आपल्या चलनाचे अधोमूल्यन करून निर्यात वाढीतून विकास सधित आहे. याचा उद्गार लेखकाने केला आहे. भारतही आपल्या चलनाचे अधोमूल्यन करून, चीन इतके नसले तरी, निर्यात वाढीतून विकास साध्य करण्याचा प्रयत्न करीत आहे. लेखक या बाबीचा उल्लेख करीत नाही.

# भा. रा. ढेकणे यांचे निधन !



भा. रा. ढेकणे

**अनिल दाणी, नागपूर**

आजीव सदस्य, मराठी अर्थशास्त्र परिषद

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या स्थापनेपासून संस्थेशी निगडित असणारे व 'अर्थसंवाद' साठी नियमित लेखन करणारे मुंबईच्या सिडनहॅम अर्थ वाणिज्य महाविद्यालयाचे माजी प्राचार्य डॉ. भा.रा.ढेकणे ह्यांचे 11 जून रोजी पुण्यात त्यांच्या रहात्या घरी निधन झाले. ते 97 वर्षाचे होते.

अर्थशास्त्रासारखा शास्त्रीय विषय ओघवत्या मराठी भाषेत सादर करण्यात डॉ. ढेकणे ह्यांचा हातखंडा होता. अर्थशास्त्रातील डॉक्टरेटसाठी त्यांनी आपला प्रबंध कै.डॉ. धनंजयराव गाडगीळ ह्यांच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केला. डॉ. गाडगीळांना त्यांनी अखेरपर्यंत गुरूस्थानी मानले. पुण्याच्या गोखले इन्स्टिट्यूटमध्ये मानद संचालक म्हणूनही त्यांनी काही काम पाहिले.

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या अनेक वार्षिक संमेलनात त्यांनी शोधनिबंध सादर केले. नागपूरच्या संमेलनात 'कापूस एकाधिकारावर सादर झालेला त्यांचा शोधनिबंध वैशिष्ट्यपूर्ण होता. तल्लख बुध्दिमता, कुशल संवादपटुत्व, ओघवती वाणी व लेखणी तसेच विविध क्षेत्रातील आणि श्रेणीतील अनेक व्यक्तीशी असणारे विलक्षण जिव्हाळ्याचे संबंध हा डॉ.ठेकण्यांचा गुणविशेष होता. आपल्या व्यक्तित्वाचा हा मनोहारी पदर त्यांनी शेवटपर्यंत जपला. भारतातील ब्रिटिशांचा काळ, टिळकयुग, गांधीयुग ह्याबाबतचे त्यांचे भाष्य, त्यांची स्मरणशक्ती आणि चिकित्सक दृष्टी या दोन्हींचा परिचय देऊन जात. या बरोबरच वर्तमानातही ते आकंठ रममाण झालेले दिसत त्यांच्या व्यक्तिमत्वातील ह्या अद्‌भुत रसायनामुळेच सर्वच वयोगटातील स्त्री-पुरूषांना त्यांचे सानिध्य हवेहवेसे वाटे.

डॉ. ढेकणे हे धारवाडच्या कर्नाटक महाविद्यालयात 15 वर्षे अर्थशास्त्राचे प्राध्यापक होते. त्यानंतर कोल्हापूरच्या राजाराम कॉलेजचे तसेच नागपूरच्या मॉरिस कॉलेजचे प्राचार्य म्हणूनही त्यांनी उल्लेखनीय कार्य केले. 2 वर्षे त्यांनी नागपूर विद्यापीठाच्या पदव्युत्तर अर्थशास्त्र विभागाचा प्रमुख म्हणूनही आपल्या कामाचा ठसा उमटविला. कोल्हापूरच्या शिवाजी विद्यापीठाचे ते

प्रथम कुलसचिव होते. त्यानंतर महाराष्ट्र शासनाच्या प्रशासकीय कर्मचारी प्रशिक्षण केंद्रात ते संचालक होते.

डॉ. ढेकण्यांचे व्यक्तित्व त्यांच्या रसिक मनाने संपन्न झाले होते. भारतीय शास्त्रीय संगीताचे श्रवण व रसग्रहण तसेच नामवंत गायक गायिकांशी अत्यंत आत्मियतेचा संबंध ह्याचा उल्लेख केल्यावाचून त्यांचा परिचय पूर्ण होऊ शकत नाही. भीमसेन जोशी, मल्लिकार्जुन, मन्सूर, मांगूबाई कुर्डिकर, किशोरी आमोणकर, वामनराव देशपांडे अशी संगीत क्षेत्रातील दिग्गजांशी डॉ. ढेकण्यांचे मैत्रीपूर्ण संबंध होते. या सर्व गायकांचे तसेच इतर अनेक नामवंत गायक-गायिकांचे खाजगी गायनांचे कार्यक्रम आपल्या घरी व इतरत्र त्यांनी मोठ्या उत्साहाने घडवून आणलेत. बालगंधर्वांच्या गायकीची मोहिनी त्यांच्या मनाच्या अंतःपटलावर सदैव विराजमान झालेली दिसे. पुर्वायुष्यात जगलेले, जपलेले असे अनेक क्षण खुलवून सांगताना ते विलक्षण भावूक होते.

महाविद्यालयात प्राध्यापक किंवा प्राचार्य म्हणून काम करताना त्यांनी स्वतःला शैक्षणिक वा प्रशासकीय खात्यात कधीच अडकवून ठेवले नाही. त्यांनी मुलांबरोबर नाटकात कामे केलीत. त्यांच्या बरोबर गायले, खेळले. आपली अडचण किंवा तक्रार निर्धास्तपणे घेऊन जाण्याचे भरवशाचे ठिकाण म्हणजे डॉ.ढेकणे असा विद्यार्थ्यांचा विश्वास असे. निवृत्तीनंतर मुंबईच्या अंधेरी विभागातील एका खाजगी महाविद्यालयात ते अर्धवेळ शिकविण्याचे काम करीत. शैक्षणिक सत्राच्या मध्यातच त्यांचा कार्य करार संपला. उद्यापासून ढेकणे सर येणार नाहीत हे कळल्यावर वर्गातील सर्व मुले क्लास रूम बाहेर येऊन त्यांनी डॉ. ढेकण्यांचा कार्य काळ वाढवावा म्हणून धरणे धरले.

नागपूर महाविद्यालयाचा (तत्कालिन मॉरिस कॉलेज) व मुंबई विद्यापीठाचा संगीत शिक्षण विभाग तसेच नागपूर विद्यापीठाचा बिझिनेस मॅनेजमेंट विभाग ह्यांचे बीजारोपण डॉ. ढेकणेंनी केले असे आज आठवणीने सांगितले जाते.

डॉ. भा.रा.ढेकणे हयांच्या निधनाने त्यांचे कुटुंबीय,आप्त, मित्र, परिचित,अर्थशास्त्र व संगीताच्या क्षेत्राशी निगडीत असणारे अशा अनेकांचे अपरिमित नुकसान झाले आहे हे तर खरेच, पण त्याचबरोबर एक रसिक,व्यासंगी, चिकित्सक व आलोचक भाष्य करणारा, निर्मळ मनाचा, लाघवी व्यक्तित्व लाभलेला विद्वान शिक्षक आणि विसाव्या शतकातून एकविसाव्या शतकाकडे झुकलेल्या महाराष्ट्रातील राजकारण, अर्थकारण, समाजकारण आणि संगीताच्या क्षेत्रातील महत्वपूर्ण घटनांकडे आणि घटनाक्रमाकडे अत्यंत डोळसपणे बघू शकणारा,असामान्य बुध्दिमत्तेचा माणूस काळाने आपल्यातून ओढून नेला आहे अशी रूखरूख वाटत रहाते. ती सहजासहजी जाणार नाही.

डॉ. भा.रा.ढेकणे ह्यांच्या स्मृतीस विनम्र अभिवादन।

# श्रध्दांजली...!


नलिनी पंडीत

व्यं. सु. पाटणकर

ख्यातनाम विदुषी आणि मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या ज्येष्ठ आजीव सदस्य प्रा.सौ.नलिनी पंडीत यांचे २६ जुलै २००९ रोजी न्हदयविकाराने मुंबई येथे दुःखद निधन झाले. मृत्युसमयी त्यांचे वय ८२ वर्षे होते. अलीकडे त्यांना शारिरीक अस्वस्थ्य जाणवत होते. परिणामी सामाजिक जीवनातील त्यांचा सहभाग अपरिहार्यपणे खूपच कमी झाला होता.मात्र सभोवतालच्या आर्थिक-सामाजिक घडामोडी संबंधीच्या त्यांच्या चिंतन-मननामध्ये खंड पडलेला नव्हता.

प्रा.पंडीत पुण्याच्या गोखले अर्थशास्त्र संस्थेच्या साठ वर्षापुर्वीच्या विद्यार्थिनी व पदव्युत्तर शिक्षण तेथे पूर्ण केल्यानंतर आपल्या व्यावसायिक कारकीर्दीच्या प्रारंभ त्यांनी मुंबईला पोदार महाविद्यालयामध्ये केला. सुमारे पाच वर्षे तेथे अध्यापन केल्यानंतर पार्ल्याच्या डहाणूकर महाविद्यालयात अर्थशास्त्र विभाग प्रमुखाची जबाबदारी त्यांनी स्विकारली आणि थोड्याच काळात प्रथितयश अध्यापक म्हणून नावलौकिक मिळविा. सेवानिवृत्तीपर्यंत त्या तेथेच होत्या. महाविद्यालयाच्या चार भिंतीपुरते आपले कार्यक्षेत्र मर्यादित राहणे त्यांच्या मनोवृत्तीला मानवणारे नव्हते. भारतातील समाजकारण आणि अर्थकारणाच्या साक्षेपी अभ्यासातून त्यांची वैचारिक भूमिका सुष्पस्ट होऊ लागलेली होती. आणि ती व्याख्यानांच्या रूपाने विविध जनसमूहांपुढे लोकशिक्षणाच्या भूमिकेतून वेळोवेळी त्या मांडीत असत.भारतीय अर्थव्यवस्थेचा आदर्श हा लोकशाही समाजवादावर आधारलेला असायला हवा आणि आपली अर्थनीती सामाजिक न्यायाशी सुसंगत असायला हवी हे त्यांच्या तत्वज्ञानाचे मुख्य सूत्र होते.

प्रा.पंडीत यांनी विपुल लेखन केलेले होते. त्यामध्ये त्यांच्या ७-८ ग्रंथाचा विशेष उल्लेख करावयास हवा. महात्मा गांधी आणि डॉ.आंबेडकर यांचे विचारधन, भारतातील जातिवाद आणि वर्गवाद, राष्ट्रवाद संकल्पनेचा विकास, स्वातंत्र्योत्तर काळातील भारतातील जातिवाद आणि वर्गवाद, राष्ट्रवाद

संकल्पनेचा विकास, स्वातंत्र्योत्तर काळातील भारतातील दलितांच्या समस्या, जागतिकीकरण आणि भारत इत्यादी विषयांवरील त्यांचे ग्रंथ त्यांच्या व्यासंगाची आणि चिकित्सक अभ्यासाची साक्ष पटवितात. गुजराथेतील नर्मदेच्या पाण्यासंबंधीचे आंदोलन किंवा मराठवाडा विद्यापीठाच्या नामांतराच्या चळवळीमध्ये त्यांनी उडी घेतली होती हे खरे असेल तरी त्यांचा मूळ प्रकृतिधर्म हा वैचारिक नेतृत्वाचाच आहे, क्रियाशील कार्यकर्त्याचा नव्हे याची नोंद घेणे आवश्यक आहे.

मराठी अर्थशास्त्र परिषदेसाठीचे त्यांचे योगदान भरीव असे आहे. त्यासंबंधी पुष्कळ विस्ताराने लिहिण्यासारखे आहे.परिषदेच्या विविध शैक्षणिक उपक्रमांमध्ये - चर्चासत्रे कार्यशाळा, 'अर्थसंवाद' नियतकालिकासाठी लेखन इ. त्या आवर्जून भाग घेत असत. प्रा.पंडीत यांनी काही काळ परिषदेच्या कार्याध्यक्ष पदाचीही धुरा सांभाळलेली आहे. विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे शहादा (जि.धुळे)अधिवेशन प्रसंगी त्यांनी केलेले विचारप्रवर्तक अध्यक्षीय भाषण आजही अनेकांच्या स्मरणात आहे. भारताच्या आर्थिक विकासातील महिलांचे स्थान हा विषय तेव्हा त्यांनी विवेचनासाठी निवडलेला होता.

साधी राहाणी, तरल आणि विश्लेषक मन, स्पष्टवक्तेपणा, वंचित वर्गाविषयी बांधिलकी आणि एकूणच सामाजिक प्रश्नासंबंधीची प्रगल्भ जाण ही त्यांच्या व्यक्तिमत्वाची ठळक वैशिष्ट्ये होती. त्यांच्या निधनाने त्यांच्या कुटुंबीयांबरोबरच परिषदेवरही मोठा आघात झालेला आहे.

प्रा.पंडीत यांच्या स्मृतीला विनम्र अभिवादन.

**व्यु.स.पाटणकर**

---

# निवेदन

7 नोव्हेंबर 2009 पर्यंत मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या आजीव सदस्यांची डिरेक्टरी पूर्ण करावयाची आहे. तरी 30 सप्टेंबर 2009 पर्यंत सोबत जोडलेला फॉर्म, फोटो व रू.100/- चा डी.डी.कार्यवाह खजिनदार यांच्याकडे खालील पत्त्यावर पाठवावा.

**अनिल सूर्यवंशी**
कार्यवाह / खजिनदार
'गोदाई' शिवशक्ती मैदानाजवळ,
शिवाजी नगर, बार्शी जि.सोलापूर
पिन-413 411

# मराठी अर्थशास्त्र परिषद
# तेहतिसावे वार्षिक अधिवेशन

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे तेहतिसावे वार्षिक अधिवेशन 7,8 व 9 नोव्हेंबर 2009 या दरम्यान शारदाबाई पवार महिला महाविद्यालय, शारदानगर, माळेगांव बु. ।। ता.बारामती जि.पुणे येथे आयोजित करण्यात आले आहे. अधिवेशनाच्या संयोजकाकडून परिषदेच्या सदस्यांना निमंत्रण व माहितीपत्रक पाठविण्यात येईल. प्रतिनिधी शुल्क रूपये पाचशे पन्नास (550) असून ते मनीऑर्डर / डिमांड ड्राफ्टने 'मराठी अर्थशास्त्र परिषद तेहतिसावे अधिवेशन, बारामती' या नावाने स्थानिक कार्यवाहांकडे पाठवावे. नव्याने परिषदेचे सदस्य होऊ इच्छिणाऱ्यांसाठी आपली सदस्यत्वाची वर्गणी (वार्षिक साधारण सदस्य वर्गणी रू.300/- किंवा आजीव सदस्य रू.1500/-) अधिवेशनाच्या ठिकाणी घेण्याची सोय करण्यात आली आहे. अशी वर्गणी कार्यवाह - खजिनदाराच्या पत्त्यावर देखील पाठविता येईल. या रकमेची रितसर पावती संबंधितांकडे कार्यालयाकडून पाठविली जाईल.

परिषदेतील चौथ्या चर्चासत्रासाठी आयत्या वेळेचा विषय खालील प्रमाणे राहील.

(१)'महाराष्ट्राची अर्थव्यवस्था - पन्नाशीच्या उंबरठ्यावर-अनुभव आणि आव्हाने'

(२)विशेष सत्र-'महाराष्ट्रातील स्वयंसहाय्यता बचत गट - सद्य:स्थिती व भवितव्य'

आयत्या वेळच्या विषयावर शोध-निबंध मागविले जात नाहीत.

अधिवेशनासंबंधी आवश्यक तपशीलासाठी खालील पत्त्यावर संपर्क साधावा.

**महंमदरफीक उमराव मुलाणी**
स्थानिक कार्यवाह
अर्थशास्त्र विभाग प्रमुख
शारदाबाई पवार महिला महाविद्यालय, शारदानगर,
माळेगांव बु. ।। ता.बारामती, जि.पुणे.
दूरध्वनी (02112)254250 भ्रमणध्वनी : 9881161893

## निवेदन

खालील आजीव सभासदांचे जाने. मार्च 2009 पर्यंतचे पाठविलेले अंक प्रमुख संपादकांकडे परत आलेले आहेत. तरी संबंधित आजीव सभासदांनी आपले नवीन पत्ते संपादकांकडे पाठविण्यासंबंधी सहकार्य करावे.त्यानंतर त्या सभासदांना बदललेल्या पत्त्यावर अर्थसंवादचे पुढील अंक पाठविण्यात येतील.

| अ. क्र. | सभासद क्रमांक | आजीव सभासद नांव |
|---|---|---|
| 1 | 6 | श्री.तळवळकर गोविंद |
| 2 | 22 | श्री.गाडगीळ गंगाधर गोपाळ |
| 3 | 25 | श्री.देशपांडे विश्वनाथ विनायक |
| 4 | 35 | श्री.वाकणकर बिंदू माधव |
| 5 | 45 | श्री.दांडेकर अशोक शंकर |
| 6 | 55 | जोगळेकर सुहास रामचंद्र |
| 7 | 56 | प्राचार्य कौण्डिण्य एम्. व्ही. |
| 8 | 73 | सौ.कुलकर्णी विद्या रत्नाकर |
| 9 | 92 | श्री.खुदानपूर गोविंद शिवाजी |
| 10 | 93 | राजर्षी जी.एम. |
| 11 | 132 | प्रा.मानकर विजयकुमार गजानन |
| 12 | 143 | प्रा.जोशी श्रीकांत कालीदास |
| 13 | 147 | मीठाणी दाऊद मोहंमद अली |
| 14 | 153 | प्रा.मोकाशी पु.के. |
| 15 | 176 | प्रा.गिरासे गजेंद्रसिंग ठाणसिंग |
| 16 | 178 | प्रा.उपदेव विनायक वासुदेव |
| 17 | 181 | प्रा.परांजपे रमेश वासुदेव |
| 18 | 185 | प्रा.अष्टेकर शांताराम |
| 19 | 203 | प्रा.शहा रमेश बाबुलाल |
| 20 | 249 | श्रीमती जोशी कालिका दिनानाथ |
| 21 | 279 | प्रा.तराले प्रल्हाद गोविंदराव |
| 22 | 284 | श्रीमती शिरोडकर ज्योत्स्ना ए. |
| 23 | 321 | प्रा.फरील नरेंद्र विश्वनाथ |
| 24 | 339 | सौ.एकबोटे नंदिनी वि. |
| 25 | 366 | प्रा.देशपांडे अतुल रा. |
| 26 | 377 | पाटील आर.बी. |
| 27 | 378 | प्रा.कान्हेरे रंगनाथ भी. |
| 28 | 396 | सौ.दिक्षीत एम. आर. |
| 29 | 414 | प्रा.निजसुरे पदयावती सखाराम |
| 30 | 420 | सौ.प्रयाग माधवी |
| 31 | 492 | चिट्टे गुरूशांत निलकंठ |
| 32 | 498 | प्रा.कस्तूरे आशा |
| 33 | 519 | प्रा.सौ.श्रीवास्तव नलीनी |
| 34 | 543 | डॉ.हिलगे विलास |
| 35 | 571 | श्री.भिलवडे अरविंद श्रीपाल |
| 36 | 593 | श्री.छापरवाल शांतीलाल बिरदीचंद |
| 37 | 606 | डॉ.सौ.सावंत मिनाक्षी दि. |
| 38 | 613 | नातू नारायण पुरूषोत्तम |
| 39 | 619 | गौड उर्मिला ए. |
| 40 | 624 | उशीर देवीदास गंगाधर |
| 41 | 627 | जाधव जी. एम. |
| 42 | 639 | सौ.एकबोटे विद्या |
| 43 | 652 | प्रा.देवरे नानाजी वामन |
| 44 | 656 | सौ.दामले वर्षा आनंद |
| 45 | 666 | श्री.ओक जयंत काशिनाथ |
| 46 | 667 | डॉ.सौ.केळकर किर्ती |
| 47 | 698 | प्रा.आठवले पि.यु. |
| 48 | 713 | प्रा.तोडमल आय.ए. |
| 49 | 753 | भटकर सुरेश नामदेव |
| 50 | 754 | प्रा.डॉ.कप्तान संजय |
| 51 | 778 | डोईजड मेधा सदाशिव |
| 52 | 837 | श्री.मालतुमकर वि.वा. |
| 53 | 840 | अंबुलकर डी. पी. |
| 54 | 843 | श्री.नाखले वा.गो. |
| 55 | 846 | श्री.गोवंडे प्रकाश का. |
| 56 | 860 | प्रा.कोंडेकर उमाकांत भास्करराव |
| 57 | 934 | श्री.बेलसरे संजय |
| 58 | 1021 | पाटील गिरीष गोविंद |
| 59 | 1026 | प्रा.महातळे आशिष कृ. |
| 60 | 1155 | तळतकर संजय भागवतराव |
| 61 | 1184 | नाईक वैशाली कल्याणराव |
| 62 | 1259 | प्रा.झोटिंग शरद वामन |

प्रमुख संपादक -जगन्नाथ पाटील

# मराठी अर्थशास्त्र परिषद

सोसायटीज रजिस्ट्रेशन ॲक्ट, 1860 व मुंबई पब्लिक ट्रस्ट ॲक्ट, 1950 अन्वये नोंदविलेली. नोंदणी क्रमांक एफ-4615, मुंबई

कृपया हे पत्रक भरून कार्यवाह-खजिनदारांच्या बार्शी येथील पत्त्यावर ताबडतोब पाठवावे. सोबत मराठी अर्थशास्त्र परिषद या नावाने रू.100/-चा डी.डी.किंवा मनऑर्डर पाठवावी ही नम्र विनंती. कृपया चेक पाठवू नये.

आजीव सभासद क्र.

जिल्हा -

विद्यापीठ क्षेत्र -

फोटो

1) सभासदाचे पूर्ण नांव (पहिले आडनांव ) : ....................

2) जन्म दिनांक : ....................

3) संस्था / कार्यालय/महाविद्यालयाचा पत्ता : ....................

4) घरचा पत्ता (पिनकोडसह) : ....................

....................

5) दूरध्वनी क्रमांक (एस.टी.डी.कोडसह) : कार्यालय .......... निवास ..........

भ्रमणध्वनी (मोबाईल) ..........

6) शैक्षणिक पात्रता : ....................

7) पीएच.डी.प्रबंधाचा विषय : ....................

....................

....................

8) संशोधन मार्गदर्शक म्हणून मान्यता आहे काय? : ....................

केंव्हापासून ?

9) विशेषीकरण : ....................

10) परिषदेचे पदाधिकारी / कार्यकारी मंडळ सदस्य: पद .......... वर्ष ..........

म्हणून आपण कार्य केले आहे का? असल्यास

11) इतर विशेष माहिती : ....................

....................

ॲग्रीकल्चरल डेव्हलपमेंट ट्रस्ट संचलित,
**शारदाबाई पवार महिला महाविद्यालय**
(कला, वाणिज्य, विज्ञान व गृहविज्ञान)
शारदानगर, माळेगांव बु. ।।, ता. बारामती, जि.पुणे पिन 413 115

प्रति,

मा.आजीव सदस्य,

मराठी अर्थशास्त्र परिषद

विषय :- 1) मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या 33 व्या राष्ट्रीय अधिवेशनाच्या तारखेबाबत.....
2) परिषदेसाठी शोधनिबंध पाठविणे बाबत..

संदर्भ :- पत्र क्र. 60/2008-09 मराठी अर्थशास्त्र परिषद दि. 14/11/2008

महोदय,

उपरोक्त संदर्भ विषयान्वये कळवू इच्छितो की, आमच्या महाविद्यालयास मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या 33 व्या राष्ट्रीय अधिवेशनाच्या आयोजनाचा मान मिळालेला आहे. त्याबद्दल आम्ही मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या प्रती कृतज्ञता व्यक्त करतो. डॉ.विनायक श्रीधर देशपांडे, नागपूर यांच्या अध्यक्षतेखाली हे अधिवेशन संपन्न होत आहे.

सदर परिषदेच्या तारखा 7,8 आणि 9 नोव्हेंबर 2009 या निश्चित केल्या असून दि.7 नोव्हेंबर 2009 रोजी उद्‌घाटन समारंभ आयोजित करीत आहोत.

अधिवेशनातील चर्चासत्रासाठी खालील विषय निश्चित करण्यात आले आहेत.

**विषय :-** 1) आंतरराष्ट्रीय व्यापार सिध्दान्तातील पॉल क्रूगमन यांचे योगदान
2) 21 व्या शतकातील भारतीय शेती क्षेत्रासमोरील आव्हाने
3) महाराष्ट्राच्या औद्योगिक विकासाचे मूल्यमापन

सदर परिषदेची नोंदणी शुल्क एकूण 550/- रू. असून 50/- रू. परिषदेची व 500/- रू. महाविद्यालयाची आहे. विद्यार्थ्यांसाठी परिषदेची नोंदणी शुल्क 250/-रू. आहे.

सदर परिषदेसाठी आपण उपस्थित राहणार आहातच. परंतु सर्व कल्पना म्हणून आम्हांला अगोदर सूचना देण्यात यावी. जेणेकरून सुसज्ज व्यवस्था करणे सोईचे होईल.

आम्ही अर्थसंवाद त्रैमासिकातून आवाहन करतो की, सदर परिषदेस आपण उपस्थित राहून मार्गदर्शन व सहकार्य करावे ही नम्र विनंती.

कळावे,

**आपले स्नेहांकित,**

**डॉ.एम.यू.मुलाणी**
प्रपाठक व अर्थशास्त्र विभाग प्रमुख,स्थानिक कार्यवाह

**डॉ.एम.एस.शेजुळ**
प्राचार्य/ स्थानिक कार्याध्यक्ष

*टीप : अधिवेशनाची सविस्तर कार्यक्रम पत्रिका यशावकाश पाठविण्यात येईल.*